दैनिक
अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द
# राष्ट्र सह्याद्री
संपादक : काकासाहेब नवले I RNI No. MAHMAR/2019/82605 I वर्ष ७ वे I पाने ८ I मुल्य रू. ४.०० I अंक २६२ I रविवार ५ जुलै २०२६
I पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 I www.rashtrasahyadri.com

## नाडी संस्था...


'सहजयोग'
भाग ९९

मानवी शरीरात मुख्य तीन नाड्या असतात.ही डावी कडची जी बाजू आहे ती इडा नाडी मानली जाते. तिला चंद्र नाडी सुद्धा म्हणतात. ही परमेश्वराची ती शक्ती आहे, ज्या शक्तीमुळे आपले अस्तित्व बनलेले आहे. ही शिवाची शक्ती आहे. आणि हिला संस्कृत भाषेमध्ये महाकालीची शक्ती असं म्हणतात. महाकालीची शक्ती आहे.डावीकडची जी इडा नाडी आहे, ह्या नाडीमुळे आपल्या अस्तित्वाला सुरुवात झालेली आहे. आपलं अस्तित्व यावर अवलंबून असते आणि जेव्हा अस्तित्व नसतं तेव्हा आपण नष्ट होतो म्हणून पुष्कळदा याला डिस्ट्रॉयिंग शक्ती सुद्धा म्हणतात.नंतर ही जी उजवीकडे आपली शक्ती कार्यान्वित आहे, जी उजवीकडची शक्ती आहे त्या शक्तीने आपण आपली शारीरिक स्थिती, शारीरिक कार्य हे करत असतो आणि ह्या स्थितीने आपण आपलं बौद्धिक कार्य करत असतो. म्हणजे पुढचं प्लॅनिंग करायचे असले, पुढचा विचार करायचा असला की ज्याला आपण म्हणतो की आता आम्हाला हे नियोजित करायचे आहे, जे काही आपल्याला पुढचे विचार येत असतात, ज्याला आपण म्हणू आपल्या भविष्याचे जे काही आपण विचार किंवा त्याचे जे काही प्लॅन करत असतो ते सगळे या शक्तीने आपल्यामध्ये कार्यान्वित होतात. तसंच आपल्या शरीराचे कार्य म्हणजे आपण जर असं ठरवलं की उद्या आपण धावायला जायचं.तर जे आपण धावायला लागतो किंवा आपल्या शरीराची जी काही गती होते ती सुद्धा खालच्या बाजूने होत असते. आता मधोमध जी शक्ती आहे त्या शक्तीला सुषुम्ना नाडी असं म्हणतात. सुषुम्ना नाडीतून ही शक्ती वहात असते. परमेश्वराची कार्यशक्ती जी आहे ती आपण पाहिली. उजव्या बाजूला जी पिंगला नाडी आहे त्याच्यातून कार्यान्वित होत असते आणि मधोमध जी सुषुम्ना नाडी आहे त्याच्यामुळेच उत्क्रांती झाली आहे. त्याच्यामुळेच आपल्यामध्ये धर्म स्थापन होतो. पहिल्यांदा ह्याच्यात धर्म बनतो आणि त्यानंतर त्याची उत्क्रांती होते.२३ फेब्रुवारी १९७९ अहमदनगर

अधिक माहितीसाठी www.sahajayogamumbai.org 8871519191

सौजन्य : निर्मला धाम आश्रम, आरडगाव राहुरी

# डिझेलमध्येही १५% आयसोब्युटेनॉल मिश्रणाची तयारी

## इंधन क्षेत्रात नवे पर्व; तेल आयात कमी करण्यासाठी केंद्राचा मोठा निर्णय

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री



**मुंबई :** पेट्रोलमध्ये इथेनॉल मिश्रणामुळे वाहनांचा मायलेज घटणे, इंजिन बिघाड आणि देखभालीचा वाढलेला खर्च याबाबत देशभरातून तक्रारी येत असतानाच केंद्र सरकारने आता डिझेलमध्ये १५ टक्क्यांपर्यंत आयसोब्युटेनॉल मिसळण्याची तयारी सुरू केली आहे. जीवाश्म इंधनावरील अवलंबित्व कमी करून ऊर्जा क्षेत्रात आत्म निर्भरता साधण्याच्या उद्देशाने हा महत्त्वाचा निर्णय घेतला जात असल्याची माहिती केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी दिली.

गडकरी म्हणाले की, इथेनॉल थेट डिझेलमध्ये मिसळणे तांत्रिकदृष्ट्या शक्य नसल्यामुळे इथेनॉलपासून आयसोब्युटेनॉल तयार करण्याचे काम सुरू आहे. डिझेलमध्ये १५ टक्के आयसोब्युटेनॉल मिश्रणाला परवानगी देण्याच्या दिशेने सरकारचे प्रयत्न सुरू असून, यामुळे स्वच्छ ऊर्जा वापराला चालना मिळेल तसेच देशाची खनिज तेल आयातीवरील अवलंबित्व मोठ्या प्रमाणात कमी होईल.

पायलट प्रकल्पांमध्ये १०० टक्के इथेनॉल आणि आयसोब्युटेनॉलवर दोन जनरेटर यशस्वीपणे चालवण्यात आल्याचा दावा गडकरी यांनी केला. या प्रयोगामुळे पर्यायी इंधनावर चालणारी इंजिने विकसित करणे शक्य असल्याचे सिद्ध झाल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान, पेट्रोलमध्ये इथेनॉल मिश्रणामुळे वाहनांचा मायलेज कमी होणे, इंजिनातील तांत्रिक बिघाड आणि वाहनधारकांवरील आर्थिक भार वाढल्याच्या तक्रारी सातत्याने होत आहेत.

अशा परिस्थितीत डिझेलमध्ये आयसोब्युटेनॉल मिश्रणाचा प्रस्ताव कितपत यशस्वी ठरतो, याकडे वाहन उद्योग, ग्राहक आणि इंधन क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

### आयसोब्युटेनॉलचे प्रमुख फायदे

- पुढील पिढीचे प्रभावी जैवइंधन म्हणून ओळख.
- ऊर्जा घनता इथेनॉलपेक्षा अधिक.
- इंजिनाशी अधिक सुसंगत कार्यक्षमता.
- पारंपरिक इंधनांच्या तुलनेत कमी प्रदूषण.
- खनिज तेल आयात आणि परकीय चलनावरील भार कमी होण्यास मदत.


# कांदा खरेदी दरात अडीचशे रुपयांनी वाढ

## सरकारकडून २ हजार १२५ रुपये प्रतिक्विंटने कांद्याची खरेदी होणार

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** कांदा उत्पादक शेतकऱ्यांना काही प्रमाणात दिलासा देणारी बातमी समोर आली आहे. कांद्याच्या दरात वाढ होत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. गेल्या काही दिवसांपासून कांदा उत्पादक शेतकरी चिंतेत होते.अशातच काही प्रमाणात कांद्याच्या दरात वाढ झाल्यानं दिलासा मिळाला आहे. सरकारकडून १ हजार ९७५ रुपये दरानं कांद्याची खरेदी केली जात होती. आता यामध्ये २५० रुपयांची वाढ केली आहे. आता सरकारनं कांद्याचे दर २ हजार १२५ रुपये प्रतिक्विंटल केला आहे.

### तीन हजार रुपये भाव देण्याची शेतकऱ्यांची मागणी



कांदा उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न सरकारने केला होता. सरकारकडून १ हजार ९७५ रुपये दरानं कांदा खरेदी केला जात होता. पण आता २ हजार १२५ रुपये प्रतिक्विंटने कांद्याची खरेदी केली जाणार आहे. मात्र, अशातच सरकारने ३ हजार रुपये प्रतिक्विंटल दराने कांद्याची खरेदी करावी अशी मागणी कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी केली आहे. (पान ४ वर)

## महत्त्वाचे..

### मुंबई, ठाणे, कोकणात ६ जुलैपर्यंत मुसळधार पाऊस

मुंबई : मुंबईसह राज्यातील अनेक भागांमध्ये सुरु असलेल्या मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागरिकांना सावध राहण्याच्या सूचना दिल्या आहेत. प्रशासनाकडून देण्यात येत असलेल्या अलर्टचे तंतोतंत पालन करा. कारण, पुढील दोन दिवसांत सरासरीपेक्षा जास्त पाऊस आणि वादळं येण्याची शक्यता असल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

ठाणे, रायगड, पालघर असेल पुण्याचा काही भाग, नाशिक याठिकाणी मुसळधार पाऊस आहे. कालपासून आपण वेगवेगळे अलर्ट दिले आहेत. या भागात सातत्याने ६ जुलैपर्यंत मुसळधार पाऊस असेल, वादळंही येतील. तसेच या भागात सरासरीपेक्षा जास्त पाऊस होईल, असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले. आपण दर तीन तासांनी आपण या भागातील नागिरकांना एसएमएस पाठवत आहोत. शाळांना सुट्टी दिली आहे.

लोकांन विनंती केली आहे की, प्रवास टाळता आला तर टाळला पाहिजे, गरज असेल तरच घराबाहेर पडा. आता ज्याप्रकारे पाऊस आणि वादळ आहे काही अपघात होऊ नयेत म्हणून प्रशासनाकडून अलर्ट पाठवले जात आहेत. एनडीआरएफ आणि एसडीआरएफ परिस्थितीवर नजर ठेवून आहेत.

## स्वतात सोन्याचे आमिष पडले महागात

# श्रीगोंद्यात गुजरातच्या तरुणाची २ लाखांची लूट

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** श्रीगोंद्यात काही लोकाकडून बाहेरील लोकांना स्वतात सोने देण्याच्या बहाण्याने लाखोची लुट झाल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत तरीही लोक सजग होत नसल्यामुळे अश्या घटना वारंवार घडत आहे अशीच एक घटना पुन्हा श्रीगोंदा तालुक्यातील बांगर्डा शिवारात घडली असून तब्बल २ लाख रुपयांचा ऐवज लुटल्याप्रकरणी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. श्रीगोंदा तालुक्यात दिवसाढवळ्या घडलेल्या धाडसी लुटीच्या घटनेने खळबळ उडाली आहे. (पान ४ वर)

### मारहाण व जीवे मारण्याची धमकी : गुन्हा दाखल

■ घटनास्थळावरून निघताना आरोपींनी, तुम्ही बाहेर राज्यातील आहात; पोलिसांत तक्रार केली तर जिवे मारून टाकू, अशी धमकी दिल्याचाही आरोप करण्यात आला आहे.या गंभीर घटनेमुळे श्रीगोंदा तालुक्यात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. विशेषतः बाहेरगावाहून व्यवहारासाठी येणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षिततेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.या प्रकरणाचा पुढील तपास पोहेकॉ. अभय काळे करीत आहेत . घटनेनंतर आरोपी फरार झाले असून पोलीस त्यांचा शोध घेत आहेत. रात्री उशिरापर्यंत कोणत्याही आरोपीला अटक करण्यात आलेली नव्हती.

## शनीशिंगणापूर देवस्थान गैरव्यवहार प्रकरण

# राज्य सरकारला ८ आठवड्यात निर्णयाचे खंडपीठाचे निर्देश

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर / सोनई :** श्री शनेश्वर देवस्थान, शनी शिंगणापूर येथील कथित आर्थिक गैरव्यवहारांच्या चौकशीसंदर्भातील निवेदनावर राज्य सरकारने आठ आठवड्यात कायद्यानुसार व गुणवत्तेच्या आधारे निर्णय घ्यावा, असे निर्देश मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने राज्य सरकारच्या मुख्य सचिवाना दिले आहेत.

निर्णयापूर्वी याचिकाकर्ते सचिन प्रभाकर दरंदले यांना वैयक्तिक सुनावणीची संधी देण्याचेही आदेश न्यायालयाने दिले आहेत.

सोनई (ता.नेवासा ) येथील याचिकाकर्ते सचिन प्रभाकर दरंदले यांनी २२ डिसेंबर २०२५ रोजी मुख्यमंत्र्यांकडे सादर केलेल्या निवेदनात शनिशिंगणापूर देवस्थानातील कथित आर्थिक गैरव्यवहार, बनावट पूजा, क्यूआर कोड व्यवहारांतील अनियमितता, बनावट पावती पुस्तके,अतिरिक्त कर्मचारी भरती तसेच मागील दहा वर्षांच्या (पान ४ वर)



# बीडच्या मुलीची श्रीरामपूरमधून सुटका

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री



**श्रीरामपूर :** बीड जिल्ह्यातील नेकनूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतून पळवून आणलेल्या एका अल्पवयीन मुलीची श्रीराम पूर शहर पोलिसांनी अत्यंत शिताफीने सुटका करत मुख्य आरोपीसह तिघांना ताब्यात घेतले. कोणताही ठोस पत्ता किंवा तांत्रिक धागादोरा नसताना केवळ मुलीच्या छायाचित्राच्या आधारे राबविण्यात आलेल्या शोधमोहीमेत पोलिसांनी ही उल्लेखनीय कारवाई केली. या कामगिरीबद्दल श्रीरामपूर शहर पोलिसांचे सर्वत्र कौतुक होत आहे. या प्रकरणी शुभम नामदेव मिसाळ (वय २२, रा. आगर कानडगाव, ता. वैजापूर, जि. छत्रपती संभाजीनगर) याच्यासह त्याच्या दोन नातेवाईकांना ताब्यात घेण्यात आले आहे. नेकनूर पोलीस (पान ४ वर)

## गुन्हेगारीला चाप..!

# श्रीरामपूर पोलिसांची धडक कारवाई

### १२१ अट्टल गुन्हेगारांची 'ओळख परेड'

### आरोपींकडून २ लाखांचे जामीन बंधपत्र; गुन्हेगारांचे धाबे दणाणले



प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी, गुन्हेगारी प्रवृत्तींना आळा घालण्यासाठी आणि गुन्हेगारांमध्ये सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी पोलीस दलाने एक मोठी आणि धडक मोहीम हाती घेतली आहे. अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक मुम्मका एम. सुदर्शन यांच्या आदेशानुसार आणि श्रीरामपूरचे अपर पोलीस अधीक्षक सोम नाथ वाकचौरे यांच्या मार्गदर्शनाखाली उत्तर अहिल्यानगरमधील १७ पोलीस ठाण्यांच्या रेकॉर्डवरील तब्बल १२१ अट्टल गुन्हेगारांची शनिवारी (दि. ४ जुलै) विशेष 'ओळख परेड' घेण्यात आली.

या ओळख परेडसोबतच प्रतिबंधक कारवाई मोहीम आणि समुपदेशन कार्यशाळेचेही आयोजन करण्यात आले होते. पोलिसांच्या या धडक कारवाईमुळे परिसरात गुन्हेगारांचे धाबे दणाणले असून, नागरिकांमधून पोलिसांचे विशेष कौतुक होत आहे.

या मोहिमेदरम्यान हजर असलेल्या सर्व १२१ गुन्हेगारांचे प्राथमिक रित्या सविस्तर 'इंट्रॉगेशन फॉर्म' भरून घेण्यात आले. यामध्ये अत्यंत गोपनीय व महत्त्वाच्या बाबींची नोंद करण्यात आली,गुन्हेगारांचे कुटुंबीय आणि सद्यस्थिती,त्यांचे सध्याचे रोजगाराचे/कामाचे ठिकाणी, त्यांच्याकडे असणारी वाहने माहिती घेण्यात आली.

विशेष मोहिमेत रेकॉर्डवरील सर्व गुन्हेगारांवर कठोर प्रतिबंधक कारवाई करण्यात आली. कार्यकारी दंडाधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे यांच्या समक्ष भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (इछड) कलम १२९ अन्वये सर्व गुन्हेगारांकडून प्रत्येकी २ लाख रुपयांचे जामीन बंधपत्र लिहून (पान ४ वर)



शिक्षण क्षेत्रातील एक असामान्य व्यक्तीमत्व
शिक्षणमहर्षी
साहेबरावजी घाडगेपाटील
यांना प्रथम पुण्यस्मरणानिमित्त
विनम्र अभिवादन

रविवार दि.५ जुलै २०२६ | वेळ : सकाळी ९.०० वा.

किर्तन सेवा : ह.भ.प. वाणीभूषण समाधानजी महाराज शर्मा (केज)
यांचे सकाळी ९ ते ११ या वेळेत किर्तन होईल.

आपले विनित : ॲड.श्रीमती सुमतीताई घाडगेपाटील (अध्यक्षा, त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठाण)

सैनिकी वसतिगृहयुक्त शाळा
खडके नेवासाफाटा
त्रिमूर्ती संकुल, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर

सैनिकी वसतिगृहयुक्त शाळा
तेलकुडगाव
त्रिमूर्ती संकुल, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर

सैनिकी वसतिगृहयुक्त शाळा
घोगरगाव
त्रिमूर्ती संकुल, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर

सैनिकी वसतिगृहयुक्त शाळा
ढोरजळगाव-ने
त्रिमूर्ती संकुल, ता. शेवगाव, जि. अहिल्यानगर

सैनिकी वसतिगृहयुक्त शाळा
शेवगाव
त्रिमूर्ती संकुल, ता. शेवगाव, जि. अहिल्यानगर

श्रीरामपूर त्रिमूर्ती संकुल
वसतिगृह फक्त मुलींसाठी
कला-वाणिज्य व शास्त्र-ज्युनिअर कॉलेज,
लॉ कॉलेज व डी.एड्, कॉलेज

सैनिकी वसतिगृहयुक्त शाळा
धामणगाव रेल्वे
जि. अमरावती.

शिववैभव संकुल वर्धा

कार्यक्रम स्थळ : त्रिमुर्ती शैक्षणिक संकुल, तेलकुडगांव, ता.नेवासा, जि.अहिल्यानगर

# संपादकीय

## महिला शेतकरी : श्रमाला मिळालेली कायदेशीर ओळख

महाराष्ट्राच्या विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात मंजूर झालेले 'महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक – २०२६' हे केवळ आणखी एक विधेयक नाही; तर ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या केंद्रस्थानी लाखो महिलांच्या श्रमाला मिळालेली ऐतिहासिक कायदेशीर मान्यता आहे. स्वातंत्र्यानंतर तब्बल ७५ वर्षे ज्यांच्या कष्टावर शेती उभी राहिली, त्या महिलांना केवळ जमिनीची मालकी नसल्यामुळे 'शेतकरी' म्हणून ओळख मिळाली नाही. ही ऐतिहासिक विसंगती दूर करण्याचे धाडस महाराष्ट्राने केले आहे. त्यामुळे महिलांच्या आर्थिक स्वावलंबनाच्या दिशेने हे विधेयक एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. भारतात आर्थिकदृष्ट्या सक्रिय असलेल्या महिलांपैकी ८० टक्क्यांहून अधिक महिला प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे शेती व पूरक व्यवसायांशी जोडलेल्या आहेत. त्यापैकी जवळपास निम्म्या महिला कौटुंबिक शेतीत काम करतात, तर मोठा वर्ग कृषी मजूर म्हणून श्रम करतो. पशुपालन, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, मत्स्यपालन अशा कृषीपूरक व्यवसायांमध्येही महिलांचे योगदान मोलाचे आहे. मात्र, कृषी जनगणनेनुसार देशातील शेतजमिनींपैकी अवघी १३.९६ टक्के जमीन महिलांच्या नावावर आहे. प्रत्यक्ष लागवडीखालील क्षेत्राचा विचार केला, तर हे प्रमाण आणखी कमी म्हणजे ११.७२ टक्क्यांवर येते. परिणामी, शेतीत आयुष्य घालवूनही लाखो महिला सरकारी नोंदीत 'गृहिणी' किंवा 'मजूर' म्हणूनच राहिल्या. आपल्या देशातील बहुतांश कृषी धोरणे 'जमिनीचा मालक म्हणजे शेतकरी' या संकल्पनेवर उभी राहिली. ज्याच्या सातबारा, तोच शेतकरी अशी व्याख्या रूढ झाली. बँक कर्ज, पीकविमा, कृषी अनुदान, पीएम किसान यांसारख्या योजनाही त्याच निकषावर राबवल्या गेल्या. त्यामुळे शेतीत दिवस–रात्र राबणाऱ्या महिलांना सरकारी लाभांपासून वंचित राहावे लागले. 'पीएम किसान' योजनेतील महिला लाभार्थ्यांचे प्रमाण केवळ २५ टक्के असणे ही त्याचीच साक्ष आहे. वास्तव मात्र वेगळे आहे. ग्रामीण रोजगारासाठी पुरुषांचे शहरांकडे स्थलांतर वाढल्यामुळे शेतीची संपूर्ण धुरा महिलांच्या खांद्यावर आली. पेरणी, लावणी, कोळपणी, कापणी, पशुपालन, शेणखत, दुग्धव्यवसाय, घरकाम आणि कुटुंब व्यवस्थापन अशा अनेक जबाबदाऱ्या महिला पार पाडत राहिल्या. तरीही त्यांचे श्रम 'कौटुंबिक कर्तव्य' म्हणूनच पाहिले गेले. अर्थशास्त्राच्या परिभाषेत ज्या श्रमाला थेट मोबदला मिळत नाही, तो 'उत्पादक' मानला गेला हीच मानसिकता या विधेयकाने प्रथमच मोडीत काढली आहे. या कायद्यामुळे जमिनीची मालकी नसली, तरी शेती किंवा कृषीसंलग्न व्यवसायात कार्यरत असलेल्या महिलांना 'महिला शेतकरी' म्हणून स्वतंत्र कायदेशीर ओळख मिळणार आहे. ही केवळ नाममात्र ओळख नसून तिच्या माध्यमातून कर्ज, प्रशिक्षण, कृषी तंत्रज्ञान, विविध अनुदान योजना आणि राज्य महिला शेतकरी निधीचा लाभ दरवाजे उघडणार आहेत. पशुपालन, मत्स्यपालन, कुक्कुटपालन आणि इतर कृषीपूरक व्यवसाय करणाऱ्या महिलांनाही या कायद्याचा लाभ मिळणार आहे. त्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेतील महिलांचे योगदान प्रथमच अधिकृतपणे स्वीकारले जाणार आहे. विशेष म्हणजे, संयुक्त राष्ट्रांनी २०२६ हे वर्ष 'आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष' म्हणून घोषित केलेल्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राने हा कायदा मंजूर केला आहे. त्यामुळे आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरही या निर्णयाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. सामाजिक न्याय, महिला सक्षमीकरण आणि कृषी सुधारणा या तिन्ही अंगांनी हा निर्णय दूरगामी परिणाम करणारा ठरू शकतो. तथापि, या विधेयकाची खरी परीक्षा त्याच्या अंमलबजावणीत आहे. 'लाडकी बहीण' योजनेत अपात्र लाभार्थ्यांचा प्रश्न निर्माण झाला होता. त्याच धर्तीवर महिला शेतकरी प्रमाणपत्र राजकीय हस्तक्षेप, बनावट अर्ज किंवा प्रभावशाली कुटुंबांना प्राधान्य मिळण्याची शक्यता नाकारता येणार नाही. गावात केवळ जमीन असलेल्या, पण प्रत्यक्ष शेतीशी संबंध नसलेल्या शहरातील कुटुंबांतील महिलांनाही चुकीच्या पद्धतीने प्रमाणपत्र मिळाले, तर या कायद्याचा मूळ उद्देशच धोक्यात येईल. त्यामुळे पात्रतेचे निकष स्पष्ट, पारदर्शक आणि कठोर ठेवणे अत्यावश्यक आहे. ग्रामसभा, महसूल विभाग,  विभाग आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांच्यात समन्वय ठेवून पडताळणीची विश्वासार्ह यंत्रणा उभारावी लागेल. प्रमाणपत्र देताना प्रत्यक्ष शेतीतील सहभाग, कृषी व्यवसायातील सातत्य आणि स्थानिक पडताळणी यांना प्राधान्य दिले पाहिजे. अन्यथा राजकीय दबावाखाली खऱ्या गरजू महिला मागे पडतील आणि लाभ प्रभावशाली घटकांकडे वळेल. सरकारने थेट जमिनी महिलांच्या नावावर करण्याचा सक्तीचा मार्ग नाही. कारण त्यातून वारसा हक्क, कौटुंबिक वाद आणि जमिनीचे तुकडे होण्याचा धोका निर्माण झाला असता. त्यामुळे मालकी हक्काला धक्का न लावता 'महिला शेतकरी' म्हणून स्वतंत्र ओळख देण्याचा मध्यममार्ग सरकारने स्वीकारला आहे. सामाजिक वास्तव लक्षात घेतल्यास हा अधिक व्यवहार्य आणि स्वीकारार्ह पर्याय मानावा लागेल. 'लाडकी बहीण' योजनेनंतर ग्रामीण महिलांमध्ये विश्वास करणारा हा महायुती सरकारचा आणखी एक महत्त्वाचा निर्णय ठरू शकतो. मात्र, कोणत्याही कायद्याचे यश त्याच्या घोषणेत नसते, तर प्रभावी अंमलबजावणीत असते. महिला शेतकरी ही केवळ कागदावरील ओळख न राहता तिच्या हातात आर्थिक सामर्थ्य, निर्णयक्षमता आणि सन्मान पोहोचला, तरच या विधेयकाचे ऐतिहासिक महत्त्व सिद्ध होईल. महाराष्ट्राने आज एक नवा आदर्श केला आहे. आता या आदर्शाचे अनुकरण देशाने करावे आणि ग्रामीण भारताच्या खरी शक्ती असलेल्या महिला शेतकऱ्यांना न्याय देण्याची प्रक्रिया राष्ट्रीय स्तरावर सुरू व्हावी, हीच अपेक्षा.

# रामपूर येथे कृषीदिनानिमित्त मोफत कपाशी बियाणाचे वाटप

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोल्हार** : रामपूर (ता. राहुरी) येथे कृषीदिनाचे औचित्य साधून रामपूर येथील संत महिपती शेतकरी बचत गटाच्या सभासदांना कृषी विभागाच्या वतीने १०० बॅग्स कपाशी बियाण्यांचे मोफत वाटप करण्यात आले. कृषी सहाय्यक रणजित राऊत यांच्या हा उपक्रम राबविण्यात आला.

वितरण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ह.भ.प. आण्णासाहेब लोंढे महाराज होते. यावेळी ज्येष्ठ शेतकरी केशवराव लोखंडे, रावसाहेब पठारे, अरुण नालकर, बचत गटाचे अध्यक्ष ज्ञानदेव सरोदे, सेवानिवृत्त मुख्याध्यापक डॉ. अनिल लोखंडे, बापूराव सरोदे व सचिव संजय पठारे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.



प्रास्ताविकात डॉ. अनिल लोखंडे यांनी बचत गटामार्फत येणाऱ्या विविध सामाजिक व कृषीविषयक उपक्रमांची माहिती दिली. यावेळी कृषी सहाय्यक रणजित राऊत यांनी आधुनिक शेती, पीक व्यवस्थापन, माती परीक्षण, तणनियंत्रण, सेंद्रिय शेती, फळबाग लागवड तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय भाषणात आण्णासाहेब लोंढे महाराज यांनी बचत गटाच्या कार्याचे कौतुक करत शेतकऱ्यांच्या आर्थिक प्रगतीसाठी असे प्रेरणादायी असल्याचे सांगितले.

कार्यक्रमात रणजित राऊत व आण्णासाहेब लोंढे महाराज यांचा सत्कार करण्यात आला. तसेच प्रा. डॉ. अनिल लोखंडे यांची निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळाच्या उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांचाही शाल व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी रवींद्र नालकर, गजानन सरोदे, निलेश पठारे, गणेश पठारे, नालकर, बाळासाहेब पठारे, भाऊसाहेब सरोदे, सोमनाथ नालकर व भागीरथ नालकर यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमास बचत गटाचे सर्व सभासद व परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आभार प्रदर्शन रवींद्र नालकर यांनी केले.

# राहुरी –शनिशिंगणापूर रेल्वे मार्ग रद्द होण्यासाठी आ. अक्षय कर्डिले यांचे मुख्यमंत्र्यांना साकडे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : राहुरी–शनिशिंगणापूर प्रस्तावित रेल्वेमार्गामुळे राहुरी तालुक्यातील बागायती व सुपीक शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होणार असल्याने हा रेल्वेमार्ग तातडीने रद्द करण्यात यावा, अशी ठाम मागणी राहुरीचे आमदार अक्षय शिवाजीराव कर्डिले यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रत्यक्ष भेट घेऊन केली. यासंदर्भातील सविस्तर निवेदनही त्यांनी सादर केले.

राज्याचे जलसंपदामंत्री तथा पालकमंत्री ना.राधाकृष्ण पाटील यांच्या पुढाकाराने आयोजित बैठकीत अहिल्यानगर जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी उपस्थित होते. या बैठकीत आमदार कर्डिले यांनी स्थानिक शेतकऱ्यांच्या भावना मुख्यमंत्र्यांसमोर मांडताना, प्रस्तावित रेल्वेमार्गाला राहुरी तालुक्यातील शेतकऱ्यांचा तीव्र



विरोध असल्याचे स्पष्ट केले.

राहुरी तालुक्यातील सुपीक, बागायती व ऊसपट्ट्यातील मोठ्या क्षेत्रावर या रेल्वेमार्गाचा परिणाम होणार असून, अनेक शेतकऱ्यांच्या शेतीचे विभाजन होण्याची तसेच उपजीविकेवर परिणाम होण्याची भीती व्यक्त करण्यात आली. यापूर्वी विविध विकास प्रकल्पांसाठी अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी अधिग्रहित झाल्या असून, पुन्हा एकदा जमीन संपादनाच्या प्रक्रियेमुळे शेतकऱ्यांवर अन्याय होऊ नये, अशी भूमिका आमदार कर्डिले यांनी मांडली.

विकासाला विरोध नसून, तो शेतकऱ्यांच्या हिताला बाधा न आणता व्हावा, अशी भूमिका स्पष्ट करत प्रस्तावित राहुरी–शनिशिंगणापूर रेल्वेमार्ग करून शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी त्यांनी केली.

यावेळी आमदार कर्डिले यांनी पर्यायी उपाययोजनाही सुचविल्या. शनिशिंगणापूर येथे येणाऱ्या लाखो भाविकांच्या सोयीसाठी राहुरी रेल्वे स्थानकावर सर्व एक्सप्रेस व पॅसेंजर रेल्वे गाड्यांना थांबा देण्यात यावा. तसेच राहुरी रेल्वे स्थानक ते शनिशिंगणापूर दरम्यान नियमित, सुसज्ज व वारंवार बससेवा सुरू करून भाविकांना सुलभ सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी त्यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली.

या मागणीची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गांभीर्याने दखल घेत संबंधित विषयावर सकारात्मक भूमिका घेऊन योग्य तो मार्ग काढला जाईल, असे आश्वासन दिल्याची माहिती आ. अक्षय कर्डिले यांनी दिली आहे.

# आदिवासी उपयोजनेअंतर्गत ६५४ शेतकऱ्यांना मोफत सोयाबीन बियाण्यांचे वाटप

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** । महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांच्या सहकार्याने राष्ट्रीय बीज विज्ञान व तंत्रज्ञान संस्था, मऊ (उत्तर प्रदेश) यांच्या निधीतून कळवण तालुक्यातील बापखेडा येथे आदिवासी उपयोजनेअंतर्गत सोयाबीन बियाणे वाटप कार्यक्रम उत्साहात पार पडला.

महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांच्या नेतृत्वाखाली, संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके यांच्या मार्गदर्शनाखाली प्रमुख शास्त्रज्ञ (बियाणे) डॉ. नरेंद्र काशीद यांच्या नियोजनातून हा उपक्रम राबविण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बीजोत्पादन अधिकारी डॉ. कैलास भोईटे होते.

कुमसाडी, वीरशेत, धनोली, जिरवाडे, शेपूपाडा, ततानी, चापापाडा, सुळे, भारडमोक व विठेवाडी येथील एकूण ६५४ आदिवासी शेतकऱ्यांना विद्यापीठाने विकसित केलेल्या 'फुले दूर्वा' या सुधारित सोयाबीन वाणाचे १७० क्विंटल बियाणे मोफत करण्यात आले.

यावेळी डॉ. कैलास भोईटे यांनी आधुनिक सोयाबीन लागवड तंत्रज्ञान आणि सुधारित बियाण्यांच्या वापरामुळे उत्पादनवाढ व आर्थिक प्रगती कशी साधता येईल, याविषयी मार्गदर्शन केले. तर डॉ. कैलास गागरे यांनी सोयाबीन पिकासाठी बीजप्रक्रियेचे महत्त्व स्पष्ट केले.

# गणना प्रपत्र न भरल्यास मतदार यादीतून नाव वगळले जाणार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार २२३ राहुरी विधानसभा मतदारसंघात 'मतदार यादी विशेष सखोल पुनर्निरीक्षण कार्यक्रम २०२६' सुरू झाला आहे. ३० जून ते २९ जुलैदरम्यान मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) घरोघरी जाऊन गणना प्रपत्र (ईएफ) वितरित करून ते भरून घेणार आहेत. हे प्रपत्र अचूक भरून संबंधित बीएलओकडे जमा न केल्यास संबंधित मतदाराचे ५ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध होणाऱ्या प्रारूप मतदार यादीत समाविष्ट होणार नाही, अशी माहिती मतदार नोंदणी अधिकारी अनुपसिंह यादव यांनी दिली. प्रत्येक मतदाराने पासपोर्ट आकाराचा रंगीत फोटो व आवश्यक कागदपत्रे तयार ठेवावीत. कुटुंबातील एक सज्ञान व्यक्ती इतर सदस्यांच्या वतीनेही प्रपत्र भरू शकते. जन्मतारखेनुसार आवश्यक पुरावे सादर करणे बंधनकारक असून जन्म शाळा सोडल्याचा दाखला, पासपोर्ट, रहिवासी प्रमाणपत्र किंवा शासन, बँक व टपाल विभागाने दिलेली ओळखपत्रे ग्राह्य धरली जाणार आहेत.५ ऑगस्ट रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध होईल. त्यानंतर ५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर या कालावधीत दावे व हरकती स्वीकारल्या जातील, तर अंतिम मतदार यादी ७ ऑक्टोबर २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आहे. सर्व नागरिकांनी या विशेष पुनरीक्षण मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन तहसीलदार डॉ. अमित पवार यांनी केले आहे.

## घोडेगाव येथे कांदा स्थिर, कांदा आवक वाढली

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**घोडेगाव** - नेवासा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या घोडेगाव येथील उपवारात शनिवार (दि.४) रोजी झालेल्या लिलावात उत्तम प्रतीच्या एक अर्ध्या वकल साठी कांद्यास तीन हजार रुपये प्रति किलोचा भाव तर सरासरी कांद्यास २२ ते २५ रुपये प्रति किलो भाव मिळाल्याची माहिती कांदा

> गेल्या दोन–तीन आठवड्यापासून कांदा भाव स्थिर आहेत तसेच कांद्याला मोठ्या प्रमाणात मागणीही होत आहे. मात्र बाजारातील खराब माल संपल्यानंतर कांद्याची दर वाढ होऊ शकते तोपर्यंत शेतकऱ्यांनी चांगला माल कमी कमी प्रमाणात विक्रीस आणावा
> **(संभाजी पवार कांदा आडतदार घोडेगाव)**



आडतदार संतोष वाघ यांनी मागील आठवड्याच्या तुलनेने आवारात कांदा आवक वाढली असून यात खराब झालेल्या मालांची ही मोठ्या प्रमाणात आवक झाली होती. आवारात एकुण ६४ हजार दोनशे २२ गोण्यांची आवक झाली होती यात एक अर्ध्या वक्लकसाठी तीन हजार तर मोठा माल २५ ते २७ रुपये प्रति किलो तर दोन नंबर मलास २० ते रुपये प्रति किलोचा भाव मिळाला नंबर तीन या कांद्यास१६ ते १८ रुपये प्रति किलो तर गोल्टी कांद्यास १२ते १५ रुपये तर हलक्या कमी कलर व डागी मालास ४ ते १० रुपये प्रति किलोचा भाव मिळाला कोट – सध्या रिमझिम पाऊस पडत असल्याने कांदा खराब होण्याचे प्रमाण वाढले आहे आणि शेतकरी खराब माल विक्रीसाठी बाजारात आणत असल्याने ग्राहक कमी दर असलेला माल खरेदी करत असल्यामुळे चांगल्या मालाचे देखील दर वाढ होण्यास थांबली आहे.

# कोल्हारच्या भक्ती राकेचाची 'शक्तीसॅट' कार्यशाळेसाठी निवड

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोल्हार** : रयत शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल, कोल्हार येथील इयत्ता आठवीची विद्यार्थिनी भक्ती संतोष राकेचा हिची 'शक्तीसॅट' उपग्रह प्रकल्पांतर्गत नवी दिल्ली येथे होणाऱ्या आठ दिवसांच्या आंतरराष्ट्रीय कार्यशाळेसाठी निवड झाली आहे. महाराष्ट्रातून या कार्यशाळेसाठी निवड झालेली ती एकमेव विद्यार्थिनी असून, या यशामुळे कोल्हार गावासह विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. ऑक्टोबरमध्ये प्रक्षेपित होणाऱ्या 'शक्तीसॅट' उपग्रह प्रकल्पाच्या अनुषंगाने ऑगस्टपासून नवी दिल्ली येथे विशेष कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. या कार्यशाळेत जगातील १०८ देशांतील विद्यार्थिनींसह भारतातील २८ राज्यांमधून निवडलेल्या २० विद्यार्थिनी सहभागी होणार आहेत. या उल्लेखनीय यशाबद्दल विद्यालयात आयोजित कार्यक्रमात स्थानिक सल्लागर समितीचे अध्यक्ष ॲड. सुरेंद्र खर्डे यांच्या हस्ते भक्ती राकेचा हिचा सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना त्यांनी, हे यश केवळ तिचे किंवा विद्यालयाचे नसून संपूर्ण कोल्हार गावासाठी अभिमानास्पद आहे,'' असे सांगत तिचे व तिच्या पालकांचे अभिनंदन केले. ऱ्यक्रमास स्कूल कमिटी सदस्य बी. के. खर्डे, संतोष थेटे, बाबासाहेब नवाळे, अमित गुगळे, पर्यवेक्षिका संजीवनी आंधळे, मीना राकेचा, मनीषा राकेचा तसेच पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संग्राम यांनी तर आभार प्रदर्शन दीपक मगर यांनी केले.



# सुजाता इंटरनॅशनल स्कूलमध्ये कृषी दिन व डॉक्टर दिन उत्साहात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोनई** - येथील सुजाता इंटरनॅशनल स्कूलमध्ये कृषी दिन व डॉक्टर डे दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष सोनवणे होते. प्रमुख पाहुणे म्हणून स्थानिक नामवंत शेतकरी शिवाजीराव सोनवणे, वैद्यकीय क्षेत्रातील डॉ. तांदळे, आणि डॉ. साळुंखे उपस्थित होते. यावेळी महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व हरितक्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांनी कृषी क्षेत्राचे महत्त्व, आधुनिक शेती पद्धती, जलसंधारण आणि सेंद्रिय पद्धतीने शेती करणे याची माहिती सांगण्यात यानंतर राष्ट्रीय डॉक्टर दिनानिमित्त वैद्यकीय सेवेत कार्यरत डॉक्टरांचा सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांना आरोग्याचे महत्त्व, स्वच्छता, संतुलित आहार आणि नियमित व्यायाम याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तोडमल तर आभार प्रदर्शन जाधव यांनी मानले.

# अब्दुल शेख यांना 'राजमाता जिजाऊ उद्योग राज्यस्तरीय पुरस्कार'

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : पुणे येथील ऐतिहासिक लालमहाल येथे आयोजित भव्य पुरस्कार वितरण सोहळ्यात नेवासा तालुक्यातील कुकाणा येथील प्रसिद्ध उद्योजिका व सामाजिक कार्यकर्त्या सौ. तस्मिया अब्दुल शेख यांना त्यांच्या उल्लेखनीय सामाजिक व व्यावसायिक कार्याची दखल घेत 'राजमाता जिजाऊ उद्योग व्यावसायिक कर्तृत्ववान महिला राज्यस्तरीय पुरस्कार गौरविण्यात आले.



पुणे येथील लालमहाल येथे आयोजित सोहळ्यात तस्मिया अब्दुल शेख यांना 'राजमाता जिजाऊ उद्योग व्यावसायिक कर्तृत्ववान महिला राज्यस्तरीय पुरस्कार' प्रदान करताना उपस्थित मान्यवर.

राज्यात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या महिलांचा गौरव करण्याच्या उद्देशाने हा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्रदान करण्यात येतो. तस्मिया अब्दुल शेख यांना हा सन्मान मिळाल्याने कुटुंबीय, नातेवाईक, मित्रपरिवार तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.तस्मिया ह्या राष्ट्रवादीचे युवा नेते अब्दुल भैय्या शेख यांच्या पत्नी आहेत.

या सन्मानाबद्दल जिजाऊ समितीचे मनः पूर्वक आभार व्यक्त करण्यात आले. समितीने त्यांच्या कार्याची घेतलेली दखल ही प्रेरणादायी असून भविष्यात ही समाजोपयोगी व व्यावसायिक क्षेत्रात अधिक जोमाने कार्य करण्याचा निर्धार तस्मिया अब्दुल शेख यांनी व्यक्त केला.

या यशाबद्दल त्यांचे पती यांनी आनंद व्यक्त करत, तस्मियाच्या अथक परिश्रम, जिद्द आणि कर्तृत्वाचा आम्हा सर्वांना अभिमान ती भविष्यात ही समाजासाठी प्रेरणादायी कार्य करत राहो, हीच सदिच्छा, असे सांगितले.

# वैद्यकीय विद्यार्थ्यांचे योगदान कौतुकास्पद : डॉ. कोळपे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव** । वैद्यकीय शिक्षण म्हणजे केवळ पदवी मिळविणे नव्हे, तर रुग्णांचे प्राण वाचविण्यासाठी रात्रंदिवस परिश्रम, जिद्द, चिकाटी आणि सेवाभावाची जोपासना करावी लागते. त्यामुळे वैद्यकीय क्षेत्रातील विद्यार्थ्यांचे योगदान अत्यंत कौतुकास्पद आहे, असे प्रतिपादन डॉ. कोळपे नॉलेज सिटीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. प्रकाश कोळपे यांनी केले.




कोपरगाव तालुक्यातील कोळपेवाडी येथील कोळपे नॉलेज सिटीमध्ये राष्ट्रीय डॉक्टर्स डे आणि प्रथम वर्ष बी.ए.एम.एस. विद्यापीठ परीक्षेत यश मिळविलेल्या विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमास संस्थेच्या उपाध्यक्षा सुरेखा कोळपे, डॉ. धनंजय कोळपे, डॉ. गंगासागर कोळपे, प्राचार्य डॉ. प्रदीपकुमार जोंधळे, प्रशासकीय अधिकारी डॉ. महेश गवळी, मुख्य कार्यकारी संजय कापसे, डॉ. दिगंबर निंबाळकर तसेच सुप्रसाद हॉस्पिटलचे रवींद्र जोशी उपस्थित होते.

डॉ. कोळपे म्हणाले, विद्यार्थ्यांनी शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच चिकित्सीय कौशल्य, सेवाभाव आणि रुग्णांविषयी संवेदनशीलता जोपासली पाहिजे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी आपल्या गुणवत्तेच्या जोरावर मोठे यश मिळविले असून, शिक्षण पूर्ण झाल्यानंतर मोठ्या शहरांकडे न धावता गावाकडे परतून ग्रामीण भागातील आरोग्यसेवेला बळ कारण ग्रामीण भागातील एक सक्षम डॉक्टर हजारो नागरिकांसाठी जीवनदाता ठरतो. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. महेश गवळी यांनी, तर आभार प्रदर्शन प्राचार्य डॉ. प्रदीपकुमार जोंधळे यांनी केले.

# सागर बेग यांना पोलीस संरक्षण द्यावे ; सकल हिंदू समाजाचे निवेदन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** । राष्ट्रीय श्रीराम संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा श्रीरामपूर येथील रहिवासी सागर बेग यांना जीवितास धोका निर्माण झाल्याने तातडीने पोलीस संरक्षण उपलब्ध करून द्यावे, अशी सकल हिंदू समाजाच्या वतीने पोलीस प्रशासनाकडे निवेदनाद्वरे करण्यात आली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, सागर बेग व शिवसेनेचे नगरसेवक आकाश बेग हे अनेक वर्षांपासून हिंदुत्व, सनातन संस्कृती, राष्ट्रीय एकात्मता आणि विविध सामाजिक प्रश्नांवर संविधानाच्या चौकटीत राहून जनजागृतीचे कार्य करत आहेत. विविध मोर्चे, आंदोलने, सभा आणि जनप्रबोधन कार्यक्रमांमध्ये त्यांच्या सक्रिय समाजात त्यांचा मोठा जनसंपर्क निर्माण झाला असून, समाजविघातक व राष्ट्रविरोधी प्रवृत्तीच्या काही व्यक्तींमध्ये त्यांच्याविषयी वैमनस्य निर्माण झाल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे.

यापूर्वी पुणे येथील साखळी बॉम्बस्फोट प्रकरणातील आरोपी असलम उर्फ बंटी जहागीरदार हत्येप्रकरणात सागर बेग व त्यांच्या भावाचे नाव जोडण्यात आले होते. मात्र, पोलीस तपासात त्यांचा कोणताही संबंध स्पष्ट झाले होते, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.


त्यानंतर सोशल मीडियाच्या माध्यमातून जीवे मारण्याच्या तसेच घरावर बॉम्बहल्ला करण्याच्या धमक्या मिळत असल्याचा दावा करण्यात आला आहे. घराची संशयास्पद रेकी झाल्यानंतर पाकिस्तानस्थित कथित गुन्हेगारांनी सोशल मीडियावरून धमक्या दिल्याप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असल्याचेही म्हटले आहे.

त त्यांना कायमस्वरूपी पोलीस संरक्षण अथवा सुरक्षा रक्षक उपलब्ध करून द्यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. या निवेदनावर रोहन डहाळे, स्वयंम जंगम, शिवतेज राऊत, साहिल सुरवसे यांच्यासह अनेक नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय –कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, Emal ID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

द•ख•ल

## मुठेवाडगावच्या संत तुळशीराम महाराज पालखीचे १० जुलै रोजी प्रस्थान



**माळवाडगाव** : श्रीरामपूर तालुक्यातील मुठेवाडगाव येथील संत तुळशीराम महाराज आषाढी वारी पायी पालखी सोहळ्याचे हे ३२ वे वर्ष असून, शुक्रवारी (दि. १०) जुलै रोजी सकाळी ९ वाजता पंढरपूरकडे प्रस्थान होणार आहे. संतोष महाराज पवार यांच्या अधिपत्याखाली हा सोहळा नेवासा-अहिल्यानगर मार्गे मार्गस्थ होईल. अशी माहिती संस्थांनच्या वतीने सांगण्यात आले. या दिंडीचा पहिला टप्पा बेलपिंपळगांव, नेवासाफाटा, घोडेगांव, जेऊर बायजाई आणि अहिल्यानगर असा असेल. तर १५ जुलैपासून दुसऱ्या टप्प्यात करमाळा, टेंभुर्णी, करकंब मार्गे मंगळवार दि. २३ जुलै रोजी पालखी पंढरपूर (भटुंबरे) येथील मठात पोहोचेल. या दिंडी सोहळ्यात भाविकांसाठी चहा, नाष्टा, भोजन आणि रात्री कीर्तन-प्रवचनाचे उत्कृष्ट नियोजन करण्यात आले आहे.

## ८ जुलैला नेवासातून ग्रंथराज ज्ञानेश्वरी पालखीचे पंढरपूरकडे प्रस्थान

**नेवासा** : तीर्थक्षेत्र नेवासा येथील ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरीचे जन्मस्थान असलेल्या 'पैस' खांब मंदिरातून ग्रंथराज ज्ञानेश्वरी पालखी दिंडी सोहळ्याचे ८ जुलै रोजी पंढरपूरकडे प्रस्थान होणार असून, यासाठी जय्यत तयारी सुरू आहे. नेवासा ते पंढरपूर हा भक्तिमय प्रवास २२ जुलै रोजी श्रीक्षेत्र पंढरपूर येथे चंद्रभागा नदीत पादुका स्नान व समाजआरतीने पूर्ण होणार आहे. पालखीचा पहिला मुक्काम नेवासा मार्केट यार्ड येथे राहणार असून त्यानंतर वडाळा बहिरोबा, धनगरवाडी, अहिल्यानगर, रुईछत्तीसी, सीना शुगर मिल परिसर, नागलवाडी, चापडगाव, देवळाली, शेलगाव, कंदर, वेणेगाव, करकंब, टेंभुर्णी मार्गे पालखी पंढरपूरला पोहोचणार आहे. टेंभुर्णी येथे २१ जुलै रोजी भव्य गोल रिंगण होणार आहे. यंदाही हजारो वारकरी, भाविक आणि दिंड्यांचा या सोहळ्यात सहभाग अपेक्षित असून संपूर्ण प्रवास नामस्मरण, भजन, कीर्तन आणि भक्तिमय वातावरणात पार पडणार आहे. नवीन दिंडी सामाविष्ट करण्यासाठी संबंधितांनी श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान, नेवासा येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. पालखी सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी महंत वेदांताचार्य हभप देविदासजी महाराज म्हस्के शास्त्री, अध्यक्ष माजी आमदार पांडुरंग अभंग व विश्वस्त मंडळ तयारी करत आहे.

## पुणतांब्यात श्री हनुमान मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा संपन्न



**पुणतांबा** : राहाता तालुक्यातील पुणतांबा येथील संत जनार्दन स्वामी आश्रमात १ जुलै रोजी स्वामी रामागिरीजी महाराज व संतांच्या शुभहस्ते श्री हनुमान मूर्तीचा प्राणप्रतिष्ठा सोहळा उत्साहात संपन्न झाला. ३० जून रोजी मूर्तीची भव्य मिरवणूक काढण्यात आली होती. मंत्रोच्चारात अभिषेक, होम-हवन आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी मोठ्या संख्येने भाविक व ग्रामस्थ उपस्थित होते.

## संत तुकाराम विद्यालयात विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप



**राहूरी / श्रीरामपूर** : राहुरी तालुक्यातील बारागाव नांदूर येथील संत तुकाराम विद्यालयात श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अरुण तनपूरे यांच्याकडून शाळेसाठी ४ लाख रुपयांचे कंपाउंड मंजूर करण्यात आले आहे. राहुरी साखर कारखान्याचे संचालक गणेश गाडे यांच्या प्रयत्नातून हे काम होत आहे.

तसेच लोकवर्गणी व शिक्षक वर्गणीतून शाळेचे सुंदर रंगकाम करण्यात आले असून, मराठीचे शिक्षक राम कवाणे यांनी पाचवीच्या १४ गरजू विद्यार्थ्यांना गणवेश व शालेय साहित्याचे वाटप केले. मुख्याध्यापक प्रकाश तारडे व ज्येष्ठ शिक्षक प्रकाश राजुळे यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेचा शैक्षणिक व भौतिक विकास होत आहे. यावर्षी शाळेचा दहावीचा निकाल ९३.३३% लागला असून, जादा तास व क्रीडा सरावावर विशेष भर दिला जात आहे. या स्तुत्य उपक्रमांबद्दल संस्था पदाधिकारी, शिक्षक व पालकांनी सर्वांचे अभिनंदन केले आहे.

## स्व.मेजर साहेबराव घाडगे यांच्या स्मृती दिनानिमित्त आज तेलकुडगाव येथे कीर्तन सोहळा



**नेवासा** : त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठानचे संस्थापक शिक्षणमहर्षी मेजर स्वर्गीय साहेबराव घाडगेपाटील (आबा) यांच्या प्रथम स्मृती दिनाच्या निमित्ताने आज रविवारी (दि.५) जुलै रोजी सकाळी ९ वाजता नेवासा तालुक्यातील तेलकुडगाव येथील त्रिमूर्ती शैक्षणिक संकुलाच्या प्रांगणात किर्तन सोहळयाचे आयोजन करण्यात आले आहे.

त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठानच्या अध्यक्षा ड. सुमतीताई साहेबराव घाडगे आणि घाडगे परिवाराच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रथम स्मृती दिनाचे औचित्य साधून समाधा महाराज शर्मा यांचा' कीर्तन सेवा' सोहळा आयोजित करण्यात आलेला आहे. या सोहळ्यास नागरिक व हितचिंतकांनी तसेच शिक्षण क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित रहावे, असे आवाहन त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान व घाडगे परिवाराकडून करण्यात आले आहे.

# मुळा धरणाकडे १७३३ क्युसेसने पाण्याची आवक सुरु !

### पावसाचे प्रमाण असेच राहिल्यास पाण्याची आवक वाढण्याची शक्यता

**राजेंद्र परदेशी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : अहिल्यानगर जिल्ह्याची तहान भागविणाऱ्या मुळा धरणाच्या लाभधारकांसाठी दिलासादायक बातमी समोर आली आहे. जून महिन्यात तळ गाठणाऱ्या या मुळा धरणात जुलै महिन्याच्या सुरुवातीलाच नव्याने पाण्याची आवक सुरू झाली असून, धरण लाभक्षेत्रातील नागरिकांमध्ये व शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण पसरले आहे.



दोन दिवसांपासून मुळा धरणाच्या पाणलोट क्षेत्रात दमदार पाऊस झाल्यामुळे कोतूळ परिसरातून वाहणाऱ्या मुळा नदीतून मुळाधरणात नव्याने पाणी येण्यास सुरुवात झाली आहे. साधारणतः जून अखेर धरणात पाण्याची आवक सुरू होते. मात्र यावर्षी जुलै महिन्याच्या सुरुवातीलाच १३९३ क्युसेसने पाण्याची आवक सुरू झाली आहे. यावर्षी पावसाने डोळे वटारल्यामुळे जून महिन्यात अपेक्षित पाऊस झाला नसल्याने धरणातील पाणीसाठा आणि आगामी पाणीटंचाईबाबत मोठ्या प्रमाणात चिंता व्यक्त करण्यात येत होती. अशा परिस्थितीत धरणामध्ये नव्याने पाणी येऊ लागल्याने अहिल्यानगर शहरासह राहुरी, नेवासा, पाथर्डी आणि शेवगाव तालुक्यातील नागरिकांना यामुळे मोठा दिलासा मिळाला आहे. सध्या मुळा धरणाची पाणीपातळी १,७६१ फूट असून, एकूण पाणीसाठा ६,४०० दशलक्ष घनफूट (२४.७० टक्के) आहे.

तर उपयुक्त पाणीसाठा १,९०० दशलक्ष घनफूट (९ टक्के) इतका नोंदविण्यात आला आहे. जलसंपदा विभागाच्या कार्यकारी अभियंता सायली पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय अभियंता पी. व्ही. पाटील आणि उपअभियंता राजेंद्र पारखे हे मुळा धरणाच्या पाणीपातळीवर व धरणाकडे येणाऱ्या पाण्याच्या आवकेवर लक्ष ठेवून आहेत.

## योग्य नियोजनातून युवा शेतकऱ्याने केली शेवगा पिकाची लागवड

**सुधीर चव्हाण । राष्ट्र सह्याद्री**



**नेवासा** : ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्यातील कर्मचारी व नेवासा तालुक्यातील गिडेगाव येथील अभ्यासू शेतकरी राजेंद्र साळुंखे यांनी शेवगा पिकाद्वारे चांगला आर्थिक लाभ मिळवला आहे. यावर्षी एकरी सुमारे अडीच लाख उत्पन्न मिळेल असा अंदाज व्यक्त केला जात आहे. त्यांच्या शेवगा प्लॉटला कृषी शास्त्रज्ञ डॉ. अशोक ढगे यांनी भेट देऊन वार्तालाप केला. डॉ. ढगे म्हणाले, शेवगा पिकाला कीड व रोग नसल्यामुळे कीटकनाशकाची फवारणी करावी लागत नाही. त्यामुळे आरोग्याच्या दृष्टीने शेवगा शेंगा पौष्टिक व आरोग्यदायी आहेत. उत्पन्नाच्या संदर्भात साळुंखे यांनी माहिती देताना सांगितले की साडेपाच महिन्यातच भरपूर फुले येऊन शेंगा येण्यास सुरुवात झाली जागेवर गिऱ्हाईक येऊन शेंगा घेऊन जातात. एकूण एका एकरात तेराशे झाडे असून चार टनापर्यंत उत्पादन येईल त्यामुळे एकरी अडीच लाख उत्पन्न येईल हलक्या मुरमाड जमिनीत हे पीक उत्तम आले आहे. कृषी शास्त्रज्ञ डॉ. अशोक ढगे यांनी शेतात जाऊन शेवगा प्लॉटची पाहणी केली व प्रगतशील शेतकरी राजेंद्र साळुंखे यांचे कौतुक केले.

# दोन धोकादायक विहिरी बुजवण्यास प्रशासन व ग्रामपंचायतीला यश!

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आश्वी** : संगमनेर तालुक्यातील पिंप्री लौकी -अजमपुर ते पिंप्री फाटा या मुख्य रस्त्यावरील दोन अत्यंत धोकादायक विहिरी बुजवण्यास पिंपरी ग्रामपंचायत आणि प्रशासनाला मोठे यश आले आहे. भविष्यातील संभाव्य दुर्घटना ओळखून विहीर मालकांनी दाखवलेल्या सामंजस्यामुळे आणि प्रशासकीय तत्परतेमुळे या विहिरी बुजवण्यात आल्या असून, ग्रामस्थ, महिला व शालेय विद्यार्थ्यांमधून समाधान व्यक्त होत आहे. राज्यात रस्त्याच्या कडेला असलेल्या विहिरींमुळे अनेक निष्पाप नागरिकांना जीव गमवावा लागल्याच्या घटना घडल्या आहेत.



या पार्श्वभूमीवर पिंप्री लौकी अजमपुर येथे झालेल्या विशेष ग्रामसभेत सरपंच संगिता गिते यांनी गावातील धोकादायक विहिरींचा मुद्दा उपस्थित केला होता. यास ग्रामस्थांनी मोठा प्रतिसाद दिला. तसेच लावरे वस्ती येथील अमोल ज्ञानदेव लावरे व बबनराव भाऊसाहेब लावरे यांची सामाईक विहीर बुजवण्याबाबत ग्रामपंचायत व तलाठ्यांनी तहसीलदार आणि प्रांत कार्यालयाला अहवाल दिला होता. प्रशासनाने पाहणी करून तातडीने आदेश दिल्यानंतर, संबंधित शेतकऱ्यांनी लगेचच विहीर बुजवण्यास सुरुवात केली, पिंप्री फाटा-आश्वी रोड लगत असणारी रमेश देवराम गीते व बाळासाहेब देवराम गीते यांची धोकादायक विहीरही संबंधित शेतकऱ्यांनी स्वखर्चाने दोन दिवसांत दगड-मातीच्या साहाय्याने बुजवली.

यामुळे हा रस्ता रहदारीसाठी पूर्णपणे सुरक्षित व मोकळा झाला आहे.

या मोहिमेसाठी संगमनेरचे प्रांतधिकारी उंडे, तहसीलदार धीरज मांजरे, कामगार तलाठी वाकडे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. तसेच राज्याचे जलसंपदा मंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनामुळे ही मोहीम यशस्वी झाली. या धोकादायक विहिरी बुजवण्याच्या या महत्त्वपूर्ण कामात सरपंच संगीता गिते, माजी सरपंच भिका गिते, विकास सोसायटीचे माजी चेअरमन प्रभाकर दातीर, सामाजिक कार्यकर्ते भाऊसाहेब लावरे, चेअरमन सिताराम दातीर, लक्ष्मण गिते, तानाजी गिते, मारुती गिते, शंकरदादा लावरे, उपसरपंच बाजीराव गिते, माधवराव गिते आदी ग्रामस्थांनी सक्रिय सहभाग व सहकार्य दर्शवले.

### गावाच्या विकासासाठी सर्वांनी एकत्र यावे

पिंप्री लौकी अजमपुर या गावाचा भौगोलिक विस्तार मोठा असून, पिंप्री फाटा ते दरा दरम्यानच्या ११ किलोमीटरच्या मुख्य रस्त्यावरून रोज हजारो प्रवासी आणि शालेय विद्यार्थी ये-जा करतात. संभाव्य धोके ओळखून प्रशासनाने व संबंधित शेतकऱ्यांनी दाखवलेले सहकार्य कौतुकास्पद आहे. गावाच्या सर्वांगीण विकासासाठी भविष्यातही सर्वांनी असेच सहकार्य करावे.

**भारतराव गिते (सामाजिक कार्यकर्ते व भाजपा जिल्हा सरचिटणीस)**

## प्रहारकडून 'मराठी शाळा वाचवा' अभियान; नागरिकांच्या सूचना शासनाकडे पाठविणार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते तथा माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांच्या ५ जुलै रोजी होणाऱ्या वाढदिवसानिमित्त प्रहार सामाजिक संघटना, अहिल्यानगरच्या वतीने 'मराठी शाळा वाचवा' अभियान राबविण्यात येणार असल्याची माहिती युवक जिल्हाध्यक्ष ड. पांडुरंग औताडे यांनी दिली. राज्यात मराठी माध्यमाच्या शाळांमधील घटती विद्यार्थीसंख्या, अनेक शाळांवर आलेले बंद होण्याचे संकट, शिक्षकांच्या रिक्त पदांची समस्या आणि शिक्षणाचे वाढते खासगीकरण या विषयांवर जनजागृती करण्यासाठी हे अभियान हाती घेण्यात आले आहे. औताडे म्हणाले, इंग्रजी माध्यमालाच गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे प्रतीक मानण्याची प्रवृत्ती वाढल्याने अनेक पालक आर्थिक अडचणी असूनही खासगी शाळांकडे वळत आहेत. परिणामी मराठी शाळांतील विद्यार्थीसंख्या कमी होत असून ग्रामीण भागातील शिक्षण व्यवस्थेवर त्याचा विपरीत परिणाम होत आहे. मराठी भाषा, संस्कृती आणि सर्वसामान्यांना परवडणारे शिक्षण टिकवण्यासाठी मराठी शाळा सक्षम करणे आवश्यक आहे. मराठी शाळांचा दर्जा उंचावणे, पालकांचा विश्वास वाढवणे, आधुनिक शिक्षण उपलब्ध करणे आणि शिक्षकांच्या रिक्त पदांचा प्रश्न सोडविण्यासंदर्भातील सूचना नागरिकांनी व्हॉट्सॲप किंवा संदेशाद्वारे ९८९०२७३६५६ या क्रमांकावर पाठवाव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे. प्राप्त सूचना संकलित करून शासनाकडे सादर करण्यात येणार असल्याचे औताडे यांनी सांगितले. अभियानात सहभागी होण्याचे आवाहन प्रहारच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

## पिंपळगाव खांड धरण ओव्हरफ्लो मुळा पाणलोटात संततधार सुरूच

### अखेर पिंपळगाव खांड लघू पाटबंधारे प्रकल्प भरला

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अकोले / झरेकाठी** : अकोले तालुक्यातील मुळा पाणलोट क्षेत्रात सुरू असलेल्या पावसाने मुळा नदीवरील अंबित पाठोपाठ आता पिंपळगाव खांड धरण ओव्हरफ्लो झाले आहेत. मुळा नदीवरील १९३ दशलक्ष घनफूट क्षमतेचे आंबित धरण तीन दिवसापूर्वी भरले, त्यानंतर शुक्रवारी ६०० दशलक्ष घनफूट साठवण क्षमतेचे पिंपळगाव खांड धरण ओव्हरफ्लो झाले, या वर्षीच्या पावसाळ्यात अकोल्यातील हे दुसरे धरण भरले आहे. पिंपळगाव खांड धरणातील पाणीसाठा आता राहुरी तालुक्यातील मुळा धरणाकडे झेपावला आहे.मुळा नदी पाणलोट क्षेत्रात पावसाचा जोर टिकून असल्याने मुळेचा प्रवाह कालपासून वाढला, यामुळे पिंपळगाव खांड धरण भरले. धरणातील जलसाठा आता नागरिकांचे आकर्षण बनले आहे. या परिसरातील या अथांग जलाशयाचे निसर्ग सौंदर्य याकडे लोक आकर्षित होऊ लागले आहे. २६ टीएमसी साठवण क्षमतेचे मुळा धरणाकडे आता मुळा नदीपात्रातून आवक सुरू झाली आहे. दरम्यान मुळा पाणलोटात आज मात्र पावसाचा जोर काहीसा वाढला आहे. अखेर पिंपळगाव खांड लघू पाटबंधारे प्रकल्प भरून पाणी मुळा धरणाकडे संध्याकाळी मुळा धरणात पाणी पोहचेल अशी शक्यता वर्तवली जात आहे.



## विद्यार्थ्यांनी घेतला वारीसेवेत समाजसेवा व संस्कारांचा अनुभव

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर** : गुणवत्तापुर्ण शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांमध्ये समाजाप्रती कर्तव्यभावना, सेवाभाव आणि संस्कार रुजावेत या उद्देशाने लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या सिंधूछाया शैक्षणिक संकुलाच्या वतीने विश्वगुरू निवृत्तीनाथ महाराज पायी दिंडी पालखी सोहळ्यात विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आले.




श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर ते श्रीक्षेत्र पंढरपूर या दिंडी मार्गावर वारकऱ्यांना आरोग्य सेवा, जनजागृती आणि विविध सुविधा उपलब्ध करून देत विद्यार्थ्यांनी समाजसेवेचा प्रेरणादायी आदर्श घालून दिला. या उपक्रमात सिंधूछाया शैक्षणिक संकुलातील विविध शाळा व महाविद्यालयांतील विद्यार्थी, राष्ट्रीय सेवा योजना (छडड) स्वयंसेवक, शिक्षक, प्राध्यापक आणि कर्मचारी मोठ्या उत्साहाने सहभागी झाले.

वारकऱ्यांची आरोग्य तपासणी, मोफत औषधांचे वितरण, आरोग्यविषयक जनजागृती, पर्यावरण संवर्धनाचा संदेश तसेच स्वच्छतेबाबत प्रबोधन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी वारकऱ्यांची सेवा करताना वारीची समृद्ध परंपरा, अध्यात्म, संस्कृती आणि सामाजिक ऐक्य यांचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. शिक्षणाबरोबरच समाजाचे आपण काहीतरी देणे लागतो, ही भावना विद्यार्थ्यांच्या मनात रुजविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य या उपक्रमातून घडले. वारकऱ्यांनीही विद्यार्थ्यांच्या सेवाभावी वृत्तीचे कौतुक करत प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या या उपक्रमाचे स्वागत केले.

शिक्षण, संस्कार, समाजसेवा आणि सांस्कृतिक जतन यांचा सुंदर संगम घडविणारा हा उपक्रम सर्वांसाठी प्रेरणादायी ठरला. यावेळी संकुलातील डी व बी फार्मसीचे प्राचार्य डॉ. विजय तांबे, नर्सिंग कॉलेज प्राचार्य डॉ. बाळासाहेब घुले, प्राचार्य डॉ. सारंग पांडे, प्राचार्या डॉ. चारूशिला भंगाले, प्राचार्य डॉ. बोरनारे, प्राचार्य डॉ. प्रशांत लोखंडे, प्राचार्या डॉ. सुनिता बारी, सीईओसचिव डॉ. राणा महाजन, डॉ. राहुल सोनटक्के, विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षक, कर्मचारी आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक उपस्थित होते.

फौजदारी प्रक्रिया सहिता कलम ८२ प्रमाणे,
कोर्ट. नं. ४ अति. मुख्य न्यायदंडाधिकारी, संगमनेर
ने.ता. १३/०८/२०२६
दि. ०२/०७/२०२६

ॲड. एस. ए. हासे
संगमनेर कोर्ट, संगसमनेर
ता. संगमनेर, जि.अ.नगर

### जाहिर नोटीस

मे. अतिरीक्त मुख्य न्याय दंडाधिकारी साहेब, संगमनेर
यांचे कोर्टात

एस.सी.सी.नं. ९९५/२०२०

ज्योती कैलास आडकी - **फिर्यादी**

**विरुध्द**

श्रीराम कुरीज प्रा. लि. तर्फे व करीता प्रशांत लक्ष्मण दातीर - **आरोपी**

प्रति,

यात फिर्यादी यांनी आरोपी यांचे विरुध्द भारतीय चलनक्षक कायदा कलम १३८ अन्वये फौजदारी केस दाखल केलेली आहे. यामध्ये आरोपी विरुध्द अटकेचे वॉरंट काढण्यात आलेले आहे आणि सदरहू आरोपी हे सापडत नाहीत असा त्या वॉरंटवर पोलिसांचा जबाब आलेला आहे आणि अद्यापदेखील आरोपी पोलिसांना मिळुन आलेला नाही अगर सदरहू वॉरंट आरोपीवर बजाविले जाऊ नये म्हणुन आरोपी लपालपी करत असे. या कोर्टास खात्रीपुर्वक दाखविण्यात आले आहे.

त्यापेक्षा असा जाहिरनामा करण्यात येत आहे की, सदरहू आरोपी नामे श्रीराम कुरीज प्रा. लि. तर्फे व करीता प्रशांत लक्ष्मण दातीर, रा. लक्ष्मी नगर, संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर यास दिसेल तेथे अटक करून या कोर्टासमोर हजर करण्यासंदर्भात संगमनेर शहर पोलिस स्टेशन, संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर यांना आदेश करण्यात आलेले आहे. पुढील ता.१३/०८/२०२६ रोजी सदरहू आरोपी यांनी जाब देणेसाठी या कोर्टापुढे (माझ्यापुढे) हजर झाले पाहिजे.

येणेप्रमाणे घोषणा असे. आज ता. ०२/०७/२०२६ रोजी माझे सहीने न्यायालयाचे शिक्यानिशी दिले असे.

ठिकाण - संगमनेर
दि. ०२/०७/२०२६,

(शिक्का)

**मे. अतिरीक्त मुख्य न्याय दंडाधिकारी साहेब, संगमनेर**

# चालत्या ओमनीला अचानक लागली आग

### प्रवरा मेडिकलच्या सुरक्षामुळे मोठा अनर्थ टळला

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लोणी** : प्रवरानगर राहाता तालुक्यातील लोणी शिवारात शुक्रवारी सायंकाळी घडलेल्या एका थरारक घटनेत चालत्या ओमनी कारला अचानक आग लागली होती. त्यावेळी वाहनातून धुराचे लोट आणि आगीच्या ज्वाला उसळत असतानाच प्रवरा मेडिकल ट्रस्टच्या गेट क्रमांक दोन वरील सुरक्षा रक्षकांनी दाखविलेल्या धाडस, प्रसंगावधान आणि तत्परतेमुळे वाहनातील सर्व प्रवाशांची सुखरूप सुटका करण्यात यश मिळविले.त्यामुळे संभाव्य मोठी जीवितहानी टळल्याने सुरक्षा पथकाच्या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.




मिळालेल्या माहितीनुसार, संगमनेरहून राहुरीच्या दिशेने निघालेली एमएच-०४ एसजे-१२९० क्रमांकाची ओमनी कार प्रवरा मेडिकल ट्रस्टच्या गेट क्रमांक दोन समोर आली असताना वाहनाच्या वायरिंगमध्ये अचानक शॉर्टसर्किट झाले. काही क्षणांतच इंजिनच्या भागातून धूर बाहेर पडू लागला आणि त्यानंतर आगीने उग्र रूप धारण केले. भरधाव वाहनातून उठणाऱ्या ज्वाळा पाहताच परिसरात एकच खळबळ उडाली. रस्त्यावरील वाहनचालक आणि नागरिकांनीही सुरक्षित अंतर राखत धावपळ सुरू केली. घटनेची माहिती मिळताच गेटवरील सुरक्षा रक्षकांनी क्षणाचाही विलंब न करता घटनास्थळी धाव घेतली.

सर्वप्रथम वाहनातील महिला, लहान मुले आणि इतर प्रवाशांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले. त्यानंतर संस्थेत उपलब्ध असलेल्या अग्निशमन यंत्रांचा वापर करून आगीवर नियंत्रण मिळविण्याचे प्रयत्न सुरू करण्यात आले. अवघ्या काही मिनिटांत आग पूर्णपणे विझविण्यात यश आल्याने वाहनाचा स्फोट होण्याची किंवा आग इतर वाहनांपर्यंत पसरण्याची शक्यता टळली होती. या बचावकार्यात फायर ऑफिसर विकास माळी, ए. व्ही. शेळके, जी. डी. कांगणे तसेच सुपरवायझर जे. पी. शेख यांनी अत्यंत धाडसाने आणि समन्वयाने काम करत परिस्थिती नियंत्रणात आणली.

त्यांच्या तातडीच्या निर्णयक्षमतेमुळे वाहनातील सर्व प्रवाशांचे प्राण वाचले आणि संभाव्य मोठी दुर्घटना टळली. घटनेनंतर प्रवरा मेडिकल ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र विखे पाटील, उपसंचालक (व्यवस्थापन) ध्रुव विखे पाटील, आस्थापना अधिकारी विलास घुले, उपसुरक्षा अधिकारी बापूसाहेब उगले तसेच सुरक्षा अधिकारी डी. व्ही. वाकचौरे यांनी सुरक्षा रक्षक व फायर टीमच्या धाडसी कार्याचे विशेष कौतुक केले. संकटाच्या क्षणी दाखविलेल्या तत्परतेमुळे मोठा अनर्थ टळल्याची भावना त्यांनी व्यक्त करत संबंधित कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले. या घटनेने आपत्कालीन परिस्थितीत प्रशिक्षित सुरक्षा यंत्रणा आणि त्वरित प्रतिसाद किती महत्त्वाचा असतो, याची पुन्हा एकदा प्रचिती दिली.

सुरक्षा पथकाच्या धाडसी आणि जबाबदार कामगिरीमुळे परिसरातील नागरिकांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, त्यांच्या प्रसंगावधानामुळे अनेक कुटुंबांवर ओढवणारे संकट टळल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

## पान १ वरुन

### कांदा खरेदी दरात अडीचशे रुपयांनी वाढ

केंद्र सरकारच्या किंमत स्थिरीकरण निधी योजने अंतर्गत २ लाख मेट्रिक टन कांदा खरेदीचे उद्दिष्ट ठेवत मे महिन्यात १ हजार २३५ रुपये प्रतिक्विंटल दराने नाफेड व एन.सी.सी.एफ मार्फत कांदा खरेदी सुरू करण्यात आली. मात्र बाजारभावापेक्षा कमी दर मिळत असल्याने शेतकऱ्यांनी शासकीय कांदा खरेदी केंद्रांकडे पाठ फिरवल्याने मागील दोन महिन्यात केवळ ७ हजार मेट्रिक टन कांदा खरेदी करण्यात आला आहे. नाफेड व एन.सी.सी.एफ.मार्फत कांदा खरेदी का वाढत नाही याचा आढावा घेण्यासाठी नाशिकचे जिल्हाधिकारी आयुष्य प्रसाद यांनी लासलगाव बाजार समितीत बैठक घेतली. त्या दरम्यान शासकीय दरापेक्षा बाजार समितीमध्ये अधिक दर मिळत असल्याने शेतकरी कांदा विक्री करत नसल्याचे लक्षात आल्यानंतर आज कांदा दरात तब्बल २५० रुपये प्रतिक्विंटल अधिकचा दर देत १९७५ रुपये दराने सुरू असलेली कांद्याची खरेदी आता २१२५ रुपये प्रतिक्विंटल दराने करण्यात येणार आहे. दरम्यान, केंद्र व राज्य सरकारने ३ हजार रुपये प्रति क्विंटल दराने कांद्याची खरेदी करावी ही मागणी आजही कांदा उत्पादक शेतकऱ्यांची कायम आहे.

### राज्य सरकारला ८ आठवड्यात निर्णयाचे खंडपीठाचे निर्देश

आर्थिक व्यवहारांची ईडी-सीबीआयमार्फत चौकशी व स्वतंत्र लेखापरीक्षणाची मागणी करण्यात आली होती.या निवेदनावर काही निर्णय न झाल्याने सचिन दरंदले यांच्या वतीने ॲड.उमाकांत वाघ यांनी मुबंई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात जनहित याचिका दाखल करण्यात आली होती.यासाठी याचिकाकर्ते सचिन दरंदले यांनी ५ लाख रुपये रक्कम खंडपीठात जमा केली होती.

यावर (दि.२ ) जुलै रोजी औरंगाबाद खंडपिठाचे न्यायमूर्ती नितीन बी. सूर्यवंशी आणि न्यायमूर्ती आबासाहेब डी.शिंदे यांच्या खंडपीठाने राज्य शासनाला ८आठवड्याच्या निश्चित कालमर्यादेत निर्णय घेण्याचे निर्देश देत याचिकाकर्त्यांनी जमा केलेली पाच लाख रुपयांची रक्कम व्याजासह परत करण्याचे आदेश दिले आहेत. मात्र, कथित गैरव्यवहारांच्या आरोपावर न्यायालयाने कोणतेही भाष्य केलेले नाही.याबाबत राज्य सरकारच्या मुख्य सचिव यांना येत्या ८आठवड्यात याचिकाकर्ते दरंदले यांच्या निवेदनावर निर्णय घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

याचिकाकर्ते सचिन दरंदले यांच्या कडून ॲड.उमाकांत यु. वाघ यांनी काम पाहिले तर सरकारी पक्षाकडून सरकारी वकील एन.एस टेकाळे यांनी बाजू मांडली.आता राज्य सरकार उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार आठ आठवड्यात याचिकाकर्ते यांचे निवेदनातील आरोप व मागण्या बाबत बाजू ऐकूण घेऊन यावर कायदेशीर विचार करून काय निर्णय घेणार.शनिशिंगणापूर देवस्थान प्रकरणात राज्य शासन आता पुढे नेमकी कोणती भूमिका घेते याकडे परिसरातील व राज्यभरातील शनिभक्तांचे लक्ष लागले आहे

### गुन्हेगारीला चाप! श्रीरामपूर पोलिसांची धडक कारवाई

घेण्यात आले आहे. पुढील २ वर्षांच्या कालावधीत जर या आरोपींनी पुन्हा कोणताही गुन्हा केला, तर त्यांच्याकडून २ लाख रुपयांची रक्कम वसूल करून शासन जमा केली जाईल. तसेच, ही रक्कम न भरल्यास थेट न्यायालयीन कोठडीत रवानगी केली जाईल, अशी कडक समज पोलिसांनी दिली आहे. उत्तर अहिल्यानगर भागातील विविध पोलीस ठाण्यांतर्गत गंभीर गुन्हे दाखल असलेले एकूण १२१ आरोपी या परेडसाठी हजर होते.यामध्ये खून आणि दरोडा, जबरी चोरी, घरफोडी आणि चोरी, शरीराविरुद्धचे गुन्हे, आर्म्स ॲक्ट (शस्त्र कायदा) अंतर्गत गुन्हेगाराने येणाऱ्या पुन्हा नवीन गुन्हा केल्यास जुन्या गुन्ह्यातील जामीन तात्काळ रद्द केला जाईल, नवीन गुन्ह्यात सहभाग आढळल्यास थेट 'तडीपार' किंवा 'मोक्का' सारखी अत्यंत गंभीर कारवाई होईल. कोणत्याही गुन्हेगाराने सोशल मीडियावर भाईगिरी, दहशत किंवा गुन्हेगारीचे उदात्तीकरण करणारे व्हिडिओ किंवा पोस्ट शेअर केल्यास कडक कारवाई होईल, सर्व आरोपींना पुढील ६ महिन्यांसाठी दर मंगळवारी सकाळी ११:०० वाजता कार्यकारी दंडाधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, श्रीरामपूर यांच्या कार्यालयात हजेरी लावणे बंधनकारक करण्यात आले आहे. इतर कोणत्याही गुन्हेगाराची माहिती असल्यास ती गोपनीय पद्धतीने पोलिसांना देण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले.

सदरची धडक आणि यशस्वी कारवाई अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक मुम्मका एम. सुदर्शन, श्रीरामपूरचे अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे, श्रीरामपूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर, संगमनेरचे कुणाल सोनवणे, शिर्डीचे अमोल भारती, आणि शेवगावचे निरज राजगुरू यांच्या थेट मार्गदर्शनाखाली उत्तर अहिल्यानगरमधील सर्व पोलीस ठाण्यांच्या प्रभारी अधिकाऱ्यांनी व पोलीस निरीक्षक मिळून करण्यात आली आहे.

### श्रीगोंद्यात गुजरातच्या तरुणाची २ लाखांची लूट

याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेली माहिती अशी की, गुजरातमधून आलेल्या एका रिक्षाचालकाला सोने दाखवण्याच्या बहाण्याने बोलावून तब्बल दोन लाख रुपये लुटल्याचा, तसेच त्याच्या दोन मित्रांनाही बेदम मारहाण करून त्यांच्याकडील रोकड हिसकावल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे.

एवढ्यावरच न थांबता, पोलिसांत तक्रार केली तर जिवंत सोडणार नाही, अशी धमकी देत आरोपी पसार झाल्याचे फिर्यादीत नमूद आहे.या प्रकरणी गोविंद जतनभाई सोलंकी (वय २४, रा. अहमदाबाद, गुजरात) यांनी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून गुन्हा क्रमांक ६६३/२०२६ अंतर्गत भारतीय न्याय संहिता (इछड) कलम ११९(१), ११५(२), ३५२, ३५१(२) आणि ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादीनुसार, ३ जुलै रोजी दुपारी बांगर्डा शिवारात ओळखीचे नम्या उर्फ मोहन रहेमान भोसले, अशोक किंद्राश्या भोसले, महावीर रहेमान भोसले (सर्व रा. गोसावीवाडी, ता. श्रीगोंदा) आणि नशीबा उर्फ नशीब्या (रा. दौंड, जि. पुणे) यांनी फिर्यादीला सोने दाखवून त्याच्याकडे किती पैसे आहेत, अशी विचारणा केली. फिर्यादीने दोन लाख रुपये असल्याचे सांगताच, आरोपींनी शिवीगाळ व धक्काबुक्की करत त्याच्या काळ्या बॅगेतील दोन लाख रुपयांची रोकड जबरदस्तीने हिसकावून घेतल्याचा आरोप आहे.

घटनेनंतर फिर्यादीचे मित्र चमन आणि अर्जुन जीव वाचवण्यासाठी पळू लागले. मात्र आरोपींनी त्यांचाही पाठलाग करून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली आणि त्यांच्या जवळील रोकडही हिसकावून घेतल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

### बीडच्या मुलीची श्रीरामपूरमधून सुटका

ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम १३७(२) अन्वये गुन्हा (रजि. क्र. २५३/२०२६) दाखल असून त्याचा तपास सुरू होता.या गुन्ह्याच्या तपासासाठी नेकनूर पोलीस ठाण्याचे पोलीस अंमलदार व्ही. ए. क्षीरसागर आणि एच. एम. कदम हे शनिवारी (४ जुलै) सकाळी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात दाखल झाले. आरोपीने अल्पवयीन मुलीला श्रीरामपूर परिसरात आणल्याची गोपनीय माहिती होती; मात्र तिचा अचूक ठावठिकाणा उपलब्ध नव्हता.घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस निरीक्षक विशाल खैरे यांनी तात्काळ अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर यांना माहिती दिली. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाची नियुक्ती करून केवळ मुलीच्या छायाचित्राच्या आधारे शहरभर शोधमोहीम सुरू करण्यात आली.अखेर संजयनगर (वॉर्ड क्रमांक १) परिसरातून अल्पवयीन मुलीची सुखरूप सुटका करण्यात पोलिसांना यश आले. याचवेळी मुख्य आरोपी शुभम मिसाळ व त्याच्या दोन नातेवाईकांना ताब्यात घेण्यात आले. पुढील कायदेशीर कारवाईसाठी पीडित मुलगी आणि तिन्ही अरोपींना नेकनूर पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले.ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक विशाल खैरे, पोलीस उपनिरीक्षक रोशन निकम, पोलीस अंमलदार मच्छिंद्र कातखडे, संपत बडे, अमोल पडोळे, अजित पटारे, अमोल गायकवाड, ज्ञानेश्वर वाघमोडे, सचिन दुकळे, सागर बनसोडे, रवींद्र शिंदे तसेच नेकनूर पोलीस ठाण्याचे व्ही. ए. क्षीरसागर आणि एच. एम. कदम यांच्या पथकाने यशस्वीपणे पार पाडली.

# लासूर -गंगापूर- रोडचे काम संथ गतीने सुरू, अरुंद रस्त्यामुळे बस गाड्या प्रमाणात वाढ

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**गंगापूर** : देवगाव-लासूर-गंगापूर राज्य महामार्गाची दुरवस्था; रस्त्यात अडकल्या तीन एसटी बस संथगतीने सुरू असलेल्या कामामुळे प्रवाशांचा जीव धोक्यात देवगाव (प्रतिनिधी) : देवगाव-लासूर-गंगापूर या महत्त्वाच्या राज्य महामार्गावरील रस्त्याचे काम संथगतीने सुरू असल्याने नागरिकांसह वाहनधारकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. पावसामुळे रस्ता अधिकच खराब झाला असून अनेक तो अरुंद झाल्याने दोन वाहने एकाच वेळी पास होणे कठीण झाले आहे. परिणामी शनिवारी (४ जुलै) तीन एसटी बस रस्त्याच्या कडेला चिखलात अडकल्या.

> गंगापूर रस्त्याचे काम सुरू असून रस्ता खोदून ठेवल्याने रस्ता अरुंद झाला आहे. सध्या पाऊसाळा सुरू आहे. त्यामुळे दोन वाहने एकाच वेळी पास होत नसल्याने बस गाडी साईट पंख्यात गेल्यावर फसत असून बस गाडी पल्टी होण्याची शक्यता नाकारता येत नाही स्थानिक लोकप्रतिनिधींनी लक्ष घालून या रस्त्याचे काम लवकरात लवकर पूर्ण जेणेकरून प्रवाशांना त्रास होणार नाही.
>
> **--विजय बोरसे-**
> **आगार व्यवस्थापक गंगापूर,**

त्यामुळे प्रवाशांना अन्य वाहनांचा आधार घेऊन पुढील प्रवास करावा लागला.

या रस्त्याच्या कामाला जवळपास वर्षभर पूर्ण होत आले असले तरी केवळ सहा ते सात किलोमीटरचेच काम झाले असून तेही अनेक ठिकाणी अर्धवट आहे. चार महिन्यांपासून अनेक ठिकाणी रस्ता खोदून ठेवण्यात आल्याने लहान-मोठे अपघात सातत्याने घडत आहेत. शासकीय कर्मचारी, शाळकरी विद्यार्थी, शेतकरी आणि अन्य वाहनधारकांना गंगापूरकडे ये-जा करताना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

सध्या सुरू असलेल्या पावसामुळे रस्त्याच्या कडेला खोल चिखल साचला असून एसटी बस उलटण्याचा धोका निर्माण झाला आहे. दुचाकीस्वार घसरून जखमी होण्याच्या घटनाही वाढल्या आहेत. संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्त्याच्या कामाला गती देऊन खोदून ठेवलेल्या भागात तातडीने मुरूम टाकावा, तसेच वाहतुकीसाठी रस्ता सुरक्षित व दुतर्फा खुला करावा, अशी मागणी नागरिक, वाहनधारक, शासकीय कर्मचारी, शाळकरी विद्यार्थी तसेच एसटी महामंडळाकडून करण्यात येत आहे.



# गंगापुरचे पो.नि. सलीम चाऊस ॲक्शन मोडवर

## गुटखा विक्री व नियमभंग करणाऱ्यांमध्ये खळबळ

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**गंगापूर** : गंगापूर पोलीस ठाण्याचा पदभार स्वीकारताच नवे पोलीस निरीक्षक सलीम अमर चाऊस यांनी कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी कडक भूमिका घेतली आहे. शहरातील पानटपरी चालक, व्यापारी, मध्यवर्ती सहकारी बँकेचे अधिकारी तसेच विविध व्यावसायिकांची बैठक घेऊन गुटखा विक्री, अस्वच्छता आणि नियमभंग कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतला जाणार नसल्याचा स्पष्ट इशारा त्यांनी दिला.



गंगापूर तालुक्यातील अवैध वाळू उपसा आणि इतर अवैध धंद्यांच्या मुद्द्यावर आमदार प्रशांत बंब यांनी राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात आवाज उठवल्यानंतर पोलीस व महसूल प्रशासनात मोठ्या सुरू झाल्या. त्यानंतर गंगापूर पोलीस ठाण्याचे तत्कालीन पोलीस निरीक्षक कुमारसिंग राठोड यांची बदली करण्यात आली असून त्यांच्या जागी शिल्लेगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सलीम अमर चाऊस यांनी पदभार स्वीकारला आहे.

पदभार स्वीकारल्यानंतर झालेल्या पहिल्याच बैठकीत पोलीस निरीक्षक चाऊस यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की,"राज्यात गुटखा विक्रीवर बंदी आहे. कोणत्याही पानटपरीवर विक्री आढळल्यास संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल." तसेच पानटपऱ्या आणि व्यावसायिक आस्थापनांच्या परिसरात स्वच्छता राखणे बंधनकारक असल्याचे सांगत अस्वच्छता आढळल्यासही कारवाईचा इशारा दिला.

बैठकीदरम्यान व्यापाऱ्यांनी शहरातील वाहतूक कोंडी, सुरक्षेचे प्रश्न, अतिक्रमण तसेच कायदा व सुव्यवस्थेसंदर्भातील विविध समस्या पोलिसांसमोर मांडल्या. त्यावर पोलीस प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेत व्यापाऱ्यांना नियमांचे काटेकोर करण्याचे आणि पोलीस प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन केले. नव्या पोलीस निरीक्षकांच्या पहिल्याच बैठकीत दिलेल्या कडक इशाऱ्यामुळे शहरातील अवैध धंदे, गुटखा विक्री आणि नियमभंग करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली असून गंगापूरमध्ये कायदा व सुव्यवस्था अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी पोलीस प्रशासन आक्रमक भूमिका घेणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

### श्री संत गोविंद बाबा सोसायटीची १०० टक्के वसुली

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**सोनई** -- नेवासा तालुक्यातील शिरेगाव येथील श्री संत गोविंद बाबा विविध कार्यकारी सेवा सोसायटीची जून २० २६ मध्ये बँक पातळीवर शंभर टक्के कर्ज वसुली झाल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष डरकानाथ भगवान जाधव यांनी माजी मंत्री शंकरराव गडाख व मार्गदर्शक काशिनाथ भगवान जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेची शिस्त बद्ध व विकासात्मक वाटचाल चालू आहे. सर्व संचालक मंडळानी चालू वर्षी संस्थेची वसुलीची परंपरा जपली आहे. संचालक मंडळाने सभासदाच्या हितास प्राधान्य दिले आहे.संस्थेचे सचिव ए.पी. बोर्ड शाखाधिकारी जी.एम.बोर्डे यांनी पाठपुरावा करून संस्थेच्या हिताच्या सभासदांना कर्ज वाटपासाठी प्रयत्न करून शंभर टक्के कर्ज वसुली झाल्याने सभासद वर्गामध्ये पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करण्यात आले आहे.याकामी सहाय्यक निबंधक देविदास घोडेचोर,तालुका विकास अधिकारी सत्यवान खाटीक, वसुली अधिकारी प्रदीप राऊत, शाखा अधिकारी बोर्डे जि.एम, सचिव अप्पासाहेब बोर्डे यांनी संस्थेच्या वसुलीकामी सहकार्य केले.

# एसआयआर अभियानासाठी फैसल बासोलान यांची निवड

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**गंगापूर** : महाराष्ट्र प्रदेश तर्फे मतदार याद्यांचे पुनर्निरीक्षण अर्थात एसआयआर अभियान सुरू करण्यात आले असून या अभियानासाठी एम.आय.एमचे गंगापूर शहराध्यक्ष फैसल बासोलान यांची विधानसभा क्षेत्र १११ - गंगापूरचे केंद्रस्तरीय प्रतिनिधी (इडअ-१)म्हणून नियुक्ती करण्यात आली

या नियुक्तीमुळे गंगापूर विधानसभा क्षेत्रातील मतदार यादी पुनर्निरीक्षणाच्या प्रक्रियेला अधिक बळ मिळणार असल्याचे मानले जात आहे.



एम आय एमचे माजी खासदार इम्तियाज जलील यांच्या स्वाक्षरीने एम आय एम पक्षातर्फे काढण्यात आलेल्या संबंधित नियुक्तीपत्रात फैसल बासोलान यांनी मतदार याद्यांच्या पुनर्निरीक्षणाच्या कामासाठी पुरेसा वेळ देऊन आपल्या अनुभवाचा आणि संघटनात्मक कौशल्याचा योग्य करावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

मतदार यादीतील नव्या मतदारांची नोंदणी,मृत किंवा स्थलांतरित मतदारांची नावे वगळणे, तसेच मतदार यादी अद्ययावत ठेवण्याच्या दृष्टीने हे अभियान महत्त्वाचे मानले जाते.या कामात केंद्रस्तरीय प्रतिनिधी म्हणून बासोलान यांची भूमिका महत्त्वपूर्ण राहणार आहे.


**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGE MY OLD NAME MOHAMMED SHAFI AYYUB SHAIKH (NAME ASPER OLD PASSPORT NO.B2664917) TO NEW NAME AS SHAFI AYYUB SHAIKH VIDE AADHAR NO.2608 9077 9902

**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGE MY OLD NAME MOHAMMED ATHAR HASAN RIZVI (OLD PASSPORT NO.M3897556) ( BEFORE NAME ) TO NEW NAME AS MOHAMMADATHARHASAN MOHAMMADIMDADALI MOMIN (AADHAR NO. 4089 5834 7206) FROM VIDE AFFIDAVIT BEFORE NOTARY PUBLIC SHRIRAMPUR PLACE: SHRIRAMPUR DATE : 04/07/2026

**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGE MY OLD NAME MOHAMMED SAJID GULMOHAMMED SHAIKH (NAME ASPER OLD PASSPORT NO.P8149196) TO NEW NAME AS MOHAMMADSAJID GULMOHAMMAD SHAIKH VIDE AADHAR NO.4599 6294 1793

**Change Of Name**

I, Pirjade Nujat Bashir, resident of Rahuri, District Ahilyanagar 413705, hereby declare that I have changed my name to Shaikh Nujahat Rashid Hereafter, I shall be known as Shaikh Nujahat Rashid for all purposes.

**Change Of Name**

I have changed my old name **SHREYA DATTATRAYA SALVE** to my new name is **SHREYA DATTATRAY SALVE** (Aadhaar Card No. 3556468 9930)


# प्रत्येक धर्माची शिकवण पवित्र : अश्फाक शेख

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**टाकळीभान:** प्रत्येक धर्माची शिकवण पवित्र असून प्रत्येकाला स्वतःच्या धर्माचा अभिमान असल्याचे प्रतिपादन प्रसिद्ध यशस्वी उद्योजक अश्फाक भाई शेख यांनी केले. टाकळीभान येथील जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज मंदिरास तीन लाख पंचवीस हजार रुपयांची ग्रॅनाईट फरशी त्यांनी भेट दिली. त्या कामाचा शुभारंभ प्रसंगी अश्फाक शेख बोलत होते. यावेळी प्रमुख उपस्थितीत हनुमान गडचे महंत हभप महाराज चौधरी व हभप कृष्ण महाराज वाघुले व हभप शाम महाराज यांच्या हस्ते उद्योजक अश्फाक यांनी मंदिराच्या कामासाठी दाखविलेल्या मोठ्या दातृत्वाबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. व या मंदिरास ग्रॅनाईट फरशीचे कामकाजास सुरुवात झाली. आमचे गावा बद्दलचे उत्तरदायित्व आम्ही पूर्ण केले असल्याची भावना अश्फाक शेख यांनी यावेळी व्यक्त केली. याप्रसंगी अहमद शेख (भाईसाब मामा), उपसरपंच कान्हा खंडागळे, भाऊसाहेब पवार,संत तुकाराम महाराज मंदिराचे विश्वस्त रोहिदास पटारे, खंडेराव गवांदे सर, केरू बापू मगर, बंडोपंत पटारे,राजेंद्र माने,नवाज शेख, पप्पू महाराज गायकवाड, विलास सपकळ, गोरक्षनाथ खुरुद, नसीर बेग,नूर शेख,भाऊसाहेब गव्हाणे, सुदाम देवलालकर गुरु आदी सह मंदिराचे सेवेकरी,भाविक ग्रामस्थ उपस्थित होते.



# स्मार्ट मीटर विरोधात कोपरगावात राष्ट्रवादीचा एल्गार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोळपेवाडी** : महावितरण कंपनीकडून वीज ग्राहकांच्या परवानगी शिवाय स्मार्ट मीटर बसवले जात आहे. स्मार्ट मीटर आणि जुन्या मीटरच्या वीज बिलामध्ये मोठ्या प्रमाणात तफावत आढळून येत असल्याने वीज आर्थिक भार वाढला असून नागरीकांमध्ये असंतोषाचे वातावरण पसरले आहे. त्यामुळे या स्मार्ट मीटरच्या विरोधात कोपरगावमध्ये आ.आशुतोष काळे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने महावितरण कार्यालय परिसरात तीव्र आंदोलन करण्यात आले. यावेळी महावितरणच्या धोरणांचा तीव्र निषेध करत वरिष्ठ अधिकाऱ्यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले. ग्राहकांच्या परवानगीशिवाय स्मार्ट मीटर बसविण्यात आले तर सगळ्या स्मार्ट मीटरची महावितरण कार्यालयात होळी करण्याचा ईशारा यावेळी राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिला.

राज्यभरात महावितरणकडून जुने वीज मीटर बदलून त्या जागी नवीन स्मार्ट मीटर बसवण्याची मोहीम राबविली जात असून कोपरगावात ग्राहकांच्या परवानगी शिवाय स्मार्ट मीटर बसविले जात आहे. ग्राहकांनी स्मार्ट मीटर बसविण्यास विरोध केल्यास पोलीस आणि कायद्याचा दाखवला जात आहे. यामुळे ग्राहकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. स्मार्ट मीटरचे व जुन्या मीटरच्या वीज बिलात मोठी तफावत आहे. त्यामुळे आधीच महागाईमुळे त्रस्त असलेल्या जनतेवर आणि शेतकऱ्यांवर स्मार्ट मीटरमुळे नवीन आर्थिक बोजा लादणे अन्यायकारक असून स्मार्ट मीटरच्या माध्यमातून ग्राहकांची आर्थिक लुट केली जात असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेसकडून करण्यात आला आहे. मीटरमुळे गरिबांना वीज वापरणे देखील कठीण झाले असून बीज बिल भरायला थोडा जरी विलंब झाल्यास आपोआप वीज प्रवाह खंडित होतो. सर्व सामान्य आणि मोलमजुरी करणाऱ्या ग्राहकांकडे वेळेवर पैसे उपलब्ध नसतात त्यामुळे वीज बिल भरण्यात मागेपुढे होते व स्मार्ट मीटर असल्यामुळे तात्काळ घराची वीज खंडित होते. त्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होत कोपरगाव तालुक्यात दर दिवशी तासंतास आणि दुरुस्तीच्या नावाखाली दर शनिवारी सात-आठ तास वीज खंडित होत आहे.पाऊस असेल तर वीज खंडित होणे वीज ग्राहक समजू शकतात. मात्र पाऊस नसतांना देखील वीज पुरवठा का खंडीत होतो? अशा अनेक प्रश्नाची सरबत्ती राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांवर केली. महावितरण कंपनीने वीज ग्राहकांच्या उपस्थित परवानगी शिवाय स्मार्ट मीटर बसवू नये.अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा ईशारा राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने देण्यात आला आहे. यावेळी महावितरणच्या अधिकाऱ्यांनी आंदोलनकर्त्यांचे निवेदन स्वीकारून तात्काळ वरिष्ठ पातळीवर आणि मुख्य प्रशासन यांच्याशी चर्चा करून मार्ग काढण्याचे आश्वासन दिले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना व संलग्न संस्थांचे नगरसेवक, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## नशिबाची परिक्षा

**रविवार दि. ०५ जुलै २०२६**

**मिलनम डे**

| उदय-अस्त | | सिंगल ५-१-९ मजबुत | |
|---|---|---|---|
| १२०<br>६७०<br>५८० | ३-४ | १२०<br>२२८<br>२०० | जोड<br>३०-६०-१७-९२-४५ |

**कल्याण**

| उदय-अस्त | | सिंगल ९-४-५ मजबुत | |
|---|---|---|---|
| १०५<br>१३८<br>६०८ | ६-१ | १२८<br>२९०<br>२०९ | जोड<br>६२-९१-४५-०८-४५ |

**मुंबैम (मेन)**

| उदय-अस्त | | सिंगल ४-७-९ मजबुत | |
|---|---|---|---|
| ४८०<br>५७०<br>६६० | २-९ | १२६<br>१८०<br>११७ | जोड<br>२१-०९-३५-६७-९४ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

# द•ख•ल

## पुरातन मंदिराची माहिती नवीन पिढीला महत्त्वाची : महापौर गाडे



**अहिल्यानगर :** स्वयंभू शमी गणपती मंदिर हे अहिल्यानगर शहरातील भाविकांचे श्रद्धास्थान आहे.संकष्टी चतुर्थी असल्याने गणपतीचे दर्शन घेण्याची इच्छा झाली होती.शमी गणपतीचे दर्शन घेतल्याने मन प्रसन्न झाले.शमी वृक्षाच्या मुळापासून शमी गणपती तयार झाला आहे.येथे शहरातील भाविक मोठ्या श्रद्धेने दर्शनासाठी येत असतात.अशा पुरातन मंदिराची माहिती व ओळख होणे नवीन पिढी साठी महत्त्वाचे आहे. असे प्रतिपादन महापौर ज्योतीताई गाडे यांनी केले आहे. दिल्लीगेट येथील शमी गणपती मंदिर ट्रस्टच्या वतीने महापौर ज्योतीताई गाडे यांनी सदिच्छा भेट दिल्याबद्दल त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. याप्रसंगी शमी गणपती मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष विनायक देशमुख,नरेंद्र कुलकर्णी, पुजारी प्रमोद रेखी गुरुजी,जिल्हा ब्युटी असोसिएशनचे अध्यक्ष अनुजा कांबळे, ऋतुजा धोत्रे, महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण समितीचे माजी सदस्य महेश कांबळे आदी उपस्थित होते. विनायक देशमुख म्हणाले, दिल्लीगेट वेशीतील शमी गणपती येथे मोठ्या भक्ती भावाने व श्रद्धेने भाविक दर्शनासाठी येत असतात. स्वयंभू शमी गणपती हा १०० वर्षाहून अधिक काळापासून स्थापित झालेला असल्याने तो भक्तांच्या नवसाला पावणारा गणपती आहे.शमी वृक्षाच्या पानाची पूजा दसऱ्याच्या दिवशी सीमोल्लंघन प्रसंगी केली जाते. व त्यानंतर सोने लुटण्यात येते. अशी प्रथा आहे.त्यामुळे शमी गणपतीला एक विशेष महत्त्व प्राप्त झालेले आहे

## शेतीच्या वादातून महिलांना शिवीगाळ : तिघांविरुद्ध गुन्हा

**निघोज :** वडनेर खुर्द ता.शिरुर येथे शेतामध्ये काम करीत असलेल्या महिलांना शेतीच्या वादातून शिवीगाळ केल्याची घटना समोर आली असून या प्रकरणी शिरुर पोलीस ठाण्यात पाडळे आळे येथील संदीप प्रभाकर डेरे, वडनेर येथील रखमा शंकर निचीत तसेच साकुरी ता. जुन्नर येथील ओंकार अंकुश गाडगे या तिघांवर ट्रासिटी अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वडनेर खुर्द येथील सुवर्णा पडवळ, मनिषा पडवळ, स्वप्नाली पडवळ व उर्मिला पडवळ या महिला त्यांच्या शेतात पेरणी करायची असल्याने शेतातील गवत वेचित असताना संदीप डेरे, रखमा निचीत व ओंकार गाडगे तिघे शेताच्या ठिकाणी आले.त्यांनी शेतीच्या वादातून शेतात काम करणाऱ्या सुवर्णा पडवळ यांसह आदि महिलांना दमदाटी करीत ही शेतजमीन आमची आहे ईथे पाय ठेवायचा नाही असे म्हणत जातीवाचक शिवीगाळ करीत दमदाटी केली. घडलेल्या प्रकरणाबाबत सुवर्णा पाराजी पडवळ वय ४३ वर्ष वडनेर खुर्द ता.शिरुर यांनी शिरुर पोलिस ठाण्यामध्ये फिर्याद दिल्याने पोलिसांनी संदीप प्रभाकर डेरे पाडळी आळे ता.पारनेर, रखमा शंकर निचीत वडनेर खुर्द ता.शिरुर, ओंकार अंकुश गाडगे साकोरी ता.जुन्नर या तिघांवर जातीवाचक शिवीगाळ केल्याप्रकरणी ट्रासिटी कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास शिरुर पोलीस करीत आहेत.

## स्मृतीज्योत रथयात्रेचे जामखेडमध्ये स्वागत

**जामखेड :** स्वराज्याच्या जननी आणि छत्रपती शिवाजी महाराजांना संस्कार, शौर्य व राष्ट्रप्रेमाची प्रेरणा देणाऱ्या राष्ट्रमाता माँ जिजाऊ यांच्या ३५३ व्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या विचारांचा जागर करण्यासाठी स्मृतीज्योत रथयात्रा, जिजाऊ विचारांची ज्योत व जलपूजन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. राजे लखुजीराव जाधवराव यांच्या वंशजांच्या वतीने जिजाऊंचे जन्मस्थळ सिंदखेडराजा ते पाचाड (किल्ले रायगड) अशी स्मृतीज्योत रथयात्रा काढण्यात येणार असून, या यात्रेच्या माध्यमातून राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या विचारांचा व कार्याचा संदेश जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचा संकल्प करण्यात आला आहे. सोमवार, दि. ६ जुलै २०२६ रोजी ही स्मृतीज्योत रथयात्रा जामखेड शहरात आगमन होणार आहे. यावेळी अखंड मराठा समाज, मराठा सेवा संघ, सर्व पत्रकार तसेच समस्थ जामखेडकरांच्या वतीने खर्डा चौक येथे सकाळी ११ वाजता रथयात्रेचे भव्य व उत्साहपूर्ण स्वागत करण्यात येणार आहे. या स्वागत सोहळ्यात मोठ्या संख्येने शिवभक्त, जिजाऊप्रेमी, सामाजिक कार्यकर्ते, विविध संघटनांचे पदाधिकारी व नागरिक सहभागी होणार असून, राष्ट्रमाता माँ जिजाऊ यांच्या विचारांना सामूहिक अभिवादन करण्यात येणार आहे. जामखेड शहर व तालुक्यातील सर्व जिजाऊ भक्त, शिवप्रेमी, सामाजिक कार्यकर्ते तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने जामखेड खर्डा चौक येथे उपस्थित राहून स्मृतीज्योत रथयात्रेचे उत्स्फूर्त स्वागत करावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## धारा बीडकरची आशियाई युवा तिरंदाजी स्पर्धेसाठी निवड

**जामखेड :** जामखेड तालुक्यातील खर्डा गावासह संपूर्ण अहमदनगर जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवणारी अत्यंत अभिमानाची बातमी समोर आली आहे.मूळचे खर्डा येथील रहिवासी व सध्या पुणे येथे



वैद्यकीय सेवा देणारे डॉ.अमोल बीडकर यांची कन्या कु.धारा बीडकर हिची संयुक्त अरब अमिरात (ण-ए) येथे होणाऱ्या 'सब ज्युनिअर आशियाई युवा तिरंदाजी अजिंक्यपद स्पर्धे साठी'भारतीय संघात निवड झाली आहे.अवघ्या १५ व्या वर्षी धाराने हे दैदिप्यमान यश संपादन करत थेट भारतीय संघाची जर्सी परिधान करून देशाचे प्रतिनिधित्व करण्याचा बहुमान मिळवला आहे.कठोर परिश्रम आणि शिस्तीचे फळ:- धाराच्या या यशामागे तिची अनेक वर्षांची कठोर तपश्चर्या, अथक परिश्रम,जिद्द आणि शिस्त दडलेली आहे.वयाच्या इतर मुलांप्रमाणे खेळ किंवा विरंगुळा न शोधता,तिने आपल्या ध्येयावर लक्ष केंद्रित केले. प्रत्येक स्पर्धेत स्वतःला सिद्ध करत तिने आज आंतरराष्ट्रीय स्तरावर झेप घेतली आहे.कुटुंबाचे भक्कम पाठबळ:- धाराच्या या यशात तिचे आई-वडील आणि प्रशिक्षक यांचे मोलाचे योगदान आहे.विशेषतः तिच्या आईने प्रत्येक सराव सत्रात आणि प्रत्येक स्पर्धेत दिलेले प्रोत्साहन व केलेल्या त्यागामुळेच धाराचा आत्मविश्वास अधिक बळकट झाला. धाराचे आजोबा श्री.अशोक बीडकर (निवृत्त रयत सेवक) आणि आजी सौ.महानंदा बीडकर (ज्यांचे खर्ड्यात बांगड्यांचे दुकान आहे) हे आजही खर्डा येथेच वास्तव्यास असून,आपल्या नातीच्या या यशाने त्यांचा ऊर अभिमानाने भरून आला आहे.खर्ड्यातून शुभेच्छांचा वर्षाव:- भारतीय संघाची जर्सी परिधान करून देशासाठी खेळणे हे प्रत्येक खेळाडूचे स्वप्न असते,हे स्वप्न कुमारी धाराने प्रत्यक्षात उतरवून खर्ड्याचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचवले आहे. तिच्या या उल्लेखनीय यशाबद्दल खर्डा परिसर, जामखेड तालुका आणि क्रीडा जगतातून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# वाकोडीत सीना नदी रुंदीकरण, खोलीकरणाला प्रारंभ

## नदीकाठावर दुतर्फा नारळाची झाडे ; नाम फौंडेशनमुळे विकासाला गती : कर्डिले

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** नगर तालुक्यातील वाकोडी गावच्या हद्दीतून सुमारे सहा किलोमीटर अंतरावर वाहणाऱ्या सीना नदीच्या रुंदीकरण व खोलीकरण कामाचा शुभारंभ उत्साहात संपन्न झाला. नाम फाउंडेशन व वाकोडी ग्रामपंचायतीच्या पुढाकारातून हाती घेण्यात आलेल्या या महत्त्वाकांक्षी उपक्रमामुळे नदी संवर्धनासह शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असून भविष्यात वाकोडीच्या विकासाला नवी दिशा मिळणार असल्याचा विश्वास नगर कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती हरिभाऊ कर्डिले यांनी व्यक्त केला.

यावेळी ते म्हणाले की, मागील दोन वर्षांपासून सीना नदीला आलेल्या पुरामुळे परिसरातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. नदीपात्रात मोठ्या प्रमाणावर वाढलेल्या येड्या बाभळीमुळे पाण्याचा फुगवटा तयार होऊन पुराचे पाणी थेट शेतांमध्ये शिरत होते. त्यामुळे शेतीपिकांसह सुपीक जमिनीचेही मोठे नुकसान झाले. ही गंभीर समस्या कायमस्वरूपी सोडविण्यासाठी नाम फाउंडेशनचे विश्वस्त अभिनेते नाना पाटेकर यांच्याशी संपर्क साधण्यात आला. आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून जिल्हाधिकारी यांची परवानगी घेतल्यानंतर सीना नदीच्या रुंदीकरण व खोलीकरणाच्या कामास प्रत्यक्ष सुरुवात करण्यात आली आहे.



या कामातून नदीपात्रातील गाळ व पोयटा बाहेर काढण्यात येणार असून तो परिसरातील शेतकऱ्यांना मोफत उपलब्ध करून दिला जाणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना शेतीची उत्पादकता वाढविण्यास मदत होणार आहे.

हरिभाऊ कर्डिले पुढे म्हणाले की, केवळ नदीचे खोलीकरण व रुंदीकरण एवढ्यावरच हा उपक्रम मर्यादित राहणार नाही. सीना नदीच्या सुमारे सहा किलोमीटर परिसराचे सुशोभीकरण करण्यात येणार असून नदीच्या दोन्ही काठांवर शेतकऱ्यांच्या सहभागातून दुतर्फा नारळाची झाडे लावण्याचा संकल्प करण्यात आला आहे. या माध्यमातून स्वच्छ, सुंदर आणि हरित वाकोडी घडविण्याचे उद्दिष्ट असून भविष्यात या परिसरात निसर्गरम्य वातावरण निर्माण होईल. पुढील काळात वाकोडी येथे पर्यटनाला चालना मिळेल, अशा प्रकारचा विकास आराखडा राबविण्यात येणार असून नाम फाउंडेशनच्या माध्यमातून गावाच्या विकासाला निश्चितच गती मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

नगर तालुक्यातील वाकोडी गावच्या हद्दीतून जाणाऱ्या सीना नदीच्या रुंदीकरण व खोलीकरण कामाचे भूमिपूजन नगर कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती हरिभाऊ कर्डिले यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी पैलवान बंटी गुंजाळ, विशाल गागरे, बच्चूभाऊ मोडवे, नाथाभाऊ कराळे, गणेश तोडमल, किशोर तोडमल, मुरलीधर मोडवे, भास्कर मोडवे, भाऊसाहेब गवळी, हौशाबापू गवळी, प्रदीप लुंकड, रमेश इनामकर, अमोल तोडमल, रमेश चित्ताळ, धनंजय गायके, एकनाथ कराळे, ग्रामसेवक संजय पुंड यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शेवटी ग्रामस्थांनी नाम फाउंडेशनचे आभार मानत सीना नदीच्या रुंदीकरण व खोलीकरणाच्या कामाचे स्वागत केले. या उपक्रमामुळे शेतकऱ्यांच्या पुराच्या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा निघण्याबरोबरच नदी संवर्धन, पर्यावरण संरक्षण आणि ग्रामीण पर्यटनालाही चालना मिळेल, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## सहकार सप्ताहात ६१ पिशव्या रक्तसंकलन

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**टाकळी ढोकेश्वर :** सहकार सप्ताह निमित्ताने सहाय्यक निबंधक कार्यालय पारनेर व पारनेर ग्रामीण बिगरशेती पतसंस्था पारनेर,बाबासाहेब कवाद निघोज नागरी सहकारी पतसंस्था निघोज यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच जनकल्याण रक्तपेढी अहिल्यानगर यांच्या सहकार्याने आयोजित रक्तदान शिबिरात ६१ रक्तपिशव्यांचे संकलन करण्यात आले.सहाय्यक निबंधक विशाल दाते यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा सहकारी बँकेच्या सॉलिसीटर गुलाबराव शेळके सभागृहात या रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.रक्तदान शिबिराचे उद्घाटन सहाय्यक निबंधक गणेश औटी,सहकार अधिकारी राजेंद्र वाघमोडे, पारनेरचे मा.नगराध्यक्ष नितीन अडसूळ, बाबासाहेब कवाद निघोज नागरी पतसंस्थेचे चेअरमन वसंतराव कवाद, किसान युनियन पतसंस्थेचे चेअरमन चंदूशेठ चेडे,जनकल्याण रक्तपेढीचे डॉ.मढीकर यांच्या उपस्थितीत




करण्यात आले.यावेळी मार्गदर्शन करताना डॉ.मढीकर यांनी रक्तदान करणे किती महत्वाचे आहे ते सांगितले तसेच विज्ञानाने हे सिद्ध केले आहे की रक्त देणे आरोग्यासाठी चांगले आहे आणि दान केलेले रक्त कमी कालावधीत आपल्या शरीरात पुन्हा तयार होते त्यासाठी जनजागृती करणे गरजेचे आहे. आज विविध कारणांमुळे रक्ताची मागणी जगभरात वाढत आहे रक्तदानातून उपलब्ध होणाऱ्या रक्तामुळे अनेक गरजू रुग्णांचे प्राण वाचत असल्यामुळे रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान असल्याचे त्यांनी सांगितले.या रक्तदान शिबिरात पारनेर ग्रामीण पतसंस्था पारनेर,बाबासाहेब कवाद निघोज नागरी सहकारी पतसंस्था निघोज तसेच पारनेर तालुक्यातील विविध पतसंस्थांचे अधिकारी व पदाधिकारी यांनी रक्तदान करत सहकाराबरोबर आम्ही सामाजिक कार्यात देखील अग्रेसर असल्याचे दाखवून दिले. वसुली अधिकारी दत्तात्रय हांडे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तसेच सहकार विभागाचे ऋषिकेश चौधरी, अभिषेक आरमाळकर यांनी या शिबिरासाठी मोलाचे सहकार्य केले.

## कॅन्सरला घाबरू नका; वेळेवर उपचार देतात नवजीवन : डॉ. अनिकेत शिंदे



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** कॅन्सर म्हणजे मृत्यूचा नाही, तर वेळेवर उपचार न घेतल्यास निर्माण होणारा धोका आहे. आज वैद्यकीय क्षेत्रातील प्रगत तंत्रज्ञान आणि आधुनिक उपचारपद्धतीमुळे कॅन्सर पूर्णपणे बरा होऊ शकतो. त्यामुळे भीती न बाळगता लक्षणे दिसताच तातडीने तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. वेळेवर केलेले उपचार रुग्णाला नवजीवन देतात, असे प्रतिपादन प्रख्यात कॅन्सरतज्ज्ञ डॉ. अनिकेत शिंदे यांनी केले.

जैन सोशल फेडरेशन संचलित श्री आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे संथारा व्रतधारी स्व. श्रीमती पानाबाई लक्ष्मीचंदजी रुणवाल यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ अजय रुणवाल व सतीश मंगलाजी रुणवाल (बिजापूर, पुणे) यांच्या सहकार्याने आयोजित मोफत कॅन्सर तपासणी व अल्पदरात शस्त्रक्रिया शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी पेमराज बोथरा, मनीषा बोथरा, संतोष बोथरा, संगीता बोथरा, सतीश बोथरा, प्रतिभा बोथरा, बाबूशेठ लोढा, तेजल पगारिया, माणकचंद कटारिया, डॉ. आशिष भंडारी, डॉ. तुषार मुळे, डॉ. भक्ती फाळके, डॉ. सोनाली सोलट आणि डॉ. निकिता जैन यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. शिंदे पुढे म्हणाले की, भारतात दरवर्षी सुमारे १४ लाख नव्या कॅन्सर रुग्णांचे निदान होते. तंबाखूचे सेवन हे जवळपास ४० टक्के कॅन्सरचे प्रमुख कारण आहे. महिलांमध्ये स्तनाचा आणि गर्भाशयमुखाच्या कॅन्सरचे प्रमाण वाढत असल्याने नियमित तपासणी, जनजागृती आणि लक्षणे ओळखून त्वरित उपचार घेणे अत्यंत गरजेचे आहे. पुरुषांनी तोंडातील न भरून येणारी जखम किंवा पांढरे चट्टे, तर महिलांनी स्तनामध्ये गाठ किंवा मासिक पाळीतील असामान्य बदल याकडे दुर्लक्ष करू नये, असेही त्यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले की, आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये आतापर्यंत ४०० हून अधिक कॅन्सर शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पार पडल्या असून महात्मा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत केमोथेरपीची सुविधा उपलब्ध आहे.

## आरोग्यदायी सवयी जीवन घडवितात : डॉ. गारुडकर




**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**लिंपणगाव :** रयत शिक्षण संस्थेच्या जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, काष्टी येथे कर्मवीर विद्याप्रबोधिनी अंतर्गत सुरू असलेल्या गुरुकुल प्रकल्पाच्या बाह्य तज्ज्ञ मार्गदर्शन उपक्रमात अहिल्यानगर येथील सुप्रसिद्ध त्वचारोगतज्ज्ञ डॉ. आशुतोष गारुडकर यांचे प्रेरणादायी व्याख्यान आयोजित करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य श्री. शिवप्रसाद मेहेत्रे होते. कर्मवीर प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. गारुडकर म्हणाले की, आरोग्यदायी सवयी जीवन घडवितात. आपण रयत शिक्षण संस्थेचे आणि याच विद्यालयाचे माजी विद्यार्थी असल्याचा अभिमान असल्याचे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी स्वतःची आवड ओळखून त्यानुसार करिअरची दिशा निश्चित करावी. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी विविध कौशल्ये आत्मसात करून स्थानिक स्तरावर उपलब्ध करिअरच्या संधींचा शोध घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.




## दरमहा संजय गांधी निराधार समितीची बैठक

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** तालुक्यातील संजय गांधी निराधार योजना समितीची बैठक यापुढे तीन महिन्यांऐवजी दर महिन्याला घेण्यात येईल. दिव्यांग, विधवा, निराधार तसेच परित्यक्ता माता-भगिनींची प्रकरणे प्राधान्याने निकाली काढली जातील. याशिवाय पुढील महिन्यापासून लाभार्थ्यांना त्यांच्या प्रकरणाची माहिती एसएमएसद्वारे उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती नगरचे तहसीलदार मिलिंद कुलथे यांनी दिली. तहसीलदार म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर, राजू दारकुंडे, वसंत शिंदे, बाबासाहेब धिवर, बाबासाहेब तोडमल बाबासाहेब दरेकर आदींनी त्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. यावेळी समितीच्या वतीने विविध मागण्यांचे निवेदन तहसीलदारांना सादर करण्यात आले. निवेदनात संजय गांधी निराधार अनुदान समितीची बैठक सध्या तीन महिन्यांतून एकदा होत असल्याने अनेक लाभार्थ्यांची प्रकरणे प्रलंबित राहत असल्याचे नमूद करण्यात आले. त्यामुळे बैठक दर महिन्याला घेण्यात यावी, अशी प्रमुख मागणी करण्यात आली. तसेच संजय गांधी निराधार शाखेचे नायब तहसीलदार भनवसे यांची वारंवार इतरत्र नियुक्ती होत असल्यामुळे शाखेच्या दैनंदिन कामकाजावर परिणाम होत असून लाभार्थ्यांना विविध अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले.

## कु. राधिका देशमुख शिष्यवृत्तीच्या यादीत

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता ५ वी) २०२६ मध्ये ऑक्सिलियम कॉन्व्हेंट हायस्कूल,



अहिल्यानगर येथील विद्यार्थिनी कु. राधिका संतोष देशमुख हिने राज्याच्या गुणवत्ता यादीत १६ वा क्रमांक मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

## अहिल्यानगर-पुणे इंटरसिटी ट्रेनसाठी जनआंदोलनाची हाक

### 'मिशन २५,००० प्रवासी'चा प्रारंभ

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** अहिल्यानगरपुणे दरम्यान प्रवास करणाऱ्या हजारो प्रवाशांच्या दैनंदिन समस्यांना कायमस्वरूपी तोडगा मिळावा आणि या मार्गावर स्वतंत्र इंटरसिटी रेल्वे सेवा सुरू व्हावी, या प्रमुख उद्देशाने अहमदनगर जिल्हा प्रवासी संघटना यांच्या वतीने 'मिशन २५,००० प्रवासी अहिल्यानगर-पुणे इंटरसिटी जनआंदोलन' या व्यापक लोकचळवळीचा प्रारंभ करण्यात आला आहे. हे आंदोलन पूर्णपणे नागरिकांच्या सहभागातून, पक्षनिरपेक्ष आणि लोकहिताच्या भावनेतून उभारण्यात येत असल्याची माहिती संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिली.

अहिल्यानगर आणि पुणे या दोन महत्त्वाच्या शहरांदरम्यान दररोज हजारो विद्यार्थी, नोकरदार, उद्योजक, औद्योगिक कर्मचारी, शेतकरी, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच विविध आजारांवर उपचारासाठी जाणारे रुग्ण प्रवास करतात. मात्र वाढती वाहतूक कोंडी, वेळेचा होणारा मोठा अपव्यय, वाढलेला इंधन व प्रवास खर्च, खासगी वाहनांवरील अवलंबित्व आणि सार्वजनिक वाहतुकीतील अपुऱ्या सुविधा यामुळे प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

अनेक वर्षांपासून अहिल्यानगर-पुणे इंटरसिटी ट्रेनची मागणी सातत्याने होत असली, तरी अद्याप या मागणीची पूर्तता झालेली नाही. त्यामुळे आता नागरिकांच्या थेट सहभागातून शासन आणि भारतीय रेल्वेचे लक्ष वेधण्यासाठी 'मिशन २५,००० प्रवासी' ही जनजागृती मोहीम सुरू करण्यात आली आहे.



या अभियानात जिल्ह्यातील विविध सामाजिक, शैक्षणिक, औद्योगिक आणि व्यावसायिक क्षेत्रांतील संस्था व संघटनांना सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. औद्योगिक संघटना, एमआयडीसीतील उद्योग समूह, चेंबर ऑफ कॉमर्स, व्यापारी संघटना, शैक्षणिक संस्था, महाविद्यालये, विद्यापीठे, रुग्णालये, वैद्यकीय संघटना, डॉक्टर व वकील संघटना, स्वयंसेवी संस्था, लायन्स क्लब, रोटरी क्लब, युवक व महिला संघटना, ज्येष्ठ नागरिक संघटना, शेतकरी संघटना, प्रवासी संघटना, गृहनिर्माण संस्था तसेच प्रिंट, इलेक्ट्रॉनिक आणि डिजिटल माध्यमांच्या प्रतिनिधींनी या अभियानात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन करण्यात आले आहे. 'माझा प्रवास... माझा संघर्ष' अभियानाला ५ जुलैपासून प्रारंभ या जनआंदोलनाचा पुढील महत्त्वाचा टप्पा 'माझा प्रवास... माझा संघर्ष' या डिजिटल मोहिमेच्या स्वरूपात राबविण्यात येणार आहे. ५ जुलै २०२६ पासून अहिल्यानगरपुणे मार्गावरील प्रत्येक नियमित प्रवाशाने केवळ ३० सेकंदांचा व्हिडिओ तयार करून सोशल मीडियावर शेअर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

**जाहीर प्रकटन**

**(फक्त सभासदांसाठी सुचना)**

कारेगाव विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्यादित कारेगाव, ता. श्रीरामपुर, जि अहिल्यानगर या संस्थेच्या संचालक मंडळाच्या सन २०२६-२७ ते २०३१-३२ या कालावधीच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी ११/०७/२०२६ रोजी सकाळी ८.०० ते दुपारी ४.०० पर्यंत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कारेगाव, तालुका श्रीरामपुर, जिल्हा अहिल्यानगर या ठिकाणी मतदान होणार असुन त्यानंतर लगेच त्याच ठिकाणी मतमोजणी होणार आहे. तरी संस्थेच्या सभासदांनी यांची नोंद घ्यावी. दिनांक

दिनांक- ०४/०७/२०२६

(आर. एल. गडेकर)
**कारेगाव विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्यादित कारेगाव,**
**ता. श्रीरामपुर जि. अहिल्यानगर**

**जाहीर प्रकटन**

**(फक्त सभासदांसाठी सुचना)**

खिर्डी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्यादित खिर्डी, ता. श्रीरामपुर, जि अहिल्यानगर या संस्थेच्या संचालक मंडळाच्या सन २०२६-२७ ते २०३१-३२ या कालावधीच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी ११/०७/२०२६ रोजी सकाळी ८.०० ते दुपारी ४.०० पर्यत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, खिर्डी, तालुका श्रीरामपुर, जिल्हा अहिल्यानगर या ठिकाणी मतदान होणार असुन त्यानंतर लगेच त्याच ठिकाणी मतमोजणी होणार आहे. तरी संस्थेच्या सभासदांनी यांची नोंद घ्यावी.

दिनांक - ०४/०७/२०२६

(आर. आर. जाधव)
**निवडणुक निर्णय अधिकारी**
**खिर्डी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्यादित खिर्डी, ता. श्रीरामपुर जि. अहिल्यानगर**

द•ख•ल

## उपनियंत्रक अधिकारी व बिनतारी यंत्र चालक पदांसाठी माजी सैनिकांनी अर्ज करा

**पुणे :** नागरी संरक्षण संचालनालयाच्या प्रादेशिक नियंत्रण कक्षातील उपनियंत्रक अधिकारी (गट-क) आणि बिनतारी यंत्र चालक (गट-क) पदे भरण्यात येणार असून, या पदांसाठी पात्र माजी सैनिकांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत. उपनियंत्रक अधिकारी पदासाठी रेडिओ टेलिफोनी, टेलिफोन स्विचबोर्ड संचालन, सिग्नल प्रशिक्षण किंवा नागरी संरक्षण नियंत्रण व दळणवळण विषयातील मान्यताप्राप्त प्रशिक्षण आवश्यक आहे. बिनतारी यंत्र चालक पदासाठी एसएससी, वायरलेस ऑपरेटरचा अभ्यासक्रम, वायरलेस टेलिफोनी प्रमाणपत्र किंवा समकक्ष प्रशिक्षण तसेच मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक आहे. पुणे जिल्ह्यात नोंदणीकृत व निर्धारित पात्रता धारण करणाऱ्या इच्छुक माजी सैनिकांनी ७ जुलै २०२६ पर्यंत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, पुणे येथे अर्ज सादर करावेत, असे आवाहन मेजर शिल्पा मारोती खरपकर (नि.), जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, पुणे यांनी केले आहे.

## पालखी सोहळ्यातील वाहनांची तांत्रिक तपासणी करुन घेण्याचे आवाहन

**पुणे :** संत ज्ञानेश्वर महाराज व जगद्गुरु संत श्री. तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळ्यात देहू, आळंदी ते पंढरपूर दरम्यान दोन्ही पालखी मार्गावर प्रवासी, जड वाहने मोठ्या प्रमाणात सहभागी होतात. या वाहनांतील तांत्रिक दोषांमुळे अपघात होऊ नयेत, रस्त्यात बंद पडून ती वाहतूकीस अडथळा होऊ नये, याकरिता सर्व वाहनांची तपासणी प्रादेशिक परिवहन, पुणे आळंदी रोड चाचणी मैदान व दिवे येथील टेस्ट ट्रॅक येथील कार्यालयात वाहनांची तांत्रिक तपासणी करण्यात येणार आहे. वाहन तपासणीवेळी नोंदणी प्रमाणपत्र, कर, विमा प्रमाणपत्र, योग्यता प्रमाणपत्र व वायू प्रदुषण नियंत्रण प्रमाणपत्र, अनुज्ञप्ती व वाहतूक परवाना मुदतीत असणे आवश्यकता आहे, ही तपासणी विनामुल्य करून प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. पालखी सोहळ्यात होणा-या सर्व वाहनधारकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रादेशिक परिवहन अधिकारी अर्चना गायकवाड यांनी केले आहे.

## अन्न व औषध प्रशासनाची धडक कारवाई : सात हॉटेल-रेस्टॉरंटचे परवाने निलंबित

**पुणे :** अन्न व औषध प्रशासनाने 'डरषश डरषश ृऑंस, डरषश चरहरऑरीहींऑर' मोहिमेअंतर्गत पुणे विभागात १ ते ३ जुलैदरम्यान ७० हॉटेल व रेस्टॉरंटची तपासणी केली. तपासणीत अस्वच्छता, अन्न सुरक्षा व मानके कायद्याचे उल्लंघन तसेच काही ठिकाणी मुदतबाह्य अन्नसाठा आढळून आल्याने ७ आस्थापनांचे परवाने तात्काळ निलंबित करण्यात आले.निलंबित आस्थापनांमध्ये हॉटेल ग्रँड पुरंदर सिंहगड रोड, क्राऊन बेकर्स सिंहगड मे. ॲग्रोटीस केटरिंग प्रा. लि. ता. आंबेगाव, जि. पुणे, बरकत बिर्याणी हाऊस वाघोली पुणे, रॉयल बिर्याणी हाऊस वाघोली पुणे आणि नॅशनल ३६० बावधन, पुणे यांचा समावेश आहे. अन्न सुरक्षा आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या निर्देशानुसार ही तपासणी मोहीम सुरू असून नियमांचे उल्लंघन करणाऱ्या आस्थापनांवर यापुढेही कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचा प्रशासनाने दिला आहे. तसेच हॉटेल व्यावसायिकांनी स्वच्छता, अन्न सुरक्षा नियम आणि मोफत शुद्ध पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून देण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अन्नाच्या दर्जाबाबत तक्रारींसाठी नागरिकांनी १८००२२२३६५ या टोल-फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, असेही प्रशासनाने म्हटले आहे.

## ओतूरहून पंढरपूरकडे पालखीचे प्रस्थान

**जुन्नर:** तालुक्यातील ओतूर येथील बाबाजी चैतन्य महाराज आषाढी वारी पालखी सोहळ्याचे शुक्रवारी (दि. ३) सायंकाळी साडेपाच वाजता ओतूर येथून पंढरपूरकडे भक्तिमय वातावरणात प्रस्थान झाले. यावेळी वारकऱ्यांच्या सेवेसाठी ओतूर पोलीस स्टेशनच्या वतीने चहा व अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली होती. तसेच संपूर्ण पालखी मार्गावर सुरक्षेचा कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला. वारीत झालेल्या सुमारे १५० ते २०० वारकऱ्यांनी पोलीस स्टेशन




येथे आयोजित चहा व अल्पोपहाराचा लाभ घेतला. वारकऱ्यांच्या सेवेसह त्यांच्या सुरक्षित प्रवासालाही प्राधान्य देत पोलीस प्रशासनाने आवश्यक नियोजन केले होते.पालखी सोहळा मार्गस्थ होत असताना वाहतुकीचे नियमन करण्यात आले. वारकऱ्यांना रस्ते सुरक्षा, शिस्त आणि वाहतुकीसंदर्भातील आवश्यक सूचना देण्यात आल्या. पालखी ओतूर स्टेशनच्या हद्दीतून सुखरूप पुढे जाईपर्यंत संपूर्ण मार्गावर कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. या बंदोबस्तामध्ये पोलीस स्टेशनमधील सर्व अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते.सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे यांनी सांगितले की, पालखी सोहळा सुरक्षित आणि सुरळीत पार पडावा यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात आल्या होत्या. वारकरी नागरिकांच्या सहकार्यामुळे पालखी सोहळा शांततेत व शिस्तबद्ध वातावरणात पुढील मार्गाने रवाना झाला. वारकऱ्यांच्या सेवेसह सुरक्षा व्यवस्थेची प्रभावी अंमलबजावणी केल्याबद्दल ओतूर पोलीस स्टेशनच्या उपक्रमाचे वारकरी व नागरिकांकडून स्वागत करण्यात आले. भक्तिरसाने भारलेल्या वातावरणात विठ्ठलनामाचा गजर करत पालखी पंढरपूरच्या दिशेने मार्गस्थ झाली.

# पवना थेट समांतर जलवाहिनी प्रकल्प शेतकऱ्यांच्या संमतीनेच राबविणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई/ पुणे :** पिंपरी-चिंचवड शहराची भविष्यातील गरज लक्षात घेवून राबविण्यात येणारा 'पवना थेट समांतर जलवाहिनी प्रकल्प' हा शेतकऱ्यांच्या संमतीने, विश्वासाने आणि संवादातूनच पुढे नेला जाईल. शेतकऱ्यांच्या भावना आणि मतांचा पूर्ण आदर राखून याबाबत निर्णय घेतले जातील. स्थानिक शेतकरी, स्थानिक सर्व लोकप्रतिनिधी, संबंधित विभाग यांची व्यापक चर्चा, परस्पर संवाद आणि विश्वासाच्या माध्यमातूनच या प्रश्नांवर कायमस्वरूपी तोडगा काढून हा प्रकल्प पुढे नेला जाईल,असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

विधानभवन येथे पवना जलवाहिनी प्रकल्पासंदर्भात आयोजित बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, खासदार श्रीरंग बारणे, विधानसभेचे उपाध्यक्ष तथा आमदार अण्णा आमदार महेश लांडगे, आमदार संजय (बाळा) भेगडे, आमदार उमा खापरे, आमदार अमित गोरखे, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे महापौर रवी लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर, स्थायी समितीचे सभापती अभिषेक बारणे, सभागृह नेता प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेता भाऊसाहेब भोईर, शत्रुघ्न काटे, नगरविकास विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ.के.एच गोविंदराज, जलसंपदा विभागाचे प्रधान सचिव जयंत बोरकर, चिंचवड महापालिकेचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, विभागीय आयुक्त पुणे शितल तेली उगले आदि उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्यात दिवसेंदिवस नवीन वसाहती वाढत आहेत. वाढत्या लोकसंख्येची गरज लक्षात घेवून त्यानुसार पाण्याचे नियोजन आणि कार्यक्षम वापर झाला नाही, तर भविष्यात गंभीर जलसंकट निर्माण होऊ शकते. त्यामुळे पाण्याच्या प्रत्येक थेंबाचा वापर आणि दीर्घकालीन नियोजन करणे ही काळाची गरज आहे.



पिंपरी-चिंचवड शहराची भविष्यातील गरज लक्षात घेवून पवना थेट समांतर जलवाहिनी प्रकल्प हा शहरासाठी खूप महत्वाचा प्रकल्प ठरणार आहे. या प्रकल्पासाठी शेतक-यांशी संवाद साधण्यासाठी तयार आहे. स्थानिक लोकप्रतिनिधींनी देखील यासाठी पुढाकार घ्यावा. शासनाकडून शेतकऱ्यांना दिलेली आश्वासने पूर्ण करावीत यामध्ये दिरंगाई करू असेही ते म्हणाले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, कोणत्याही विकास प्रकल्पांना विरोध करण्याऐवजी लोकांचा विश्वास संपादन करून ते पुढे नेणे अधिक महत्वाचे आहे. यासाठी सर्व लोकप्रतिनिधी, सर्व राजकीय पक्ष, संबंधित विभाग आणि स्थानिक नागरिकांनी एकत्रितपणे काम करण्याची आवश्यकता आहे. महाराष्ट्राच्या विकासाचा वेग कायम ठेवत भविष्यातील गरजांचा विचार करून निर्णय घेणे आहे.

विकासासोबतच शेतकऱ्यांच्या हिताचे संरक्षण करणे ही सरकारची सर्वोच्च प्राथमिकता आहे. गेल्या अनेक दशकांतील निर्णयांचा संपूर्ण भार आजच्या पिढीवर टाकून चालणार नाही. मजबूत पाया तयार केल्याशिवाय कोणताही विकास प्रकल्प यशस्वी होऊ शकत नाही.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी पिंपरी-चिंचवडसह संपूर्ण पुणे महानगर प्रदेश लक्षात घेऊन २०५० पर्यंतचे दीर्घकालीन पाणी नियोजन करण्याचे दिले. वाढती लोकसंख्या, नागरीकरण आणि औद्योगिकीकरण लक्षात घेऊन भविष्यातील पिण्याच्या पाण्याची गरज, नवीन जलस्रोतांचे नियोजन आणि उपलब्ध जलस्रोतांचा कार्यक्षम वापर यासाठी समन्वित आराखडा तयार करावा, असे त्यांनी सांगितले. तसेच उपलब्ध पाण्याचा जास्तीत जास्त कार्यक्षम वापर करण्यासाठी सांडपाण्यावर प्रक्रिया करून त्याचा पुनर्वापर करण्यावर विशेष भर द्यावा.

औद्योगिक, व्यावसायिक तसेच उद्याने, आणि इतर बिगर-पेयजल वापरासाठी प्रक्रिया केलेल्या पाण्याचा वापर वाढवून पिण्याच्या पाण्यावरील ताण कमी करण्यासाठी आवश्यक उपाययोजना तातडीने राबविण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

पवना थेट समांतर जलवाहिनी प्रकल्पामुळे पिंपरी-चिंचवडला शाश्वत, सुरक्षित आणि भविष्योन्मुख पाणीपुरवठा होणार*

पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त डॉ विजय सूर्यवंशी यांनी पवना थेट समांतर जलवाहिनी प्रकल्पाबाबत सविस्तर सादरीकरण केले. शहराच्या वाढत्या लोकसंख्येला शुद्ध, सुरक्षित आणि अखंड पाणीपुरवठा करण्याच्या उद्देशाने पवना धरण ते सेक्टर २३, निगडी जलशुद्धीकरण केंद्रादरम्यान पवना थेट समांतर जलवाहिनी प्रकल्प राबविण्यात येणार आहे. पवना धरणातील शुद्ध पाणी थेट जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत प्रदूषणमुक्त आणि विश्वासार्ह पद्धतीने पोहोचविणे हे या प्रकल्पाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. सध्या पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या सुमारे लाख असून दररोज सुमारे ६५० एमएलडी पाणीपुरवठा केला जातो. यामध्ये पवना नदीतून ५२० एमएलडी, इंद्रायणी नदीतून १०० एमएलडी आणि एमआयडीसीमार्फत ३० एमएलडी पाणी मिळते. सध्याची पाण्याची मागणी सुमारे ६५५ एमएलडी असून मंजूर पाणी आरक्षण ७७६ एमएलडी आहे. लोकसंख्या वाढ लक्षात घेता हे आरक्षण २०२९ पर्यंत पुरेसे राहणार असल्याचा अंदाज करण्यात आला आहे. प्रस्तावित अंदाजानुसार २०३१ पर्यंत शहराची लोकसंख्या ५५ लाखांवर पोहोचण्याची शक्यता असून पाण्याची मागणी ९४९ एमएलडी होईल. २०४१ मध्ये लोकसंख्या ९५ लाखांवर गेल्यास मागणी १,६३८ एमएलडी आणि २०५१ मध्ये १३५ लाख लोकसंख्येसाठी २,३२८ एमएलडी पाण्याची आवश्यकता भासणार आहे. त्यामुळे भविष्यातील गरज लक्षात घेऊन हा प्रकल्प महत्त्वाचा ठरणार

## १७ लाखांच्या सावकारीतून जमीन बळकावल्याचा आरोप

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**सासवड :** बेकायदेशीर सावकारीच्या १७ रलाख रुपयांच्या कर्जाच्या बदल्यात शेतजमीन फसवणुकीने स्वतःच्या नावावर करून घेतल्याप्रकरणी सासवड पोलीस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संदीप सुखदेव दळवी, महेश सूर्यकांत गायकवाड (दोघे रा. हिवरे, ता. पुरंदर) आणि दिलीप भिंताडे (पूर्ण नाव व पत्ता उपलब्ध नाही) यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३१८(४), ३५२, ३५१(२) तसेच सावकारी अधिनियम कलम ३९ व ४४ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

या प्रकरणी फिर्यादी ऋषीकेश रामदास चांदगुडे (वय ३९, व्यवसाय – जिम मशिनरी खरेदी-विक्री, रा. केशवनगर, मुंढवा, पुणे) यांनी तक्रार दाखल केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी यांच्या आईवर कर्करोगाचे उपचार सुरू असल्याने तसेच स्वतःच्या आर्थिक अडचणीमुळे त्यांनी आरोपी दळवी व महेश गायकवाड यांच्याकडून पाच टक्के मासिक व्याजदराने १७ लाख रुपये घेतले होते. त्यानंतर १९ मे २०२५ रोजी सासवड येथील वाघीरे कॉलेज रोडवरील एचडीएफसी बँकेजवळील कान्हा स्नॅक्स सेंटर येथे सहा महिन्यांचे ५ लाख १० हजार रुपये व्याज रोख अदा करण्यात आले. तसेच व्याजाचा बोजा कमी करण्यासाठी आणखी ९० रुपये रोख देण्यात आले. याशिवाय आरोपी संदीप दळवी यांच्या सांगण्यावरून दिलीप भिंताडे यांच्या फोनपे खात्यावर १ लाख रुपये पाठविण्यात आल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. अशा प्रकारे आरोपींना एकूण ७ लाख रुपये दिल्याचा दावा करण्यात आला असून, त्यातील ६ लाख रुपयांची रोख रक्कम असलेली बॅग दिलीप भिंताडे याच्याकडे असल्याचेही तक्रारीत करण्यात आले आहे. तक्रारीनुसार, १ जुलै २०२५ रोजी ठरल्याप्रमाणे संपूर्ण व्यवहार पूर्ण करण्यासाठी पैसे उपलब्ध नसल्याने आरोपींनी फिर्यादीवर दबाव




टाकण्यास सुरुवात केली. आरोपी जमीन बळकावतील तसेच फिर्यादीचे वडील रामदास चांदगुडे यांना धमकावतील, या भीतीने ऋषीकेश चांदगुडे यांनी २६ जुलै २०२५ रोजी कोणालाही न सांगता घर सोडल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. घराबाहेर असताना २९ डिसेंबर २०२५ रोजी वडील रामदास चांदगुडे यांनी दिलेल्या कुलमुखत्यारपत्राचा गैरफायदा घेत आरोपी संदीप दळवी व महेश गायकवाड यांनी मौजे आंबी खुर्द, ता. बारामती, जि. पुणे येथील गट क्रमांक १८९ मधील ७० आर बागायती जमीन दस्त क्र. प.र.ध. १३६३५/२०२५ डरे पुरंदर दुय्यम निबंधक कार्यालयात स्वतःच्या नावावर खरेदीखत घेतल्याचा आरोप करण्यात आला आहे.संबंधित जमीन आणि कुलमुखत्यारपत्र हे केवळ कर्जाच्या तारणासाठी देण्यात आले होते. मात्र त्याचाच गैरवापर करून आरोपींनी जमीन स्वतःच्या नावावर करून घेतल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. या प्रकरणी पोलीस उपनिरीक्षक जाधव, सासवड पोलीस ठाणे यांनी गुन्हा नोंदविला असून पोलीस उपनिरीक्षक पालवे पुढील तपास करीत आहेत. तपास प्रभारी पोलीस निरीक्षक घोळवे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.र''ऋषीकेश रामदास चांदगुडे यांच्या फिर्यादीवरून संदीप सुखदेव दळवी, महेश सूर्यकांत गायकवाड आणि दिलीप भिंताडे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस उपनिरीक्षक पालवे पुढील तपास करीत आहेत.''

## वडगाव निंबाळकर पोलीस स्टेशन हद्दीत विशेष वाहतूक अंमलबजावणी मोहीम

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**बारामती :** तालुक्यातील वडगाव निंबाळकर पोलीस स्टेशन हद्दीत वाहतूक नियमांचे काटेकोर पालन व्हावे, अपघातांचे प्रमाण कमी व्हावे तसेच नागरिकांमध्ये वाहतूक नियमांविषयी जनजागृती निर्माण व्हावी या उद्देशाने विशेष वाहतूक अंमलबजावणी मोहीम राबविण्यात आली.

या मोहिमेदरम्यान मोटार वाहन कायद्याअंतर्गत कारवाई करण्यात आली. यामध्ये रंगीत (ब्लॅक फिल्म) काचा असणे,फॅन्सी/कलर नंबर प्लेट अथवा प्लेटनसलेली वाहणे,दुचाकीवर ट्रिपल सीट प्रवास,वैध वाहन चालविण्याचा परवाना नसणे,विना हेल्मेट दुचाकी चालविणे मालवाहू वाहनांवर आवश्यक रेड रिफ्लेक्टर नसणे,बुलेट मोटारसायकलमध्ये मॉडिफाईड (फटाका) सायलेन्सर बसविणे,इतर वाहतूक नियमांचे उल्लंघन अशा एकूण ८४ वाहनांवर कारवाई करत तब्बल ९३ हजार ५०० दंड वसूल केला आहे.

वाहनचालकांनी वाहतूक नियमांचे काटेकोरपणे पालन करावे, हेल्मेट व सीटबेल्टचा करावा, वाहनावर नियमबाह्य बदल करू नयेत तसेच वैध कागदपत्रे बाळगावीत. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध यापुढेही लहान मुलांना वाहन देणे अवजड वाहने यांच्यावरती कठोर कारवाई करण्यात येणार आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक संदीप गिल्ल, पुणे ग्रामीण, अप्पर पोलीस अधीक्षक. गणेश बिराजदार, बारामती विभाग तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी. चैतन्य कदम, बारामती उपविभाग मार्गदर्शनाखाली प्रभारी पोलीस निरीक्षक जीवन माने यांच्या सूचनेनुसार पोलीस उपनिरीक्षक राहुल साबळे, पोलीस हवालदार नाळे, पोलीस हवालदार खेडकर, पोलीस हवालदार देवकर तसेच पोलीस कॉन्स्टेबल जाधव, धोत्रे, भोसले, यादव व सोनवणे यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.




# जान्हवी कदमचे शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश

### शिष्यवृत्ती परीक्षेत ८१ टक्के तर नवोदय मध्येही ९७ टक्के गुण केले संपादित

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**जेजुरी :** बेलसर(ता.पुरंदर) गावातील कु. जान्हवी सुनील कदम हिने क्षेत्रात दुहेरी यश संपादन करत गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता पाचवी) २०२६ मध्ये तिने ३०० पैकी २४४ गुण (८१ टक्के) मिळवत जिल्हास्तरीय शिष्यवृत्तीधारक होण्याचा बहुमान मिळविला आहे. याचबरोबर तिची नवोदय परीक्षेत ९७.५० टक्के गुण प्राप्त करून नवोदय विद्यालय, पुणे येथेही निवड झाल्याने गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून ग्रामस्थ, शिक्षक, पालक आणि विविध स्तरांतून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

लहान वयातच सातत्यपूर्ण अभ्यास, जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर जान्हवीने हे उल्लेखनीय यश मिळविले आहे. तिच्या या यशामागे पालकांचे प्रोत्साहन, शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन आणि स्वतःची चिकाटी हे महत्त्वाचे घटक असल्याचे शिक्षकांनी सांगितले. जान्हवीच्या बेलसर गावाची शैक्षणिक परंपरा अधिक समृद्ध झाली असून इतर विद्यार्थ्यांसाठीही ती प्रेरणास्थान ठरली आहे.



जान्हवीच्यायशाबद्दल गावातील मान्यवर, ग्रामस्थ, शिक्षकवर्ग तसेच सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील व्यक्तींनी तिचे अभिनंदन करत पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छांचा वर्षाव केला. ''मेहनत, शिस्त आणि आत्मविश्वास यांच्या बळावर कोणतेही ध्येय गाठता येते,'' याचे उत्कृष्ट उदाहरण जान्हवीने यशातून दाखवून दिल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली.

मातोश्री जिजाई सोपानराव जाधव माध्यमिक विद्यालय,साकुर्डे या शाळेतील शिक्षकांनी सांगितले की, ''जान्हवी ही अत्यंत अभ्यासू, शिस्तप्रिय आणि जिज्ञासू विद्यार्थिनी आहे. तिच्या यशामुळे शाळेचे नाव उज्ज्वल झाले असून इतर विद्यार्थ्यांनाही अधिक मेहनत घेण्याची प्रेरणा मिळेल.''

## प्रधानमंत्री इंटर्नशिप योजना तिसऱ्या टप्प्या अंतर्गत तरुणांसाठी मोठी संधी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री इंटर्नशिप योजना (झचखड) २०२६ च्या तिसऱ्या टप्प्याची घोषणा करण्यात आली असून देशभरात ३१,४८० पेक्षा अधिक इंटर्नशिपच्या संधी उपलब्ध करण्यात आल्या आहेत. या माध्यमातून पुणे जिल्ह्यातील तरुणांना नामांकित कंपन्यांमध्ये प्रत्यक्ष कामाचा अनुभव घेण्याची मिळणार आहे. या योजनेंतर्गत उमेदवारांची पात्रता वय १८ ते २५ वर्षे, भारतीय नागरिकत्व आवश्यक, किमान १० वी, १२ वी, आयटीआय, डिप्लोमा किंवा पदवीधर उमेदवार अर्ज करण्यास पात्र राहतील. पूर्णवेळ नोकरी किंवा नियमित शिक्षण घेत असलेले उमेदवार अपात्र असतील. जे उमेदवार ऑनलाइन किंवा दूरस्थ शिक्षण घेत आहे ते उमेदवार पात्र इंटर्नशिपचा कालावधी ६ ते ९ महिने असून दरमहा रु. ९,०००/- विद्यावेतन दिले जाणार आहे. इंटर्नशिप पूर्ण केल्यानंतर प्रमाणपत्र देण्यात येईल. झचखड या योजनेमध्ये पुणे जिल्हयामधील जेसीबी इंडिया लिमि. (१२०), क्वीज कार्पो लिमी. (५०), बेलराईस इंङ लिमी. (२०), स्कोडा ऑटो व्होल्क्सवॅगन इ. प्रा. लि. (१), चोलमंडलम इन्वेस्टेमेंट आणि फायनान्स कं. (१५), बर्जर पेन्टस् इंडिया लि. (१४), एमक्युर फार्मासूटीकल्स लि. (५), एचडीएफसी बँक लि. (२२), एच. जी. इन्फ्रा इंजिनिअरिंग लि. (झअठढ दख) (४), हनीवेल टेक्नॉलॉजी सोल्युशन्स लॅब प्रा. लि. (७), जे.के. सिमेंट लि. (४), टेक महिंद्रा लि. (२०), द इंडियन हॉटेल्स कं. लि. (६) ई. नामांकित कंपनीमध्ये रिक्तपदांसाठी उमेदवारांना इंटर्नशिप संधी उपलब्ध आहे. तरी या कंपनीमध्ये ॲप्लाय करण्यासाठी मर्यादित कालावधी असल्यामुळे ाळिपींशॲपीहळ.लिर.सीं.ळप या पोर्टलवर जाऊन नादणी करुन रिक्तपदाना अर्ज करावा व या योजनेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, ४८१ रास्ता पेठ पुणे या कार्यालयास प्रत्यक्ष अथवा दुरध्वनी क्र. ०२०-२६,१३३६०६, वर वेळेत संपर्क साधावा.

## विवाह प्रोत्साहन योजनेचा लाभ घेण्याचे दिव्यांग सक्षमीकरण विभागाचे आवाहन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** दिव्यांग व्यक्तींचा विवाह ही एक संवेदनशील बाब असून सामाजिक समतेच्या दिशेने उचललेले महत्त्वाचे पाऊल आहे. त्यामुळे दिव्यांग-अव्यंग वधू वर तसेच दिव्यांग-दिव्यांग वधू वरांना समाजाच्या मुख्य प्रवाहात सामील करून घेण्यासाठी दिव्यांग सक्षमीकरण विभागामार्फत दिव्यांग व्यक्तींसाठी सामाजिक सुरक्षेतर्गत विवाह प्रोत्साहन योजना राबविली जाते. या योजनेचा लाभ घेण्यासाठी दिव्यांग सहाय्यक पोर्टल येथे अर्ज सादर करावा, असे आवाहन दिव्यांग सक्षमीकरण विभागाचे सचिव डॉ. माणिक गुरसळ आणि आयुक्त सत्यजित बडे यांनी केले आहे.

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ मधील कलम १० अन्वये दिव्यांग व्यक्तींना प्रजननाचा हक्क आणि कुटुंब नियोजनाचे अधिकार आहेत. तसेच दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ च्या कलम २४ मध्ये ''शासन आपल्या क्षमतेच्या आणि विकासाच्या मर्यादेत, दिव्यांग व्यक्तींना समाजात स्वतंत्रपणे राहता यावे, त्यांना पुरेसा राहणीमानाचा दर्जा मिळावा आणि त्यांच्या अधिकाराचे रक्षण करुन त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी आवश्यक योजना आणि कार्यक्रम तयार करेल'' असे नमुद केले आहे. त्यानुसार राज्य शासनाने दिव्यांग-अव्यंग विवाह योजनेत कालानुरूप बदल करून व दिव्यांग-दिव्यांग विवाह हा पर्याय नव्याने समाविष्ट नवीन शासन निर्णय १८ डिसेंबर २०२५ रोजी जारी केला होता.

त्यानुसार सामाजिक सुरक्षेतर्गत विवाह प्रोत्साहन योजनेतर्गत दिव्यांग-अव्यंग विवाहासाठी रुपये १ लाख ५० हजार रुपये, दिव्यांग-दिव्यांग विवाहासाठी रुपये २ लाख ५० हजार रुपये, अनुदानाची पूर्ण रक्कम पती व पत्नीच्या संयुक्त बँक खात्यामध्ये थेट लाभ हस्तांतरण (ृइढ) प्रणालीद्वरे जमा करण्यात येईल. ५० टक्के रक्कम संबंधित दाम्पत्याने ५ वर्षाकरिता मुदत ठेवीमध्ये ठेवावी लागणार आहे.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी वधू अथवा वराकडे दिव्यांग व्यक्ती अधिनियमाप्रमाणे किमान ४० टक्के अथवा त्यापेक्षा जास्त दिव्यांगत्वाचे आधारसंलग्न वैध वैश्विक ओळखपत्र (णृखखृ) आवश्यक आहे. दिव्यांग वधू किंवा वर यापैकी एक महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा. विवाहित वधू व प्रथम विवाह असावा तसेच वधू अथवा वर घटस्फोटीत असल्यास अशा प्रकारची मदत यापूर्वी घेतलेली नसावी. विवाह हा कायदेशीररित्या विवाह नोंदणी कार्यालयाकडे नोंदविलेला असावा. विवाह झाल्यानंतर एका वर्षाच्या आत त्यांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी संबंधित जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी यांचेकडे अर्ज करणे आवश्यक आहे.

लाभार्थ्यांनी शासन निर्णयामध्ये विहीत केलेल्या नमुन्यामध्ये आवश्यक कागदपत्रे अर्जासोबत जोडल्याची पूर्ण खात्री करुन परिपूर्ण अर्ज जिल्हा कार्यालयांकडे सादर करावेत. जिल्हा कार्यालयाकडून अर्जाची छाननी करुन पात्र लाभार्थ्यांचे प्रस्ताव निवड समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येतील.अधिक माहितीसाठी सहाय्यक आयुक्त, दिव्यांग सक्षमीकरण विभाग, जिल्हा परिषद कार्यालयाशी संपर्क साधावा,असेही श्री. बडे यांनी कळविले आहे.

## संत ज्ञानेश्वर महाराज समाधी मंदिरातील सुरक्षा व्यवस्थेची पोलिस आयुक्तांकडून पाहणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**आळंदी :** संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या आषाढी वारी पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवडचे पोलिस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी शुक्रवारी संत महाराज समाधी मंदिर परिसराला भेट देऊन सुरक्षा व्यवस्थेचा सविस्तर आढावा घेतला. मंदिर परिसर, दर्शन रांग, प्रवेश-निर्गमन मार्ग तसेच वारकऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी करण्यात आलेल्या उपाययोजनांची त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली. यावेळी



संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानच्या वतीने पोलिस आयुक्त विनयकुमार चौबे यांचा शाल व श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. या प्रसंगी संस्थानचे विश्वस्त डॉ.भावार्थ देखणे, पालखी सोहळा प्रमुख ॲड. राजेंद्र उमाप, विश्वस्त योगी निरंजननाथ, चैतन्य लोंढे (कबीरबुवा), पुरुषोत्तम पाटील, आळंदी नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे तसेच पोलिस विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. आषाढी वारीदरम्यान लाखो वारकरी आळंदीत दाखल होणार असल्याने कायदा व सुव्यवस्था, वाहतूक नियंत्रण आणि भाविकांच्या सुरक्षिततेसाठी पोलिस प्रशासनाने व्यापक नियोजन केले त्याचाच एक भाग म्हणून ही प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली.

## रिमझिम पावसाने दिलासा; दमदार सरींची प्रतीक्षा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**सोमेश्वरनगर :** बारामती तालुक्याच्या पश्चिम भागातील सोमेश्वर पंचक्रोशी परिसरात गेल्या चार-पाच दिवसांपासून सुरू असलेल्या रिमझिम पावसामुळे शेतकऱ्यांना काहीसा दिलासा मिळाला आहे. गेल्या दोन दिवसांपासून सकाळी सात वाजल्यापासून सुरू झालेल्या हलक्या पावसामुळे ओलावा निर्माण झाला असला, तरी खरीप हंगामासाठी आवश्यक असलेल्या दमदार आणि समाधानकारक पावसाची प्रतीक्षा अद्याप कायम आहे. यंदा अपेक्षित प्रमाणात पाऊस न झाल्याने खरीप पेरण्या खोळंबल्या असून अनेक शेतकरी पावसाच्या प्रतीक्षेत आहेत. रिमझिम पावसामुळे जमिनीतील आर्द्रता वाढण्यास मदत झाली असून पुढील काही दिवसांत मुसळधार पाऊस झाल्यास पेरणीच्या कामांना वेग अशी आशा शेतकऱ्यांनी व्यक्त केली.सोमेश्वर साखर कारखाना परिसरासह वाकी, चोपडज, मगरवाडी, होळ, सोरटेवाडी, करंजे, करंजेपूल, मुरूम, वाणेवाडी, वाघळवाडी आणि निंबुत परिसरातही हलक्या पावसाची नोंद झाली.

## द•ख•ल



## महादजी शिंदे इंग्लिश मीडियम स्कूलच्या पाच विद्यार्थ्यांचे यश

**श्रीगोंदा :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता पाचवी) व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता आठवी) यांचा निकाल नुकताच जाहीर झाला. या निकालात श्रीगोंदा येथील रयत शिक्षण संस्थेच्या महादजी शिंदे इंग्लिश मीडियम स्कूलने उल्लेखनीय यश संपादन करत शिष्यवृत्ती परीक्षेत चमकदार कामगिरी केली आहे. इयत्ता पाचवीत ऋग्वेद साकेत कारंजकर (२२२ गुण), प्रणवी ज्ञानेश्वर कुमकर (२१८ गुण), अथर्व अंकुश शिंदे (२०६ गुण) आणि श्लोक मनोज चाकणे (२०२ गुण) यांनी गुणवत्तापूर्ण यश मिळवत शिष्यवृत्ती पटकावली. तसेच इयत्ता आठवीतील मयुरेश विकास क्षीरसागर (२२० गुण) यानेही शिष्यवृत्ती मिळवत विद्यालयाच्या यशात मानाचा तुरा रोवला.विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य बाबासाहेबजी भोस, उत्तर विभागीय अधिकारी नवनाथ बोडखे, महादजी शिंदे विद्यालयाचे प्राचार्य दिलीप भुजबळ तसेच महादजी शिंदे इंग्लिश मीडियम स्कूलच्या मुख्याध्यापिका श्रीमती शेख एस. ए. यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे, पालकांचे आणि शिक्षकांचे अभिनंदन केले.

## कोरडगावच्या चौकात बसशेड नसल्याने प्रवाशांचे हाल

**कोरडगाव :** गावाच्या मुख्य चौकातील बसशेडचा अभाव आणि रस्त्यावरचे वाढते अतिक्रमण यामुळे प्रवाशांची दररोज प्रचंड गैरसोय होत असून, छोट्या-मोठ्या अपघातांचे प्रमाण चिंताजनकरीत्या वाढले आहे. प्रशासनाच्या निष्क्रियतेवर नागरिकांमध्ये संताप उसळला आहे. गावात बसशेड नसल्याने एस.टी. बसांना चौकात थांबणेच शक्य होत नाही. परिणामी बस वाटेतल्या जागोजागी थांबते आणि प्रवाशांना उघड्यावरच चढ-उतार करावा लागतो. यामुळे विद्यार्थ्यांना, महिलांना व वयोवृद्धांना त्रासाचा सामना करावा लागत आहे. दरम्यान, मुख्य चौकातील अतिक्रमण ही मोठी समस्या बनली आहे. दिवाळीपूर्वी एकदा अतिक्रमण काढण्यात आले असले, तरी ते शासनाच्या नियमानुसार न काढल्याने हातगाडे, टपऱ्या, चहाचे हॉटेल्स, भाजीपाला विक्रेते यांनी पुन्हा आपापली दुकाने थाटून बसणे सुरू केले आहे. चौकात गाड्यांची तोबा गर्दी, अव्यवस्थित पार्किंग आणि दोन्ही बाजूंनी व्यापारी मांडवांमुळे वाहतूक खोळंबते. या अव्यवस्थेमुळे दिवसेंदिवस अपघातांचे प्रमाण वाढत असून लहान मुलं, दुचाकीस्वार आणि पादचारी यांना सतत जीव मुठीत धरून रस्ता ओलांडावा लागत आहे. प्रशासनाने कारवाई केल्याचा दिखावा करून थांबले. नियमशीर रीतीने अतिक्रमण हटवले असते, तर ही परिस्थिती निर्माण झाली नसती, अशी टीका नागरिक करत आहेत. बसशेड उभारणी, चौकातील अतिक्रमण निर्मूलन आणि वाहतूक शिस्तीची तातडीने अंमलबजावणी न झाल्यास परिस्थिती आणखी गंभीर होईल, असा इशारा ग्रामस्थांनी दिला असून, संबंधित विभागांनी तात्काळ कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

## शिवपानंदचे दादासाहेब जंगले यांच्याशी शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर चर्चा

**लिंपणगाव:** महसूलमंत्र्यांचा एका सामान्य शेतकऱ्याला थेट फोन! राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे साहेब यांनी स्वतःहून फोन करून राज्यातील शेतकऱ्यांच्या शेत रस्त्याबाबत प्रतिक्रिया जाणून घेतल्याची अत्यंत महत्त्वपूर्ण घटना घडली.जवळपास पाच मिनिटे त्यांनी थेट संपर्क साधून, नुकत्याच घेतलेल्या शेतकरी हिताच्या शासन निर्णयांबाबत राज्यातील शेतकरी काय म्हणत आहेत, त्यांच्या भावना काय आहेत? आणि प्रत्यक्ष अंमलबजावणीबाबत काय प्रतिसाद मिळत आहे, याची सविस्तर माहिती घेतली.अचानक फोन आल्यामुळे शेतकऱ्यांच्या पाठीशी सरकार असल्याचे निष्पन्न झाले आहे. तरीही, एका सामान्य शेतकरी प्रतिनिधीशी थेट संवाद साधून शासन निर्णयांचा परिणाम जाणून घेण्याचा महसूलमंत्र्यांचा हा प्रयत्न निश्चितच कौतुकास्पद आहे. दरम्यान गेल्या दोन वर्षापासून महसूल मंत्री सातत्याने संपर्कात असून ग्राउंड लेव्हल होणारे अडचणी ते सातत्याने जाणून घेत शासन निर्णय मध्ये बदल करत आहेत. असे गौरवोद्गार राज्य समन्वयक जंगले पाटील यांनी व्यक्त केले आहे. शेतकऱ्यांच्या शेत रस्त्यांसंदर्भात अडचणी, सूचना आणि अपेक्षा थेट ऐकून त्यानुसार निर्णय प्रक्रियेला गती देण्याची ही भूमिका शासनाच्या संवेदनशीलतेचे प्रतीक आहे. राज्यातील शेतकरी बांधवांच्या भावना जाणून घेण्यासाठी स्वतः पुढाकार घेणाऱ्या महसूलमंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे साहेब यांचे राज्य समन्वयक दादासाहेब जंगले पाटील यांनी आभार व्यक्त केले.राज्यातील शेतकऱ्यांच्या रस्त्याविषयक अंमलबजावणी करताना येणाऱ्या त्रुटी जाणून महसूलमंत्र्यांना दुरुस्तीसाठी कळविल्या जातील असे शेत पांनंद रस्ते चळवळीचे राज्य समन्वयक दादासाहेब जंगले पाटील यांनी महसूल मंत्र्यांशी दूरध्वनी द्वारे संभाषण करताना व्यक्त केले.

## औषधी प्रशिक्षण परिषदेच्या प्राध्यापक सदस्यपदी चव्हाण



**हातगाव** - शेवगाव तालुक्यातील बोधेगाव येथील आबासाहेब काकडे कॉलेज बी.फार्मसी महाविद्यालयात सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत असलेले शंकर चव्हाण यांची अखिल भारतीय औषधी प्रशिक्षण परिषद' या नामांकित संस्थेच्या प्राध्यापक सदस्य पदी निवड करण्यात आली आहे. शंकर चव्हाण चव्हाण हे एम फार्म असून सध्या पी.एचडी. करत आहेत. औषधनिर्माणशास्त्र क्षेत्रातील त्यांचे योगदान आणि शैक्षणिक कार्याची दखल घेऊन अखिल भारतीय औषधी प्रशिक्षण परिषदेने त्यांना हे मानाचे सदस्यत्व बहाल केले आहे. या निवडीमुळे शैक्षणिक आणि औषधनिर्माण क्षेत्रात त्यांचे कौतुक होत आहे. ही संस्था भारतातील औषधनिर्माण क्षेत्रातील व्यावसायिकांना प्रशिक्षण,राष्ट्रीय ओळख आणि संशोधनासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देते. या सदस्यत्वामुळे शंकर चव्हाण यांना राष्ट्रीय स्तरावरील विविध कार्यशाळा, सेमिनार आणि शैक्षणिक प्रकल्पांमध्ये सहभागी होण्याची संधी मिळणार आहे. त्यांच्या या निवडीबद्दल संस्थेचे सचिव ड.शिवाजीराव काकडे, जिल्हा परिषद सदस्या हर्षदाताई काकडे, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.लक्ष्मणराव बिटाळ, उपमुख्य कार्यकारी अधिकारी पृथ्वीसिंह काकडे, कॅम्पस डायरेक्टर भाग्यश्रीताई पाटील, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.हेमंत गांगुर्डे यांच्यासह महाविद्यालयातील त्यांचे सहकारी प्राध्यापकांनी अभिनंदन केले असून, ग्रामीण भागातील प्राध्यापकाने राष्ट्रीय स्तरावर मिळवलेले हे यश कौतुकास्पद मानले जात आहे.

# करंजी घाट: दरड कोसळल्याने अधिकाऱ्यांवर कारवाई करा

## आ. मोनिका राजळेंनी अधिवेशनात सभागृहाचे लक्ष वेधले



**अविनाश मंत्री। राष्ट्र सह्याद्री**

**पाथर्डी :** वर्षभरापासून प्रलंबित असलेल्या करंजी घाटातील कोसळलेल्या दरड दुरुस्तीचे काम होत नसल्याने आ.मोनिका राजळे यांनी शुक्रवारी विधानसभेत शासनाचे लक्ष वेधून तातडीने घाट दुरुस्त करावा व बेजबाबदार अधिकाऱ्यांविरुद्ध तीव्र शब्दात नाराजी व्यक्त करत कारवाई करण्याची मागणी केली.

मागील वर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे कल्याण विशाखापट्टण या राष्ट्रीय महामार्गावरील करंजी घाटामध्ये घाट चढताना ज्या बाजूचा भराव वाहून गेला. त्या ठिकाणी मोठे खड्डे पडले. गेल्या आठ दिवसाच्या भिज पावसाने या खड्ड्यामधील असलेला आतील बाजूकडील भराव सुद्धा सुटू लागला आहे. अवजड व अति अवजड वाहने येथून चालवताना खड्ड्याच्या बाजूने म्हणजे चुकीच्या दिशेने वाहन चालवावे लागते. दरम्यानच्या काळात समोरून उताराच्या बाजूने भरधाव वाहन आल्यास साईड गटरमध्ये अचानक गाडी घालण्याचा प्रयत्न करत जीव वाचवावा लागतो. असे अनेक प्रकार घडले आहेत. या घाटाची दुरुस्ती व्हावी यासाठी वर्षभर अनेक आंदोलने झाली. मागील महिन्यात सामाजिक कार्यकर्ते प्रशांत सोनवणे यांनी घाटात खड्ड्यापुढे बसत मुंडण आंदोलन केले. त्यावेळी राष्ट्रीय महामार्गाच्या दुय्यम दर्जाच्या प्रतिनिधींनी घटनास्थळी येत दरड दुरुस्तीचे अंदाजपत्रक वरिष्ठ कार्यालयाला मंजुरीसाठी पाठवले असून मंजुरी मिळताच दुरुस्ती करू असे आश्वासन दिले होते. नगरवरून शिरूरकासार तालुक्यामध्ये मोटरसायकलवर जाताना दुचाकीस्वार खड्ड्याचा अंदाज न आल्याने गाडी कंट्रोल करता करता टेम्पोवर जाऊन धडकला. त्यात तो गंभीर जखमी झाला. मागील आठवड्यात आ. मोनिका राजळे अधिवेशनावरून गावाकडे येत असताना त्यांच्यासमोर अपघात झाला. त्यांनी अपघातग्रस्त तरुणीला स्वतःच्या गाडीतून पाथर्डीच्या उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. सर्वोच्च न्यायालयाचे आदेश धाब्यावर बसवून महामार्ग विभागाच्या अधिकाऱ्यांनी ठिकठिकाणी गतिरोधक उभारले. या रस्त्यावर गतिरोधकांनी शंभरी पार केलेली आहे. कोणाचे कोणावर नेमके नियंत्रण नंतर राहिले नाही. पाथर्डी शहरातील जुन्या बस स्थानक परिसरातील निकृष्ट पद्धतीने झालेले गटारीचे काम, आंबेडकर चौकात पडलेले खड्डे, निवडुंगे गावाच्या हद्दीत व मानमोडी च्या ओढ्यामध्ये उभारलेल्या पुलाच्या कामातून निर्माण झालेल्या खटक्या, मेहेकरीच्या पुलाची रुंदी कमी करत अशास्त्रीय पद्धतीने उभारलेले गतिरोधक अशा एक ना अनेक चुका असूनही केवळ या रस्त्याला महामार्गाच्या दर्जा दिला म्हणून नाईलाजाने याला राष्ट्रीय महामार्ग म्हणावे लागते. वाहतुकीला अडथळा ठरणारी शहरातील विविध अतिक्रमणे, दळणवळणासाठी होणाऱ्या अडचणी, देखभाल व दुरुस्ती यापेक्षा माळी बाबळगाव हद्दीतून बाह्य वळण रस्ता प्रस्तावित असून यामुळे पाथर्डी शहर अलगदपणे सर्वच दृष्टीने वेगळे पडणार आहे. पोलीस प्रशासन, महसूल प्रशासन, पालिका प्रशासन यांना राजमार्ग व महामार्ग सुरळीत कसे राहतील यासाठी योगदान देण्यामध्ये फारसा रस नाही. एखाद्या टपरीसाठी एखादा नगरसेवक प्रतिष्ठेचा मुद्दा करतो. लोकांचा विरोध असे कारण सांगत अतिक्रमणे हटविण्याबाबत महामार्ग प्रशासन उदासीनता दाखवत आहे. भविष्यामध्ये शहराला फक्त भेळ, वडापाव गोल्डन चहा यासाठीच शहरवासी ओळखतील. कारण बाहेरचे प्रवासी बाहेरूनच जातील. कुणी कुणाला दुखवायचं, कोणी कोणाला पाठबळ द्यायचं, कोणाच्या हातून कोणाची जिरवायची, या खेळामध्ये शहर व बाजारपेठेचे पूर्ण वाटोळे झाले आहे. हाताला काम नसल्याने गुन्हेगारी वाढून गुटका, मावा, अमली पदार्थ, शस्त्रास्त्र विक्रीचे विविध अड्डे पोलिसांच्या तपासामध्ये पुढे येत आहे. याचाही विचार शहरावर मनापासून प्रेम करणाऱ्या प्रत्येक शहरवासीयाने करण्याची हीच वेळ आहे. वारंवार पाठपुरावा करूनही महामार्ग अधिकाऱ्याकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत नसल्याने आमदार राजळे यांनी या गंभीर विषयाकडे शासनाचे लक्ष वेधताना निगरगट्ट अधिकाऱ्यांच्या बेजबाबदार वर्तनावरही कडक शब्दात ताशेरे ओढले. शाखा अभियंता, कार्यकारी अभियंता, अधीक्षक अभियंता, सहाय्यक मुख्य अभियंता, मुख्य अभियंता, सचिव, आशा टप्प्यांवरच्या अधिकाऱ्यांकडून कनिष्ठ अधिकाऱ्यांवर राजरोस आरोप होऊनही पांघरूण कसे घातले जाते, असाही प्रश्न यानिमित्ताने चर्चेला आला आहे.

## शेवगावात मावा विक्री तेजीत

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**शेवगाव :** शेवगाव येथे शरीराला अपायकारक असणारा मावा विक्री तेजीत सुरू असून सुगंधी तंबाखू पासून बनवल्या जाणाऱ्या माव्यावर प्रतिबंधक कोण लावणार असा प्रश्न शेवगावचे सुजाण नागरिक विचारीत आहेत.

या विषयी राष्ट्र सह्याद्रीने दोन दिवसांपूर्वीच मावा विक्री होत असल्याची बातमी दिली होती. मात्र प्रशासनाने अद्यापही मावा विक्री करणाऱ्यांवर कोणतीही कारवाई केलेली नाही. शहरात क्रांती चौक, आंबेडकर चौक, ईदगाह मैदान, आखेगाव चौक, छत्रपती शिवाजी महाराज ठिकाणी माव्याची जोरदार विक्री चालू आहे. मावा विक्री हातोहात होत असल्याने अनेकांनी कोटींचे इमले उभारले आहेत. मावा हा मनुष्याच्या आरोग्याला हानिकारक असून माव्यामुळे तोंडाच्या कॅन्सरचा विळखा शहरातील अनेक तरुणांना बसल्याचे चित्र दिसत आहे. कॅन्सरच्या आजारामुळे काही जणांनी आपला प्राणही गमावल्याच्या घटना मागील दोन ते तीन वर्षात घडलेल्या आहेत.

**मावा प्रश्नी आ. राजळे लक्षवेधी मांडणार का?**
सध्या पावसाळी अधिवेशन चालू असून शेवगाव शहरात व तालुक्यात मानवास आरोग्यास हानिकारक असणाऱ्या मावा प्रश्नी शेवगाव तालुक्याच्या आ. मोनिका राजळे आपल्या लक्षवेधीत मांडणार का? असा प्रश्न नागरिकांमधून उपस्थित होत आहे. ज्याप्रमाणे आ. विक्रमसिंह पाचपुते यांनी शीतपेय विषयी लक्षवेधी मांडून त्यावर तातडीने उपाययोजना करण्याची सूचना केली. त्याचप्रमाणे शेवगाव पाथर्डीच्या आ. आपली भूमिका विधिमंडळात मांडणार का? हा प्रश्न शेवगावकर विचारीत आहेत.

या मावा विक्री करणाऱ्या वर शासन कारवाई कधी करणार हे अद्या स्पष्ट होऊ शकलेले नाही. थातुर् कारवाई करून स्थानिक गुन्हे अन्वेषण चे कर्मचारी अर्थपूर्ण संबंध जोपासून गुन्हे दाखल न करता कमाई करत असल्याचीही चर्चा नागरिका मध्ये होत आहे.

## ना.आठवलें यांच्या शेवगाव दौऱ्याची जय्यत तयारी सुरू

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**हातगाव:** मंगळवार ( दि.७ ) रोजी केंद्रीय सामाजिक न्याय राज्य मंत्री व रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे ( आठवले गट) राष्ट्रीय अध्यक्ष रामदास आठवले यांच्या प्रमुख उपस्थितीत शेवगाव शहरातील अहिल्यानगर मार्गावरील महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सध्या असलेल्या पुतळ्याच्या ठिकाणी नव्याने पूर्णाकृती पुतळा भूमिपूजन समारंभ व त्यानंतर रिपब्लिकन पक्षाचा भव्य मेळावा पार पडत असलेबाबतची माहिती आरपीआयचे शेवगाव तालुकाप्रमुख सतिष मगर यांनी दिली आहे. या बाबत माहिती देताना ते म्हणाले की,सदर कार्यक्रमाची जय्यत तयारी सुरू असून मंगळवारी दुपारी ४ वाजता ना. आठवले यांचे शेवगाव शहरात आगमन होणार असून त्यांचेसह इतरही उपस्थित असलेल्या अनेक मान्यवरांच्या हस्ते महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे भूमिपूजन कार्यक्रम पार पडणार असून त्यानंतर आखेगाव रोडवरील साईधन येथील मंगल कार्यालयात रिपालिकन पार्टी ऑफ इंडियाचा दक्षिण विभागातील कार्यकर्त्यांचा संकल्प मेळावा पार पडणार आहे. तरी या कार्यक्रमासाठी जिल्ह्यातील सर्व आंबेडकर चळवळीतील कार्यकर्त्यांनी व अनुयायांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी असेही शेवटी मगर यांनी म्हटले आहे.



## उज्वल भविष्यासाठी जलसंधारणाची कामे : झावरे

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**टाकळी ढोकेश्वर :** निसर्गाने दिलेले संकेत ओळखून आपण सर्वांनी जलसंधारणाच्या कामांना प्राधान्य दिले पाहिजे.पाणी आगामी काळातील सर्वात मोठी गरज असून आपल्या सर्वांच्या उज्वल भविष्यासाठी लोकसहभागातून जलसंधारणाची कामे करावीत असे प्रतिपादन जि.प.चे माजी उपाध्यक्ष सुजितराव झावरे पाटील यांनी केले. गाजदीपूर (वडगाव सावताळ) येथे 'गाळमुक्त धरण, गाळमुक्त शिवार अभियानांतर्गत' आयोजित पाझर तलाव खोलीकरण कामाच्या शुभारंभप्रसंगी ते बोलत होते. यावेळी झावरे पा. पुढे म्हणाले की, या उपक्रमामुळे तलावातील साचलेला गाळ निघणार असून, तलावाची पाणी साठवण क्षमता मोठ्या प्रमाणावर वाढणार आहे. परिणामी, परिसरातील भूजल पातळी वाढण्यास मदत होणार आहे. याप्रसंगी स्वप्निल झावरे, राजेंद्र रोकडे, दिलीप पाटोळे, बाळासाहेब झावरे, योगेश रोकडे, दत्ता शिंदे, अमोल शिंदे, इंजि.प्रसाद झावरे, किरण रांधवन, इंजि.प्रतीक लोळगे, उत्तम नऱ्हे, दादाभाऊ नऱ्हे, पाटीलनाना सातकर, सागर करगळ, सुभाष करगळ, खंडू कोळेकर, देवका बर्डे,अशोक सातकर, बाळासाहेब सातकर, संतोष करगळ,धनु करगळ,शंकर करगळ, बाबासाहेब काळे,विशाल तिखोळे,विष्णू करगळ, दत्तोबा तिखोळे, चंद्रकांत झिटे, उमेश सातकर,राधु सातकर, गबाजी करगळ, सतिष करगळ, भिरु करगळ, सोमा पवार, उपस्थित होते.



## शहरटाकळी विद्यालयात सुंदर हस्ताक्षर स्पर्धेत ३९९ विद्यार्थ्यांचा सहभाग

**प्रवीण खोमणे। राष्ट्र सह्याद्री**

**एरंडगाव :** वर्षभरापासून कर्मयोगी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाचे शेवगाव तालुक्यातील शहरटाकळी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये कर्मयोगी आबासाहेब काकडे यांचा '१०७' वा जयंती पंधरवडा समारंभ निमित्त विद्यालयामध्ये विद्यार्थ्यांच्या सुप्तशक्तींना वाव देण्यासाठी व विद्यार्थ्यांच्या लेखन कौशल्याचा विकास करण्यासाठी मराठी, इंग्रजी भाषेची भव्य 'सुंदर हस्ताक्षर' स्पर्धेचे आयोजन विद्यालयाचे शिक्षक गणेश लबडे व सहशिक्षिका आशा कानडे यांच्या मार्गदर्शनाखाली केले होते.यामध्ये ३९९विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यावेळी झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अमोल पानकर, प्राचार्या अंजली चिंतामण, पर्यवेक्षक पोपट खताळ, सहशिक्षक बाळकृष्ण ठोंबळ ,रामदास पांढरे, आदिनाथ काटे, दिपक बोडखे, प्रवीण लद्दे, राहुल गायके, सचिन गाडे ,सचिन कमानदार, बाळासाहेब दिंडे, रीना हांडे, निलोफर शेख,उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांच्या सहभागातून '१०७' या अंकाची भव्य मानवी प्रतिकृती यांनी परीक्षण करून विजेत्या विद्यार्थ्यांची निवड केली. यामध्ये गट पहिला (५ वी ते ८वी) मराठी सुंदर हस्ताक्षर स्पर्धेत संस्कृती संतोष ठोंबळ (प्रथम) श्रावणी नितीन इंगळे (द्वितीय) राजनंदिनी रामदास चव्हाण व अंकिता सचिन गिराम संयुक्तपणे (तृतीय) तर इंग्रजीमध्ये गौरी अंकुश भालेराव (प्रथम) दुर्वा महेश आमले (द्वितीय )व मानसी रोहित चंगेडिया व रुद्र विनोद जोशी संयुक्तपणे (तृतीय) दुसरा (९ वी ते १०) यामध्ये मराठीमध्ये प्राप्ती शांतवन वाघमारे (प्रथम), कुमारी पूजा नामदेव राजळे (द्वितीय), भारती अरुण गांगुर्डे (तृतीय), इंग्रजीमध्ये संध्या संजय दळवी (प्रथम)प्रीती मोहन कोल्हे (द्वितीय )समीक्षा शिवनाथ गिरम (तृतीय), तसेच गट क्रमांक तीन (११ वी १२ वी) मराठीमध्ये गुंड मयुरी संदीप (प्रथम) लोंढे श्रुतिका सर्जेराव (द्वितीय) योगिता संतोष सातपुते (तृतीय) इंग्रजी सुंदर हस्ताक्षर स्पर्धेत ऋतुजा कडुबाळ विधाटे (प्रथम), ज्ञानेश्वरी राजकुमार ठोंबळ (द्वितीय) स्नेहल आदिनाथ बर्डे (तृतीय) यांनी यश संपादन केले .

## अळकुटीत आ. दातेंच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादीत प्रवेश

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**पारनेर :** तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या संघटनात्मक विस्ताराला आज नवे बळ मिळाले. विकासाभिमुख नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत अळकुटी परिसरातील विविध कार्यकर्त्यांनी पारनेर-नगरचे आ. काशिनाथ दाते यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला तालुका उपाध्यक्षा रेश्माताई मच्छिंद्र गलांडे व तालुका उपाध्यक्ष सुरेश परंडवाल यांच्या पुढाकारातून आयोजित कार्यक्रमात आसिफ मोमीन, राजू पारखे, अभय शित्रे, राजेंद्र शिरोळे, राजेंद्र बोरुडे, गणेश शित्रे, अयुब मोमीन, नवनाथ गाडगे, सलीम मोमीन, सोहेल मोमीन, आयान मोमीन, अस्लम शेख आणि इकबाल आतार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचा झेंडा हाती घेत पक्षाच्या विचारधारेवर विश्वास व्यक्त केला. यावेळी आ. काशिनाथ दाते म्हणाले, राष्ट्रवादी काँग्रेस हा सामान्य माणसाच्या आशा- आकांक्षांचा पक्ष आहे. जनतेचा विश्वास व विकासाचे राजकारण हीच आमची खरी ताकद आहे. अळकुटी परिसरातील प्रत्येक गावाच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. आज पक्षात प्रवेश करणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्याचा सन्मान राखत जनतेच्या विश्वासाला न्याय देण्यासाठी आपण सर्वजण एकजुटीने काम करू.

कार्यक्रमास पारनेर राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष विक्रमसिंह कळमकर, नगरसेवक अशोक चेडे, सुनिल गाडगे, मच्छिंद्र गलांडे, सुखदा परंडवाल, गणेश गलांडे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.अळकुटी व परिसरातील या पक्षप्रवेशामुळे राष्ट्रवादी काँग्रेसची संघटनात्मक ताकद वायव्य भागात अधिक भक्कम झाल्याचे मानले जात आहे.



अळकुटी आणि परिसरातील कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षावर दाखवलेला विश्वास आमच्यासाठी मोठी जबाबदारी आहे. आ.काशिनाथ दाते सर यांच्या विकासाभिमुख, सर्वसमावेशक आणि जनतेशी नाळ जोडलेल्या नेतृत्वामुळे आज अनेक युवा आणि ज्येष्ठ कार्यकर्ते स्वयंस्फूर्तीने पक्षात सहभागी होत आहेत. प्रत्येक गावाच्या विकासासाठी आम्ही संघटनेच्या माध्यमातून अधिक ताकदीने काम करू. जनतेचा विश्वास हीच आमची खरी ताकद असून, तो कायम राखण्यासाठी आम्ही सदैव कटिबद्ध आहोत.

**रेश्मा गलांडे,** तालुका उपाध्यक्षा,राष्ट्रवादी महिला काँग्रेस.

# कर्जतमध्ये एकाच वेळी शेकडो विद्यार्थी रस्त्यावर!

## वाहतुक कोंडीमुळे विद्यार्थी सुरक्षा रामभरोसे; कायमस्वरुपी पोलीस नियुक्तीची मागणी

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**कर्जत :** शहरात पुन्हा एकदा वाहतूक कोंडीने डोके वर काढले असून वाहतूक नियमन करताना पोलीस प्रशासनाची देखील दमछाक होते. त्यात शाळा सुटताना एकाच वेळी शेकडो विद्यार्थी रस्त्यावर उतरत असून त्यांच्या सुरक्षितता देखील रामभरोसेच राहत आहे. यात अनेकदा लहान-सहान अपघाताचे प्रकार पुढे येत आहे. किमान शाळा सुटताना एक खमक्या पोलीस कर्मचारी नियुक्त करावा अशी मागणी विद्यार्थी पालकांमधून पुढे येत आहे. शनिवारी वाहतूक कोंडीत दीड किलोमीटर अंतर पार करण्यासाठी चालकांना २० मिनिटे खर्ची करावी लागली.

शनिवारी, दुपारी एक वाजता कर्जत शहराच्या मुख्य रस्त्यासह अंतर्गत जुन्या पंचायत समिती रोडवर देखील मोठी वाहतूक कोंडी जाणवली. दादा पाटील महाविद्यालयात ते भांडेवाडी हे दीड किमी अंतर कापण्यासाठी वाहनचालकांना



तब्बल २० ते २५ मिनिटे लागली. कर्जतच्या मुख्य रस्त्यावर पुन्हा एकदा अस्ताव्यस्त वाहने उभी करणे, काही वाहन चालक विनाकारण रस्त्यात उभा राहत काही काळ गप्पा मारत उभा राहिल्याने वाहतूक कोंडी निर्माण होते. यात अनेकदा वाहनांच्या लांबच-लांब रांगा लागतात. पोलीस प्रशासन अशा वाहनांवर कधी-कधी दंडात्मक कारवाई करीत असले तरी कायमस्वरूपी खमक्या वाहतूक नियंत्रण करणारा पोलीस काळाची गरज बनली आहे. विशेष म्हणजे कर्जतच्या मुख्य रस्त्यावरच जिल्हा परिषद शाळा, महात्मा गांधी विद्यालय, कन्या विद्यालय तसेच दादा पाटील महाविद्यालय, रविशंकर विद्यामंदिर, अमरनाथ विद्यालय, समर्थ विद्यालय अशी मोठं-मोठी शैक्षणिक संकुल आहेत. संध्याकाळी चारच्या सुमारास यातील जवळपास सर्वच विद्यालयाची शाळा सुटण्याची वेळ एकच असल्याने या काळात शेकडो विद्यार्थी रस्त्यावर येतात. अशा वेळी वाहतूक कोंडी जास्त जाणवते. त्यात विद्यार्थी रस्त्यावर असताना आपली वाहने पुढे दामटण्याची स्पर्धा वाहन चालकांत लागल्याने अनेकदा लहान-सहान अपघाताची उदाहरणे समोर आली आहेत. त्यामुळे शाळा सुटताना महात्मा फुले चौक आणि छत्रपती शिवाजी महाराज चौकात किमान दोन पोलिसांची नियुक्तीची आवश्यकता असल्याचे विद्यार्थी पालकांची मागणी आहे. मात्र पोलीस कर्मचाऱ्यांची तोकडी संख्या अशी कारणे दाखवत याकडे सपशेल कानाडोळा करण्यात येतो. त्यामुळे कर्जतकरांनी पर्यायी रिंगरोडची देखील मागणी केली. मात्र त्यास देखील केराची टोपली दाखवण्यात येते.



**सोनई** : निळे, काळे कुट्ट, नभ, पावसाचे आगमन होण्याची वाट पाहत सोनईकर व शनिशिगंनापूरकर आतुर असतानाच आनंददायी आभाळाचा मनमोहक नजराणा अवकाशात पाहायला मिळाला आहे. **(छाया - विजय खंडागळे)**

# कोपरगाव उपनगराध्यक्षाच्या जाती वरून वाद उफाळला

## महार की ख्रिश्चन, काळे की कोल्हे




**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी** : कोपरगाव नगर परिषदचे उपनगराध्यक्ष जितेंद्र रणशूर यांचे अनुसूचित जातीचे जात प्रमाणपत्र जात पडताळणी विभागाने रद्दबातल ठरवल्याने कोपरगावात दोन गटात संघर्ष उभा राहिला असून आ काळे व आ .कोल्हे यांच्या आंबेडकरी समर्थकांमधे एकमेकांच्या बाह्या वर करण्यापर्यंत मजल गेल्याने कोपरगाव च्या राजकारणात आंबेडकरी जनेतेमध्ये संघर्षाचे वातावरण निर्माण झाले आहे. या संघर्षा चा प्रमुख मुद्दा आहे तो कोपरगाव नगर परिषदेचे उपनगराध्यक्षाचे जात प्रमाणपत्र रद्दबातल ठरवणे.

गेल्या सहा महिन्यापूर्वी कोपरगाव नगरपरिषदेची निवडणूक झाली त्यामध्ये भाजपा अर्थात कोल्हे गटाने बाजी मारत सत्ता हस्तगत केली. नगराध्यक्षपदी पराग संधान तर उपनगराध्यक्षपदी आंबेडकरी चळवळीचे कार्यकर्ते जितेंद्र रणशुर यांची निवड करण्यात आली. निवडणुकीच्या काळापासूनच आ . काळे आणि आ. कोल्हे यांचेतील संघर्ष आरोप प्रत्यारोपावरून विकोपाला गेला होता . या निवडणुकीत जितेंद्र रणशूर यांनी विरोधकांवर तुटून पडत फायर ब्रँड ची भूमिका कोल्हे गटकडून निभावली होती. अतिशय गरमागरम वातावरणामध्ये कोपरगावची ही निवडणूक पार पडली. त्यानंतर नगराध्यक्ष व उपनगराध्यक्ष यांनी पदभार स्वीकारल्यानंतर आमदार काळे गटाच्या काही नगरसेवकांकडून जितेंद्र रणशूर हे अनुसूचित जातीचे नसून त्यांच्या वडिलांचा ख्रिश्चन दाखला असल्याचे निदर्शनास आणून दिले होते. त्याबाबत तकार करत आ. काळे समर्थक यांनी जात पडताळणी विभाग व जिल्हाधिकारी यांचेकडे तक्रार करून जितेंद्र रणशूर यांच्या जात प्रमाणपत्रावर आक्षेप घेत ते रद्द करावे त्याची पडताळणी करून रद्द करावे अशी मागणी केली होती.

त्याचा निकाल नुकताच लागला असून उपनगराध्यक्ष जितेंद्र रणशूर यांचे हिंदू महार अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र रद्दबातल करण्यात आले व सदर प्रमाणपत्र शासनाला जमा करावे असाही आदेश त्यात देण्यात आला आहे. याचा आनंद काळे गटाच्या कार्यकर्त्यांना झाल्याने त्यांनी फटाके वाजवत जल्लोष केला हा जल्लोष कोल्हे गटाचे उपनगराध्यक्ष जितेंद्र रणशूर यांच्या जिव्हारी लागला. यानंतर त्यांनी पत्रकार परिषद घेत माझे हिंदू महार प्रमाणपत्र कसे कुठून आले याचे स्पष्टिकरण त्यांनी दिले. त्यासाठी त्यांनी कोल्हे गटाला मानणारे समर्थक उपस्थित करत पुरावे देण्याचा प्रयत्न करताना आ. आशुतोष काळेच या मागचे सुत्रधार असून झालेल्या प्रकाराचे खापर फोडत निषेध व्यक्त केला. तसेच कोपरगाव तालुक्यातील आंबेडकरी चळवळीचे खच्चीकरण करून आ. काळे कसे संपवू पहात आहे, याचे उदाहरणे दिली.

त्यांचे समवेत असणाऱ्या कोल्हे समर्थकांनी तर रस्त्यात गाठवू असा ही पवित्रा घेतला. त्यामुळे या पत्रकार परिषदेतून असा संदेश देण्यात आला की आ. कोल्हे हे तारणहार असून काळे खरोखरच आंबेडकरी जनतेचे विरोधक आहेत . या पत्रकार परिषदेत आ काळे यांचेवर केलेल्या आरोपांनी त्यांच्या आंबेडकर समर्थकात अस्वस्थता पसरली त्यांनी ही रणशूर यांच्या आरोपांना उत्तर देण्यासाठी प्रती पत्रकार परिषद घेत रणशूर यांचा समाचार घेतला. आ काळे समर्थक म्हणाले की रणशूर यांनी कधी निळा गमच्छा घातला नाही.

तसेच त्यांच्या नेत्यांना माहिते होते रणशूर यांचे अनुसुचित जाती चे प्रमाण पत्र खरे नाही तरी त्यांना त्यानी तिकीट दिले रणशूर यांची फसवणूक खुदद त्यांच्याच नेत्यांनी केली असल्याने आ काळें वर बोलण्याचा त्यांना अधिकार नाही. तसेच आ. काळे हेच कसे बौद्ध समाजाचे कैवारी आहेत त्यांनी समाजासाठी मोठे भरीव काम केले याचे अनेक दाखले त्यांनी सादर केले. त्यामुळे आ आशुतोष काळे यांचे वर आरोप करताना विचार करून बोला अन्यथा जशास तसे उत्तर देण्यात येईल असा इशारा देण्यात आला. हे भांडण आतून जरी काळे कोल्हे यांचे असले तरी ते दोन्ही आधिकृतपणे मिडीया समोर आले नाही.

मात्र त्यांचे आंबेडकरी समर्थक मात्र मिडीया समोर एकमेकांना भिडताना दिसत आहे. यावरून हा वाद आता नुसत्या जात प्रमाणपत्राचा नसून या निमित्ताने कुणाकडे किती आंबेडकरी जनता आहे. याची उजळणी करणारा आहे. कोपरगाव तालुक्यात मराठा समाजा नंतर बौद्ध समाजाची दोन नंबर ची वोट बँक आहे. या समाजावर बरेचसे राजकारण फिरत असते. त्यामुळे या निमीत्ताने आम्हीच कसे या समाजाचे बाजूने न्यायाची भूमिका घेतो यासाठी दोन्ही नेते ताकत लावताना दिसत आहे. रणशूर यांचे पद राहील किंवा जाईल यापेक्षा कुणाची ताकद जास्त हेच या विवादातून पुढे येणार आहे.

---

# घारगावजवळ भीषण अपघात

## इकोच्या धडकेत दुचाकीस्वार गंभीर जखमी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**घारगाव** : घारगाव-खंदरमाळवाडी रस्त्यावरील खंदरमाळ शिवारात मारुती इको कारने मोटारसायकलला समोरून जोरदार धडक दिल्याने दुचाकीस्वार गंभीर जखमी झाले आहेत. राजेंद्र वसंत कजबे (वय ५१, रा. खंदरमाळवाडी) असे जखमीचे नाव आहे. त्यांच्यावर लोणी येथील प्रवरा हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. राजेंद्र कजबे हे दि. २४ जून रोजी दुपारी आपल्या मोटारसायकलने (MH 17 -B 9461) घारगाववरून गावाकडे जात होते. खंदरमाळ शिवारात सुरेश कजबे यांच्या दुकानासमोर आले असता, समोरून भरधाव व निष्काळजीपणे आलेल्या इको कारने (क्र. MH 17 CX 3018) त्यांना भीषण धडक दिली.

अपघातात कजबे यांच्या डोक्याला व शरीराला गंभीर मार लागल्याने ते बेशुद्ध पडले. अपघातानंतर कार चालकाने स्वतः 'डायल १०८' रुग्णवाहिका बोलावून जखमीला उपचारासाठी रुग्णालयात पाठवले. या प्रकरणी जखमीचे सुपुत्र जय कजबे (वय २१) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून घारगाव पोलिसांनी इको कार चालकाविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) आणि मोटारवाहन कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस शिपाई विलास कोकाटे करत आहेत.

# निमगाव ग्रामपंचायतकडून विस्थापितांना जागा उतारे प्रदान




**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी** : ना. राधाकृष्ण विखे डॉ . सुजय दादा विखे पाटील यांच्या प्रयत्नातून चारी क्रमांक ११ येथील विस्थापितांना राहाता तालुक्यातील निमगाव ग्रामपंचायत च्या वतीने विना मोबदला अर्धा गुंठा जागा लोक नियुक्त सरपंच कैलास कातोरे यांचे हस्ते वाटप करण्यात आले.

ना . विखे व डॉ सुजय विखे यांच्या दूरदृष्टीतून विस्थापीतांना हक्काचा निवारा मिळावा तसेच दिलेला शब्द पूर्ण करण्याच्या उद्देशाने निमगाव ग्रामपंचायत ने दमदार पाऊल टाकले असून लोकनियुक्त सरपंच कैलास कातोरे यांनी यासाठी विषेश परिश्रम घेतले आहे.

प्रामुख्याने ११ चारीवरील अतिक्रमण धारकांना गट नंबर २३४/२ मध्ये अर्धा गुंठा जागा विना मोबदला वितरीत करण्यात आली त्या जागेचे मिळकत उतारेचे वाटप काल दिनांक ४ जुलै रोजी रोजी ग्रामपंचायतचे लोकनियुक्त सरपंच श्री कैलास साहेबराव कातोरे व मा.उपसरपंच श्री अजय सोपानराव जगताप यांच्या हस्ते वितरित करण्यात आले. ज्या अतिक्रमण धारकांनी आपले पूर्ण कागदपत्रे ग्रामपंचायत कार्यालयात सादर केले आहे त्यांनाच मिळकत उतारे देण्यात येणार आहे.

दरम्यान ग्रामपंचायतीने राबवलेल्या या उतारे वाटप मोहिमेमुळे विस्थापितांच्या अशा पल्लवी झाल्या आहेत . यावेळी ग्रामविकास अधिकारी संतोष सोनवणे सिकंदर शेख बापू जगताप दीपक लोंढे आदी उपस्थित होते

---

# जमीन वादातून महिलांना शेतात घुसून अमानुष मारहाण

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**घारगाव** : वडिलोपार्जित शेतजमिनीच्या वादातून तीन महिलांना शेतात घुसून काठीने व लाथाबुक्क्यांनी अमानुष मारहाण केल्याची धक्कादायक घटना मांडवे बुद्रुक शिवारात घडली आहे.

याप्रकरणी घारगाव पोलीस ठाण्यात आदिक बाळासाहेब शेंडगे (रा. बिरेवाडी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पीडित वैशाली लहानु गुंजाळ (रा. घुलेवाडी) यांचे माहेर मांडवे बुद्रुक येथे आहे. त्यांच्या वडिलांच्या पश्चात जमिनीच्या ७/१२ उताऱ्यावर वैशाली व त्यांच्या पाच बहिणींची नावे आहेत.

मात्र, त्यांच्या भावाने या जमिनीतील ३१ गुंठे क्षेत्र आरोपी आदिक शेंडगे याला विकले होते. अद्याप जमिनीची अधिकृत कायदेशीर वाटणी झालेली नसल्याचे महिलांचे म्हणणे आहे. बुधवारी (दि. १ जुलै) सकाळी वैशाली गुंजाळ, त्यांची आई ताराबाई आणि बहीण जयश्री फटांगरे या शेतात पेरणीसाठी गेल्या होत्या. त्यावेळी तिथे आलेल्या आरोपी आदिक शेंडगे याने या शेताशी तुमचा संबंध नाही असे म्हणत वाद घातला. महिलांनी हक्क सांगताच संतप्त आरोपीने हातात काठी घेऊन बहीण जयश्री यांच्या डोक्यात व तोंडावर गंभीर वार केले.

तसेच तिन्ही महिलांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिली. घारगाव पोलिसांनी आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या (इछड) कलमान्वये गुन्हा नोंदवला असून पोलीस शिपाई दत्तात्रय चौधरी पुढील तपास करत आहेत.

# तमनर आखाडा येथे घरफोडी

## सोन्याच्या दागिन्यांसह तीन लाख पस्तीस हजारांचा ऐवज लंपास

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : राहुरी तालुक्यातील तमनर आखाडा येथील भिसे वस्तीमध्ये अज्ञात चोरट्यांनी एका कापड दुकान व्यवसायीकाच्या घराच्या पाठीमागील दरवाजाचा कडीकोयंडा तोडून घरात प्रवेश करत रोख रक्कम आणि सोन्याचे दागिने असा एकूण ३ लाख ३५ हजार रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना शुक्रवारी (दि.३ जुलै) सायंकाळी घडली.



या घटनेमुळे तमनर आखाडा परिसरात खळबळ उडाली आहे. फिर्यादी अरुण साहेबराव भिसे ( वय ३४, रा.तमनर आखाडा, भिसे वस्ती) यांनी राहुरी पोलिसांत दिलेल्या फिर्यादीनुसार घर मालक अरुण भिसे यांचे सोनई येथे जय मल्हार कलेक्शन नावाचे कपड्यांचे दुकान आहे. ते दि.३ जुलै रोजी सायंकाळी सुमारे ५ वाजता आपले सोनई येथील दुकान बंद करून तमनर आखाडा येथील घरी येत दिवसभराच्या विक्रीतील तसेच कपडे खरेदीसाठी आणलेली १ लाख ६० हजार रुपयांची रोख रक्कम घरातील कपाटाच्या लॉकरमध्ये ठेवली व त्याच लॉकरमध्ये त्यांच्या आई व पत्नीचे सुमारे १ लाख ७५ हजार रुपये किमतीचे पावणेदोन तोळे वजनाचे सोन्याचे दागिने, त्यामध्ये कानातील कर्णफुले, मनीमंगळसूत्र व मण्याची पोत ठेवलेली होती. त्यानंतर ते गावात बाळूमामाच्या मेंढ्यांच्या कार्यक्रमानिमित्त सायंकाळी सुमारे ७ वाजता ते त्यांची पत्नी व आई यांनी घराला कुलूप लावून कार्यक्रमासाठी गेले त्यानंतर ते रात्री सुमारे १०.१५ वाजता घरी परतल्यानंतर घरात प्रवेश केल्यावर त्यांना बेडरूममधील कपाटातील कपडे व साहित्याची उचकापाचक झालेली निदर्शनास आली त्यानंतर त्यांनी किचनमध्ये जाऊन पाहिले असता घराच्या पाठीमागील दरवाजाचा कडीकोयंडा तोडून दरवाजा उघडल्याचे आढळले.

त्यानंतर त्यांनी कपाटातील लॉकरची पाहणी केली असता त्यामधील रोख १ लाख ६० हजार रुपये व १ लाख ७५ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने, असा एकूण ३ लाख ३५ हजार रुपयांचा ऐवज चोरीला गेल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. अज्ञात चोरट्यांनी सायंकाळी ७ ते रात्री १०.१५ या कालावधीत अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करून चोरी केल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे.

याप्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ७६०/२०२६ अन्वये अज्ञात चोरट्यांविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३३१(४) व ३०५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेच्या तपासासाठी अहिल्यानगर येथील ठसे तज्ञ व श्वान पथक यांना घटनास्थळी पाचारण करण्यात आले होते. या घटनेचा पुढील तपास राहुरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# पोलीस ठाण्यात महिलेला मारहाण, पाच जणांवर गुन्हा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर** : पोलीस ठाण्यात एका महिलेसह तिच्या कुटुंबीयांना मारहाण करून शिवीगाळ केल्याप्रकरणी पाच जणांविरुद्ध शुक्रवारी रात्री अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायद्यासह विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. साहेबराव शंकर फुलारे, गणेश साहेबराव फुलारे, दीपक साहेबराव फुलारे, संगीता साहेबराव फुलारे आणि सुनीता गणेश फुलारे यांच्याविरुद्ध हा गुन्हा नोंदविण्यात आला असून हे सर्व जण वैजापूर तालुक्यातील पानव वस्ती येथील रहिवासी आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ३० जून २०२६ रोजी दुपारी सुमारे २ वाजण्याच्या सुमारास शेतजमिनीच्या वादातून आरोपी फिर्यादी महिलेच्या घरी गेले. यावेळी त्यांनी जातीवाचक शिवीगाळ करत महिलेला मारहाण केली व जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप आहे. तसेच भांडण सोडविण्यासाठी आलेल्या तिच्या पती व मुलालाही मारहाण करण्यात आल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. घटनेनंतर फिर्यादी तक्रार देण्यासाठी पोलीस ठाण्यात गेली असता पोलिसांनी तिला उपचारासाठी रुग्णालयात पाठविले. उपचार पूर्ण झाल्यानंतर शुक्रवारी रात्री ती थेट वैजापूर पोलीस ठाण्यात दाखल झाली. तेथे तिने संबंधित पाच आरोपींविरुद्ध तक्रार दाखल केली असून, त्यानुसार पोलिसांनी अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायद्यासह भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांन्वये गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

---

# कुठे गेला तो चैतन्याचा झरा?.....

**औ**रंगाबाद म्हणजे संभाजीनगर सोडले की नेवासा येण्यापुर्वी दोन-तीन किलोमीटर पसरलेले विशाल 'शैक्षणिक संकुल' दृष्टोपचीस पडते. घनदाट नारळांची झाडे, कोकणाची आठवण करुन देते. त्या गर्द रानात उंच आणि विस्तीर्ण इमारती, मोकळ्या मैदानात खेळणारी मुले-मुली, कुणाच्या हातात रायफली, तर कुणाची घोडसवारी सुरु आहे. चैतन्याचा हा दृश्यपट पाहत गाड्या अहिल्यानगरकडे जात-येत असतात. या रम्य परिसरात एक मोठा तरणतलाव आहे, त्यात नौकाविहार करण्याची व्यवस्था आहे. जवळपास तीनशे एकरांचा ह्या परिसरात हेलीकॉप्टर पेंड ही आहे. परिसरावर मोठे फलक आहे. त्रिमुर्ती पावन प्रतिष्ठान!

प्रतिष्ठानची अशी संकुले श्रीरामपुर, तेलकुडगाव, ढोरजळगाव, शेवगाव अशा विविध ठिकाणी विस्तीर्ण स्वरुपात उभी आहेत. हे स्वप्नवत शैक्षणिक साम्राज्य उभे केले साहेबराव घाडगे पाटील नावाच्या किमयागाराने अशी शैक्षणिक सैनिकी पध्दतीची संकुले उभे करणारे घाडगे पाटील अचानक निघुन गेलेत. आजारपण नाही; अपघात नाही. मंत्रालयात संस्थेच्या कामासाठी गेलेत दहा जुन २०२५ ला कामाच्या धावपळीत झाडावरचे पान सहज गळुन पडावे, तसा हा कर्तृत्वात्चा महामेरु जगाचा निरोप घेऊन गेला.

**वेदनादायक शिकवण-**

साहेबराव घाडगे पाटील तेलकुडगावच्या वस्तीवर म्हणजे उसाच्या मळ्यात राहत होते. सात बहिनभावंड आपल्याच मळ्यात काम करायचे. आई लहापणीच वारली. वडील अल्पशिक्षित पण वारकरी त्यामुळे मुलांच्या करीअरबाबत फारसे जागरुक नव्हतेच. 'तुका म्हणे आता उरलो उपकारापुरता' अशा वृत्तीचे-

शिक्षणाची आवड साहेबरावानाच तो कधी वसतीगृहात, कधी मोठ्या बहिणीकडे राहुन अहमदनगरच्या कॉलेजमध्ये 'मेधावी छात्र म्हणुन अग्रेसर होता. नगरच्या मिलटरी वातावरणात 'मेजर' पदापर्यंत पोहचला. त्यातच पहिल्याच प्रयत्नात आय.ए.एस. समकक्ष, आई.ई.एस. (इंडियन इंजिनिअरींग सर्व्हीस) परीक्षा उत्तीर्ण केली. इतर भावंडांची शिक्षणाकडे ओढच नव्हती. 'तुझ तु पहा' अशा वातावरणात मिलीटरे-सेवेत प्रारंभी साहेबराव मेरठ, जोधपुर अशा ठिकाणी कार्यरत राहिले. मुळा-प्रवरा प्रकल्यात मुख्य कार्यकारी इंजिनिअर असणा-या विनायक रा. पवार आणि त्यांचे त्याकाळी विदर्भात डॉक्टर असणा-या डॉ. मुकुंदराव पवार भावाने आपल्या सुनिताशी साहेबरावान्ना



विवाहासाठी प्रस्ताव दिला आणि ते विवाहबध्द झालेत.

भिन्न कौटुंबिक वातारवरण आणि कृषीनिर्भर कुटुंबाशी जुळवुन घेत सुनिताने 'घाडगे' कुटुंबाला सुविध करण्याचा प्रयत्न करीत नव्या घरातील वातावरण बदलासह स्वीकारले. मिलटरी सेवेत असतानाच वस्तीवरच्या आपल्या चंद्रमौळी, उसाच्या चिपाडाच्या छताचे घर बदलवून टाकले. नव्या लहानग्या पिढीला श्रमसंस्काराबरोबर शिक्षणाच्या वातावरणाकडे अभिमुख केले उभयंतानी-

**पुन्हा गावाकडे-**

घर आणि परिवाराची ओढ असलेले घाडगे पती-पत्नी मिलटरी सेवेतुन पुन्हा अहिल्यानगरच्या लोणीला परतलेत. काही दिवस साहेबरावान्नी इंजिनिअरींग कॉलेजमध्ये आणि सुनितताईने गृहविज्ञान प्राध्यापिका म्हणुन नोकरी केली. आई.ई.एस. शिवाय मिलटरी सेवेच्या पुर्वानुभवामुळे त्यान्ना एस.टी. महामंडळात सनदी पदावर आणि त्यानंतर मुंबई महानगरपालिकेत वॉर्ड ऑफीसर पुढे 'असिस्टंट कमिश्नर' पदावर सेवा करण्याची संधी मिळाली. आपण किती घाटातुन आणि वळणातुन प्रवास करीत आता स्थिरावलो. पण माझ्यासारखे वाड्यावस्त्यावर राहणा-यांचे शैक्षणिक भविष्य काय? अहमदनगर तेव्हाचा साखर व शिक्षणसम्राटांचा परिसर म्हणून ओळखला जायचा. आपले 'मिलिटरी पॅटर्न' शिक्षणाचे स्वप्न या दिग्गजापुढे कसे उभे राहणार? पण त्यांचा आत्मविश्वास दांडगा होता.

**उस डोंगापरी रस नोहे डोंगा**

**काय भुललासी वरलीया रंगा!**

अशी मनोधारणा घेऊन नेवाश्याजवळ पहिला शैक्षणिक त्यान्नी उभा केला. त्याला सामान्यानी प्रचंड प्रतिसाद दिला. विविध ठिकाणी मग त्रिमुर्ती प्रतिष्ठानचे प्रकल्प उभे झालेत. श्रीरामपुरला त्यान्नी विधी महाविद्यालय सुरु केले. स्वतः विधिज्ञ असलेल्या सुनिताने आणि इंग्लंडहून उच्च विधी शिक्षण घेऊन आलेल्या स्नेहलने, डॉ. श्रृती या मुलीनी आणि त्यांच्या सुविद्य पतीन्नी त्रिमुर्ती प्रतिष्ठानची धुरा साहेबरावानंतरही समर्थपणे सांभाळण्याचा प्रारंभ केला.

**संकलन-सुधीर चव्हाण**
**दैनिक राष्ट्र सहयाद्री**
**नेवासा तालुका प्रतिनिधी**
**मो.८८८८२१३५११**

**शब्दांकन-डॉ. श्रीकांत तिडके,मुर्तिजापूर**